CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, ११ मार्च २०२६ । वर्ष ४ रे अंक ३ रा । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com




# गॅस संकटामुळे ‘एस्मा’ लागू

● केंद्र सरकारचा निर्णय ● एलपीजीचे उत्पादन वाढविण्याचा निर्देश

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. याचा परिणाम एलपीजी आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या संभाव्य परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकारने देशभरात लागू ‘एस्मा’ कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. घरगुती स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

सरकारने तेल शुद्धीकरण प्रकल्प (रिफायनरीज) आणि पेट्रोकेमिकल युनिट्सना एलपीजीचे उत्पादन वाढवण्याचा निर्देश दिला आहे तसेच महत्त्वाच्या हायड्रोकार्बन स्रोतांमधून अधिकाधिक एलपीजी उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे. या उपाययोजनांमुळे घरगुती गॅसचा पुरवठा अबाधित राहील, असा सरकारचा विश्वास आहे.

‘एस्मा’ अर्थात् आवश्यक सेवा देखभाल अधिनियम हा संसदेत १९६८ मध्ये मंजूर करण्यात आलेला कायदा आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांच्या दैनंदिन जीवनासाठी अत्यावश्यक असलेल्या सेवांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, याची खात्री करणे हा आहे.

या कायद्यांतर्गत अत्यावश्यक सेवांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संप किंवा कामबंद करण्यास प्रतिबंध केला जाऊ शकतो. अशा सेवांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी काम करण्यास नकार दिला, तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. हा कायदा कमाल सहा महिन्यांसाठी लागू केला जाऊ शकतो. (वृत्तसंस्था)

### कोणत्या सेवा एस्मा अंतर्गत येतात?



या कायद्याच्या कक्षेत अनेक महत्त्वाच्या सेवा येतात. यामध्ये सार्वजनिक सुरक्षा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रुग्णालये, राष्ट्रीय संरक्षणाशी संबंधित सेवा यांचा समावेश होतो. याशिवाय पेट्रोलियम, कोळसा, वीज, स्टील आणि खत उत्पादन, वितरण किंवा पुरवठ्याशी संबंधित उद्योगही आवश्यक सेवांच्या कक्षेत येतात. बँकिंग सेवा, दळणवळण आणि वाहतूक व्यवस्था, अन्नधान्य खरेदी आणि वितरणाशी संबंधित सरकारी उपक्रमांनाही या कायद्याच्या कक्षेत आणले जाऊ शकते. राज्य सरकारांनाही गरज भासल्यास त्यांच्या अधिकार क्षेत्रात लागू करण्याचा अधिकार आहे. ■

### एलपीजी संकट टाळण्यासाठी उपाय

**देशात सध्या एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारात भीतीमुळे बुकिंग वाढल्याने मागणीत सुमारे १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली होती. सरासरी एक कुटुंब वर्षभरात १४.२ किलोचे सुमारे ७ ते ८ सिलेंडर वापरते आणि साधारणपणे सहा आठवड्यांपूर्वी सिलेंडर संपत नाही.** ■

### देशात इंधन साठा किती?

**केंद्र सरकारने संसदेला दिलेल्या माहितीनुसार, भारताकडे सध्या कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांचा एकूण सुमारे ७४ दिवसांचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे जागतिक तणाव किंवा पुरवठ्यातील अडथळे निर्माण झाले तरी काही काळासाठी देशाची ऊर्जेची गरज पूर्ण करता येईल.** ■

### पेट्रोल-डिझेल दरवाढीचा विचार नाही



सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींबाबतही महत्त्वाची भूमिका घेतली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलपेक्षा जास्त असल्या तरी सध्या पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्याचा कोणताही विचार नाही. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्या सध्या वाढलेला खर्च स्वतः उचलत आहेत. ■

# सोशल मीडियावर बदनामी करणाऱ्यांची खैर नाही

सरकारकडून कठोर उपाययोजनांची तयारी

◆ **मुंबई, १० मार्च**

सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्तींची बदनामी करण्याच्या वाढत्या घटनांवर लगाम घालण्यासाठी राज्य सरकार लवकरच कठोर उपाययोजना करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. यासाठी पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करून कायद्यात आवश्यक बदल करण्याचा विचार सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




आमदार राहुल कुल यांनी सोशल मीडियावर फेक अकाऊंटच्या माध्यमातून व्यक्तींची नाहक बदनामी होत असल्याचे सांगत सरकार यावर काय कारवाई करणार, याबाबतचा तारांकीतप्रश्न उपस्थित केला.

या प्रश्नावर सुरुवातीला उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, डिजिटल तंत्रज्ञान वाढल्यामुळे पारंपरिक गुन्ह्यांपेक्षा सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. हे प्रकार रोखण्यासाठी राज्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले असून आशियातील सर्वोत्तम सायबर यंत्रणा महाराष्ट्रात कार्यरत आहे.

यानंतर सविस्तर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सोशल मीडियाचा वापर करून कोणत्याही पुराव्याविना बदनामी करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांना, विशेषतः महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे या संदर्भात कायद्यात आणखी प्रभावी तरतुदी करता येतील का, याचा अभ्यास करण्यासाठी पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली जाणार आहे.

दरम्यान, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनीही या चर्चेत सहभाग घेत माहिती तंत्रज्ञान कायद्यातील सेक्शन ६६ए पूर्वी अस्तित्वात होते, ज्यामुळे सोशल मीडियावर बदनामीकारक मजकूर टाकल्यास अटक करण्याची तरतूद होती, असे नमूद केले. (तभा वृत्तसेवा)

## विचारपुष्प



आपल्या पूर्वजांनी मातृरूपी भूमीला सर्वांना सारख्याच प्रेमाने दूध देणाऱ्या गाईची उपमा दिली. हजारो वर्षांपूर्वी पल्लवित झालेला हा वैश्विक भाव अथर्ववेदात गुणगुणला गेला. अनेक प्रकारच्या विविध भाषा बोलणारे व अनेक मतांचे अनुसरण करणारे जे जनसमुदाय आहेत त्या सर्वांना एकाच घरात राहणाऱ्या भावंडांप्रमाणे ही मातृभूमी धारण करते. ही भूमी आपल्याला धनाच्या हजारो धारा देत आली आहे.

**- रंगा हरी**

रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## महत्त्वाचे

### अमरावतीतील ड्रग्स प्रकरण विधान परिषदेत गाजले

**मुंबई** : अमरावती शहरातील ड्रग्सविरोधी कारवायांवर राज्य शासनाचे बारकाईने लक्ष असून पुढील दोन महिन्यांत बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला जाईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य संजय खोडके यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी सदस्य अभिजित वंजारी यांनी चर्चेत सहभाग घेतला. राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, अमरावती शहरात २०२१ ते २०२६ या कालावधीत ड्रग्ससंबंधित २९ गुन्हे नोंदवून १०१ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. नुकतेच नागपूर गेट पोलिस ठाण्याने सुमारे २ किलो एम.डी. ड्रग्ज जप्त केल्याची माहिती ही त्यांनी दिली. ■

### इंडिगोचे सीईओ एल्बर्स यांचा राजीनामा

**नवी दिल्ली** : देशातील आघाडीची विमान कंपनी इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स यांनी मंगळवारी पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी कंपनीचे सहसंस्थापक राहुल भाटिया यांची अंतरिम सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली. अलीकडेच इंडिगो विमान कंपनीचे वेळापत्रक कोलमडले होते, वैमानिक आणि कर्मचाऱ्यांच्या तुटवड्यामुळे शेकडो विमानांची उड्डाणे रद्द करण्याची नामुष्की कंपनीवर आली होती. डीजीसीने कोट्यवधींचा दंड आणि अधिकाऱ्यावर कारवाई करण्याच्या निर्देश दिले होते.

### धनिक बाळाच्या बापाला जामीन

**पुणे** : २०२४ मध्ये गाजलेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणात आरोपी असलेल्या अल्पवयीन मुलाच्या वडिलांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला होता. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना आणि उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. आरोपीने आपल्या मुलाला वाचवण्यासाठी रक्तनमुना बदलण्याचा प्रयत्न केला, अशी आरोपांची चर्चा समाजाच्या मानसिकतेचे प्रतिबिंब असू शकते.

# समान नागरी कायदा लागू करण्याची योग्य वेळ



● सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण ● शरीयतमधील तरतुदी रद्द करण्यासाठी याचिका

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

समान नागरी कायदा लागू करण्याची योग्य वेळ आली आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नोंदवले. १९३७ मधील शरीयत कायद्यातील तरतुदी रद्द करण्यासाठी दाखल याचिका एक चांगले प्रकरण आहे, असे न्यायालयाने म्हटले. शरीयत कायद्यातील तरतुदी मुस्लिम महिलांसोबत भेदभाव करणाऱ्या असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला. या बाबीकडे केवळ कायदेमंडळानेच लक्ष द्यावे, असा सल्ला न्यायालयाने दिला.

या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख असलेले न्यायासन करीत आहे. यात न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. आर. महादेवन् यांचाही समावेश आहे. १९३७ मधील मुस्लिम पर्सनल लॉ (शरीयत) ॲप्लिकेशन कायदा-१९३७ मधील काही तरतुदींना आव्हान देणाऱ्या याचिकेवर न्यायासन सुनावणी करीत आहे. यात या तरतुदी मुस्लिम महिलांप्रती भेदभाव करणाऱ्या आहेत, असा आरोप करण्यात आला.

शरीयत कायद्यातील उत्तराधिकाऱ्याच्या संबंधातील तरतुदी रद्द केल्यास एक कायदेशीर पोकळी निर्माण होईल. कारण, मुस्लिम उत्तराधिकार नियंत्रित करणारा कोणताही स्पष्ट कायदा अस्तित्वात नाही. वर्तमानात असलेल्या अधिकारांपेक्षा कमी अधिकार मिळतील, अशी पावले घाईघाईने उचलणे योग्य ठरणार नाही, असे सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांना सांगितले. १९३७ मधील शरीयत कायदा संपुष्टात आल्यास, त्याची जागा नेमकी कोणती व्यवस्था घेईल, असा सवालही न्यायासनाने केला.

समान नागरी कायदालागू करण्याचा विचार संसदेने करावा, अशी वारंवार शिफारस केली आहे, असे न्यायालयाने नमूद केले. न्यायासनाच्या मते, सामाजिक आणि वैयक्तिक कायद्यांमध्ये व्यापक सुधारणा करण्यासाठी कायदेविषयक प्रक्रिया हा सर्वांत योग्य मार्ग आहे.

न्यायालय मुस्लिम महिलांना पुरुषांसोबत समान वारसा हक्क असावा, असे घोषित करू शकते, असा युक्तिवाद प्रशांत भूषण यांनी केला. शरिया कायद्यातील वादग्रस्त कलम काढून टाकली तर, अशा प्रकरणांमध्ये भारतीय उत्तराधिकारी कायदा लागू केला जाऊ शकतो, असेही त्यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

### निर्णय कायदेमंडळाने घ्यावा



**याचिकेत भेदभावाच्या मुद्याचा समावेश आहे. मात्र, याचा निर्णय कायदेमंडळाने घेतल्यास योग्य असेल. कारण, संविधानाच्या राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांमध्ये समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी कायदेमंडळावर देण्यात आली आहे, असे न्या. जॉयमाल्या बागची यांनी सुनावणीदरम्यान सांगितले.** ■

# बळीराजा मोफत वीज योजना सरसकट नाही : मुख्यमंत्री

▶▶ ७.५ एचपीच्या मर्यादेत वीज वापर आणला तरच लाभ

**मुंबई, १० मार्च**

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना ही केवळ ७.५ हॉर्सपॉवरपर्यंत वीज वापर करणाऱ्यांसाठी लागू आहे. शेतकरी ग्राहकांनी आवश्यक उपाययोजना करून वीज वापर ७.५ हॉर्सपॉवरच्या आत आणल्यास त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.




सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील कृषी पंपधारक शेतकरी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेपासून वंचित राहत असल्याबाबतचा प्रश्न सदस्य सत्यजित देशमुख यांनी विधानसभेत उपस्थित केला. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनी सहभाग घेतला. शिराळा (जि. सांगली) येथील काही शेतकऱ्यांनी वीज वापर जास्त दाखविल्याची तक्रार केली होती. या प्रकरणी ५२ वीज जोडण्यांची स्थळ तपासणी करण्यात आली. या चौकशीत संबंधित शेतकऱ्यांना दिलेली वीज बिले योग्य असून त्यांचा प्रत्यक्ष वीज वापर अधिक असल्याचे आढळून आले आहे. सध्या या ग्राहकांसाठी स्वतंत्र विशेष दर लागू असून तो सर्वसाधारण दरापेक्षा वेगळा आहे. तरीही संबंधित ग्राहकांना आणखी काही दिलासा देता येऊ शकतो का, याबाबत शासन सकारात्मकपणे विचार करणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ७.५ हॉर्सपॉवरपेक्षा जास्त वीज वापरणाऱ्या ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. ही योजना थकबाकीदारांना नाही, तर केवळ नियमीत वीज बिल भरणाऱ्या किंवा तांत्रिकदृष्ट्या पात्र शेतकऱ्यांसाठी (मुख्यतः चालू बिल माफीसाठी) आहे.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ योजनेला तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबवण्याविषयी निर्णय घेण्यात येईल, असे जीआरमध्ये वर्तवले आहे. तरीही यामध्ये शेतकऱ्यांना काही दिलासा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

# एनसीईआरटीने वादग्रस्त धडा हटवला, सार्वजनिक माफी मागितली

### उफाळलेल्या वादानंतर निर्णय

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) अलिकडेच ‘एक्सप्लोरिंग सोसायटी : इंडिया ॲण्ड बियॉण्ड’ हे नवीन इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राचे पुस्तक मागे घेण्याचा आणि वादग्रस्त प्रकरणांबद्दल जाहीर माफी मागण्याचा निर्णय घेतला आहे. पुस्तकातील ‘द रोल ऑफ ज्युडिशियरी इन अवर सोसायटी’ या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्यावर उफाळलेल्या वादानंतर हा निर्णय घेण्यात आला.

पुस्तकाच्या चौथ्या प्रकरणात न्यायव्यवस्थेसमोरील आव्हाने उद्धृत केली आहे. यामध्ये भ्रष्टाचार, खटल्यांचा प्रचंड प्रलंबित भाग, न्यायाधीशांची कमतरता आणि इतर संवेदनशील मुद्यांचा समावेश आहे. न्यायव्यवस्थेवरील या धड्यामुळे न्यायालयाच्या प्रतिष्ठेबद्दल वाद निर्माण झाला.

या प्रकरणात अयोग्य मजकूर आणि अधिकृततेतील त्रुटी आहे, जी चुकून पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे, असे एनसीईआरटीने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# जिष्णू देव वर्मा महाराष्ट्राचे नवे राज्यपाल



राज्यपालांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

◆ **मुंबई, १० मार्च**

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज पदाची शपथ घेतली. मुंबईतील राजभवनातील दरबार हॉलमध्ये आयोजित समारंभात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यानंतर जिष्णू देव वर्मा हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल झाले आहेत.

सुरुवातीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली.

शपथविधीनंतर भारतीय नौदलाकडून राज्यपालांना औपचारिक मानवंदना देण्यात आली. यावेळी शपथविधी सोहळ्याला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे आदी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# रोहित पवारांनी घेतली सोनिया गांधींची भेट

**नवी दिल्ली, १० मार्च**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी नवी दिल्लीत काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूवर चर्चा केली. रोहित यांनी यावेळी काँग्रेस नेते पी चिदंबरम आणि दिग्विजय सिंहांसारख्या इतरही काही काँग्रेस नेत्यांची भेट घेतली.



यावेळी या नेत्यांनी या दुर्घटनेवर तीव्र चिंता व्यक्त करत अजित पवारांना न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. सध्या रोहित पवार दिल्लीत वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना हा विषय समजावून सांगत आहेत. या पृष्ठभूमीवर त्यांनी मंगळवारी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचीही भेट घेऊन त्यांना हा विषय समजावून सांगितला. रोहित पवार यांनी सांगितले की, अजितदादांच्या विमान अपघाताबाबत दिल्लीत काही खासदारांना भेटून चर्चा करत असताना त्यावेळी काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांची भेट झाली. यावेळी सोमवारच्या भेटीत झालेली चर्चा खडगे यांनी सोनिया गांधी यांना सांगितली आणि हा गंभीर विषय असल्याचे नमूद केले.



# शेअर बाजारात पुन्हा चैतन्य; सेन्सेक्स ६३९ अंकांनी सावरला

◆ **मुंबई, १० नार्च**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मोठ्या घसरणीला अखेर मंगळवारी पूर्णविराम मिळाला. भारतीय शेअर बाजाराने पुन्हा एकदा उसळी घेतली. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी घट आणि आंतरराष्ट्रीय बाजारातून मिळालेल्या सकारात्मक संकेतांमुळे गुंतवणूकदारांनी मंगळवारी चौफेर खरेदी केली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स मंगळवारी दिवसभराच्या व्यवहारानंतर ७८,२०५ अंकांवर बंद झाला. हा निर्देशांक सोमवारी झालेल्या घसरणीच्या तुलनेत ६३९ अंकांनी, म्हणजेच ०.८२ टक्क्यांनी वाढला. दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी निर्देशांकही मंगळवारी तेजीत राहिला. निफ्टीने २३३ अंकांची, म्हणजेच सुमारे ०.९७ टक्क्यांची झेप घेत २४,२६१ ची पातळी गाठली. बाजारातील या तेजीमुळे अवघ्या एका दिवसात गुंतवणूकदारांच्या संपत्तीत तब्बल ४ लाख कोटी रुपयांची भर पडली.

**कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये मोठी घट**

मंगळवारच्या या तेजीमागे प्रामुख्याने कच्च्या तेलाच्या दरात झालेली ६ टक्क्यांची घसरण कारणीभूत मानली जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्य-पूर्वेतील तणाव निवळण्याचे संकेत दिल्याने ब्रेंट क्रूडचे दर प्रति बॅरल सुमारे ९९ डॉलरपर्यंत खाली आले. याचा थेट फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला आणि कंपन्यांना झाला. याच कारणामुळे मंगळवारी विमान वाहतूक क्षेत्रातील ‘इंडिगो’ आणि टायर कंपन्यांच्या समभागांमध्ये मोठी वाढ दिसून आली. डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक नीचांकी पातळीवर गेलेला भारतीय रुपया मंगळवारी ९१.९८ वर सावरल्याने बाजाराला अधिक बळ मिळाले. ऑटो आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांमध्ये गुंतवणूकदारांचा ओढा अधिक होता. विशेषतः टाटा मोटर्स आणि महिंद्रा अँड महिंद्रा या कंपन्यांनी चांगली कामगिरी केली. (वृत्तसंस्था)

### आयटी क्षेत्र दबावाखाली



सेक्टरनिहाय विचार करता आयटी क्षेत्र काहीसे दबावाखाली राहिले. मात्र श्रीराम फायनान्स आणि अल्ट्राटेक सिमेंट यांसारख्या समभागांनी बाजाराला वर नेण्यात मोठी भूमिका बजावली. नॅशनल स्टॉक एक्सचेंजने आगामी काळात हुंदाई मोटर इंडिया आणि विशाल मेगा मार्ट यांसारख्या मोठ्या कंपन्यांचा ‘फ्युचर्स अँड ऑप्शन्स’मध्ये समावेश करण्याची घोषणा केल्याने बाजारपेठेत सकारात्मक उत्साह दिसून आला. तांत्रिक दृष्टिकोनातून पाहता निफ्टीने २४,२०० ही महत्त्वाची पातळी यशस्वीरीत्या पार केली. त्यामुळे येत्या काही दिवसांत बाजार स्थिर राहण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. एकूणच, जागतिक अनिश्चिततेच्या वातावरणात भारतीय बाजाराने मंगळवारी दाखवलेली ही सुधारणा गुंतवणूकदारांसाठी मोठा दिलासा देणारी ठरली. ■

## जिल्ह्यात महिला दिन साजरा



### सांगोला महाविद्यालय, सांगोला

महिला दिनानिमित्त सांगोला महाविद्यालयामध्ये अंतर्गत गुणवत्ताहमी कक्ष समन्वयक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. संस्थापिका सुवर्णा इंगवले यांनी महिला शिक्षण, स्वावलंबन आणि आत्मविश्वासाच्या बळावर समाजात मोठे योगदान देऊ शकते असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, प्रा.निकिता लामगुंडे, रेवा ताटे, प्रगती शिंदे, ऋतुजा नाडगे यांनी महिला सशक्तीकरण, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजातील स्त्रियांची भूमिका याबाबत मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. सोनल भुंजे, सूत्रसंचालन डॉ. भाग्यश्री पाटील यांनी केले. आभार प्रा. डॉ. चित्रा जांभळे यांनी मानले.



### प्रचंडे प्रशाला, अक्कलकोट

नागणसूर येथील एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य शंकर व्हानमाने यांनी जागतिक महिला दिनानिमित्त महिला सप्ताहाच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका सुनीता बंदीछोडे होते. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे आरोग्य तपासणी करण्यात आली. किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले. प्रशालेत चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा व फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी सहशिक्षक बसवराज धनशेट्टी, प्रीती प्रचंडे, वृषाली सोनटक्के प्रमिला शिव गोंडा, जयश्री प्रचंडे, करोटे, डोंगरीतोट, अर्चना मनुरे उपस्थित होते. संजयकुमार गंगदे, प्रा. ईरण्णा धानशेट्टी, अनिल इंगळे, प्रशांत नागुरे, शरणप्पा मनुरे, बसवराज कोळी, थावरू चव्हाण, आकाश कोनापुरे, नितीन धानशेट्टी, विश्वनाथ तळवार, माणिक किणगी, सागर पोद्दार आदींनी परिश्रम घेतले विश्वनाथ वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. चिदानंद मठपती यांनी आभार मानले.



### यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. कविता कांबळे या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अभिमन्यू माने हे होते. यावेळी महाविद्यालयामध्ये महिला दिनानिमित्त रांगोळी व संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक संजना मारडकर, द्वितीय क्रमांक प्रतीक्षा वाघमारे,तृतीय क्रमांक विशाखा जाधव तसेच संगीत खुर्ची स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रतीक्षा वाघमारे, द्वितीय क्रमांक ऋतुजा शेळके, तृतीय क्रमांक मानसी वासानी हिने मिळविला. या विजेत्यांचा सत्कार डॉ. कविता कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला.या प्रसंगी डॉ. कविता कांबळे यांनी मुलींचे आरोग्य व नैतिक मूल्ये या विषयावर मौलिक असे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. रुपाली थोरात, प्रा.पल्लवी अनारसे यांनी केले. आभार प्रा. सरला चव्हाण यांनी मानले.

# गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरोधात मोहीम

## जि.प.चा उपक्रम; १४ वर्षांच्या मुलींसाठी 'एचपीव्ही' लसीकरणाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने 'एचपीव्ही' लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व स्तरावर व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहायक संचालक डॉ. मोहन शेगर, जिल्हा क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. विनोद अभिवंत आदी उपस्थित होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी सांगितले की, ९ ते १५ वयोगटातील (१४ वर्षे पूर्ण) मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी ठरते. या मोहिमेत पात्र मुलींना लसीचा एकच डोस देण्यात येणार आहे.



एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित असून कोणत्याही अफवा किंवा अंधश्रद्धांना बळी पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. मुलींचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करून लसीकरण करून घ्यावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

**आरोग्य विभागाच्या समन्वयात मोहीम सुरु**

महिलांमध्ये वाढत असलेल्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने १४ वर्षाखालील मुलींना मोफत ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही) लसीकरण सुरु केले आहे. लस घेण्याने गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्याचा धोका ८५ ते ९० टक्के कमी होतो, असा दावा आरोग्य विभागाने केला आहे. मागील काही वर्षांत महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढले असून, केंद्र सरकारने या गंभीर आजारावर उपाय म्हणून १४ वर्षे पूर्ण केलेल्या मुलींना लस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे.

मोहिमेत त्या मुली सहभागी होऊ शकतात ज्या १४ वर्ष पूर्ण करून १५ वर्षे पूर्ण झालेल्या नाहीत. मोहिमेच्या सुरुवातीनंतर पुढील ९० दिवसात १५ वर्षे पूर्ण होणाऱ्या मुलींसाठीही लसीकरण चालू राहणार आहे. लस मिळवण्यासाठी शाळांमधून विद्यार्थिनींची नोंदणी केली जाईल, तसेच जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालयांमध्ये ही लस उपलब्ध असेल. आरोग्य विभागाने पालकांना आणि शाळांना याबाबत सूचना दिल्या आहेत.

**भविष्यातील गंभीर आजारांपासून मुली सुरक्षित**

बाजारात 'गार्डासिल' लसीची किंमत सुमारे ३,९२७ रुपये आहे, पण सरकारच्या मोहिमेमुळे ही लस मोफत उपलब्ध होणार असल्याने सर्वसामान्य कुटुंबांसाठी मोठा दिलासा मिळणार आहे. जास्तीत जास्त मुलींनी लसीकरण मोहिमेत सहभाग घ्यावा, जेणेकरून भविष्यातील गंभीर आजारांपासून मुली सुरक्षित राहू शकतील.

**- डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी**



## संत तुकाराम भवन कराराची पूर्तता तात्काळ करा; नगरसेवक थिटे-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० मार्च-**

पंढरपूर नगरपरिषद व श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांच्यामध्ये संत तुकाराम भवन बांधताना झालेल्या कराराबाबतची पूर्तता तात्काळ करावी अशी मागणी येथील पंढरपूर नगरपरिषदेचे नगरसेवक सौरभ थिटे-पाटील यांनी केली आहे. या संदर्भात पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांना त्यांनी निवेदन देखील दिले आहे.

थिटे-पाटील यांनी सांगितले की, येथील संत तुकाराम भवनच्या जागेवर पंढरपूर शहर विकास आराखड्यात पूर्वी वेगळे आरक्षण होते. संत तुकाराम भवनची जागा मंदिरे समितीला देण्यात आली त्यावेळेस श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती व पंढरपूर नगरपरिषद यांचे मध्ये सामंजस्य करार झाला. त्या करारातील अटींचा भंग श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीने केला आहे. त्या काळातील काही बाबींची तात्काळ पूर्तता करणेत आली. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर मंडपाच्या खालील बाजूस काही दुकान आहेत ती मंदिरे समितीने पंढरपूर नगर परिषदेकडे हस्तांतरित केले. ते सर्व गाळे पंढरपूर नगरपरिषदेकडून १९८२ मध्ये जे विस्थापित झाले होते त्यांना देण्यात आले. त्याचे डिपॉझिट व भाडे पंढरपूर नगरपरिषदेला आज सुद्धा मिळत आहे. यावेळी पंढरपूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, नगरसेवक लक्ष्मण भाऊ शिरसट, नगरसेवक अमोल डोके, नगरसेवक सुनील वाळूजकार, नगरसेवक सुजितकुमार सर्वगोड, नगरसेविका अर्चना शिंदे, नगरसेविका संध्याताई शेंबडे, माजी नगरसेवक संग्राम अभ्यंकर, समाजसेवक शरद बापू माने, अशोक पिंटू शिंदे माजी नगरसेवक किरण घाडगे उपस्थित होते.



## मेहता शाळेत महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत महिला दिन साजरा करण्यात आला. प्रथमता प्रमुख अतिथी अ‍ॅड. साधना संगवे, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते सरस्वती व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. भारती शिंदे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. महिला दिनाचे औचित्य साधून इयत्ता चौथीतील श्रीपाद नळे व स्वरा माळगे या विद्यार्थ्यांनी प्रमुख अतिथी संगवे यांची मुलाखत घेतली. इयत्ता पहिली ते चौथीच्या प्रत्येक वर्गातून विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्तुत्ववान स्त्रियांची वेशभूषा साकारली होती. यावेळी शीतल जालीमिंचे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने शिक्षण विवेकतर्फे घेण्यात आलेल्या सांगू का गोष्ट स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन मयुरी दुरूगकर यांनी केले तर आभार सुनेत्रा मोहोळकर यांनी मानले.

## कुरुलमध्ये महिला सक्षमीकरण सप्ताह



**तभा वृत्तसेवा,**
**कुरूल, दि. १० मार्च-**

मोहोळ तालुक्यातील मौजे कुरुल येथे महिला व बालकल्याण विभागांतर्गत मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत दि. २ मार्च ते ८ मार्च या कालावधीत जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण सप्ताह साजरा करण्यात आला.

या सप्ताहात गरोदर मातांची ओटी भरण, अन्नप्राशन कार्यक्रम, वृक्षारोपण, सुदृढ बालक स्पर्धा, सुदृढ पालक स्पर्धा, बाल संरक्षण समिती सभा तसेच ताट-वाटी चाचणी असे उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमांमुळे माता-बाल आरोग्याबाबत जनजागृती झाली तसेच कुटुंबव्यवस्थेत महिलांचे महत्त्व अधोरेखित झाले. या कार्यक्रमाला सुवर्णा जाधव मॅडम, कुरुलच्या सरपंच शिलादेवी माने, ग्रामपंचायतीच्या सर्व महिला सदस्य, ग्रामसेवक श्रीराम खरात, क्लर्क संतोष जाधव उपस्थित होते. यावेळी सुदृढ बालक स्पर्धेतील विजेत्या बालकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बिट सुपरवायझर कल्पना झंपले यांच्या मार्गदर्शनाखाली अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सजयश्री अंकुशराव यांनी केले.

## महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळात महिला दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे या संस्थेत महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्त्री रोग तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी योजना विभाग (जि.प. सोलापूरचे,) सुलभा वटारे, नगरसेविका अलका भवर, सोलापूर अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरचे वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाच्या प्राध्यापिका डॉ. वनिता सावंततर प्रमुख



उपस्थिती म्हणून मुख्याध्यापक मधुकर मुळे, मुख्याध्यापक शिवाजी आतकरे, पुष्पलता जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस कार्यक्रमाचे अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या माजी अध्यक्षा स्वर्गीय निर्मला ठोकळ, व स्त्रीशक्तीच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच माता पालकांना स्वातंत्र्य सेनानी जनाबाई जाधव सभागृहात नारी सन्मान २०२६' सन्मानित करण्यात आले. पुरस्कारार्थी माजी विद्यार्थी व आदर्श माता पालकामध्ये कल्पना गुरव, ज्योती साखरे, आसमा पठाण, प्रमिला भोसले, सुमन ढेपे यांचा समावेश होता तर डॉ. विविध क्षेत्रातील पुरस्कारार्थी मध्ये होता. कार्यक्रमास प्राचार्य मोहनराव घोडके, शिवाजी आतकरे मधुकर मुळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक विद्या पुजारी यांनी केले. सूत्रसंचालन भारती मुन्नोळी यांनी केले तर आभार शुभांगी पवार यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांनी नियोजनबाद्ध कार्यक्रमाबद्दल शाळेचे अभिनंदन केले.



## पनवेलचे आ. प्रशांत ठाकूर यांचा स्वामी समर्थ मंदिर समितीतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

पनवेलचे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर यांचा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर समितीतर्फे सपत्निक सत्कार करण्यात आला. मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला.

याप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी वटवृक्ष मंदिरातले नियोजन उत्तम व आदर्शवत असल्याचे मनोगत व्यक्त केले. यावेळी नगरसेवक ननू कोरबू, सरपंच प्रदीप पाटील, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, गिरीश पवार, संजय पवार, श्रीकांत मलवे, ऋषिकेश लोणारी, महेश मस्कले उपस्थित होते.

## आत्मनिर्भर वस्तीस्तर संघ बचत गटातर्फे महिला दिन



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

आत्मनिर्भर वस्तीस्तर संघ महिला बचत गट यांच्या वतीने प्रभाग ६ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त आशीर्वाद नगर, शेटे वस्ती समोर येथे विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे आयोजन आत्मनिर्भर वस्तीस्तर संघाच्या अध्यक्षा सुनीता दळवी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला तसेच महिला सक्षमीकरणाबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात विविध खेळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते आणि विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, रोटरी क्लब अध्यक्षा जान्हवी मखिजा, माजी उपमहापौर नलिनी चंदले, समाजसेविका रेणुका मंद्रूपकर तसेच योगा शिक्षिका अल्का गवळी उपस्थित होत्या. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर यांनी महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच रोटरी क्लब अध्यक्षा जान्हवी मखिजा यांनी महिला सक्षमीकरणाच्या विषयावर उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास माधुरी पारपल्लीवर, माधुरी ढहाळे, इंदुमती भोसले, मीनाताई खंडागळे, रूपाली चराटे, वैशाली सुरवसे, अंजली साठे, अनुराधा करपे, चित्रा देवकर, रेखा ढवळे उपस्थित होत्या.



## राज्यस्तरीय डिपेक्स प्रकल्प स्पर्धेमध्ये 'कर्मयोगी'चे यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० मार्च-**

नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय तंत्रज्ञान व प्रकल्प प्रदर्शनामध्ये कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूरच्या पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी यश संपादित केले आहे.

यामध्ये इलेक्ट्रिकल विभागामधील विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जेचा वापर करून आरएफ आयडिया आधारित पेट्रोल पंप स्वयंचलन प्रणाली या विषयावर प्रकल्प सादर केला होता. यामध्ये इलेक्ट्रिकल विभागातील कु. सारंग दिनेश शिंदे, विश्वजीत वैजनाथ मस्के, हर्षवर्धन हनुमंत शेंडगे व रोहित शंकर अवताडे विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

तसेच सिव्हिल विभागातील विद्यार्थ्यांनी पुनर्वापरित प्लास्टिक, टाकाऊ वाळू आणि बारीक केलेला कचरा वापरून पर्यावरणपूरक वीट तयार करणे या नाविन्यपूर्ण उपक्रमास प्रथम क्रमांक पटकाविला. यामध्ये ओम हावळ, सुरज कवडे, श्रीराज घाडगे, दादासाहेब मसवडे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या विभागामधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सिम किंवा इंटरनेट किंवा वाय-फाय वापरून दहा की.मी.पर्यंत संवाद साधणारे संवाद प्रणाली या नाविन्यपूर्ण उपक्रमास द्वितीय क्रमांकाचा बहुमान मिळाला. यामध्ये आकाश गोसावी, ओंकार गायकवाड, सुहास भोसले, नागेश अडत विद्यार्थ्यांनी यश संपादित केले. या प्रकल्प स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी कॅम्पस येथे सृजन ट्रस्ट आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या वतीने राज्यस्तरीय स्तरावर आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रकल्प स्पर्धेसाठी प्रा. आर. एस. भोई, प्रा. जी. ए. कोरके, प्रा. एम. एस. धुमाळ, प्रा. आर. एल. माने, प्रा. एन. आर.उत्पात, प्रा. व्ही. व्ही. पालीमकर, प्रा. आय. जे. कोरबू, प्रा.आर. आर. खिस्ते यांनी मार्गदर्शन केले. पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ.अजित कणसे, प्राचार्य डॉ. एस.पी.पाटील, संस्थेचे रजिस्ट्रार गणेश वाळके व सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## वृद्धाची शेतात आत्महत्या

**बार्शी, दि. १० मार्च-**

बार्शी तालुक्यातील कव्हे येथे एका वृद्धाने आपल्याच शेतातील आंब्याच्या झाडाला सुताच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. विश्वनाथ दत्तू घळके (वय ८०) असे मृत वृद्धाचे नाव आहे.

मयत विश्वनाथ घळके हे कवळे येथे आपल्या कुटुंबासह राहत होते. त्यांचे पुतणे दयानंद नवनाथ घळके आणि भाऊ बालाजी घळके हे आज सकाळी सहाच्या सुमारास आपल्या शेतात फुले तोडण्यासाठी गेले होते. फुले तोडत असतानाच बालाजी घळके यांना शेजारील शेतात (गट नं. ३१८) आंब्याच्या झाडाला कोणीतरी गळफास घेतल्याचे दिसले. त्यांनी तातडीने दयानंद यांना बोलावले असता, गळफास घेतलेली व्यक्ती त्यांचे चुलते विश्वनाथ घळके असल्याचे निष्पन्न झाले. मृताची मुले नागनाथ आणि सचिन यांना बोलावण्यात आले. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. याप्रकरणी दयानंद घळके यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात खबर दिली असून पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे.



## स्विमिंग ग्रुपतर्फे महिलांना साडी वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांना ज्ञानदिप पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा स्विमींग ग्रुपच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. तसेच जागतिक महिला दिनानिमीत्त नगरसेवक इंगळे व ग्रुपतर्फे गरजू व कष्टकरी महिलांना साडया वाटप करुन महिलांचाही सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरुप शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रुपये एक लाख असे आहे. वितरण दि.१३ मार्च रोजी कोल्हापूरात संपन्न होणार आहे. ही बाब समस्त स्विमींग ग्रुपसाठी अभिमानास्पद आहे. यावेळी यावेळी स्विमींग ग्रुपचे सदस्य संतोष पराणे, श्रीकांत झिपरे. बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, सागर गोंडाळ, सुनिल पवार, मनोज जगताप, विश्वनाथ देवरमनी, संतोष जवळगे, मिरजगीचे डेप्युटी सरपंच सिद्धलिंग निंबाळ, भुताळी मैंदर्गी, सुधाकर पाटील चंद्रकांत सोनटक्के, बाबा सुरवसे अमर पाटील रमेश कणबसे, कुमार हत्तुरे, रफिक पठाण, जयंत चिल्लाळ, अमोल कापसे, स्वामीनाथ मुसळे, दशरथ लोंढे, जाफर मिस्त्री, रमेश शिंदे इत्यादी उपस्थित होते. सूत्रसंचालन मनोज जगताप यांनी केले तर आभार श्रीकांत झिपरे यांनी मानले.



घरगुती गॅस वापरासंदर्भात काही अडचणी नाहीत. स्टोअरेज असते तर सुविधा असतात. तुटवडा पुढील काही दिवसात नसेल. कारण खाडी देशातील जो आपला साठा आहे तो आपल्याला मिळाला आहे. यामुळे हा प्रश्न लवकरच सुटेल.
- **योगेश कदम**, अन्न आणि नागरी पुरवठा राज्यमंत्री


तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार, ११ मार्च २०२६





सरकारला राहुल गांधी यांची भीती वाटण्याचे काहीही कारण नाही. त्यांची भीती उबाठा गटाला आहे. ते केवळ कॉमेडी करतात, यापलीकडे त्यांना काहीही येत नाही. जनता त्यांच्या पाठीशी कधीही नव्हती यामुळे सरकार त्यांना घाबरत नाही.
- **नवनाथ बन**, भाजपा प्रवक्ते

# आखाती देशांची नाकेबंदी करणार

**● ऊर्जा केंद्रावरील हल्ल्यानंतर इराणचा इशारा ● होर्मुझ जलमार्गाने एक थेंबही तेल जाऊ देणार नाही ● युद्धाचा शेवट आम्हीच करणार**





**◆ तेहरान, १० मार्च**

अमेरिका, इस्रायलच्या वायुदलाने इराणच्या ऊर्जा केंद्रांवर हल्ले सुरूच ठेवल्यास आखाती देशांतील ऊर्जा केंद्र आमचे लक्ष्य असेल. होर्मुझच्या जलमार्गाने तेलाचा एक थेंबही जाऊ देणार नाही. युद्धाचा शेवट कधी करायचा ते आम्ही ठरवू ,असा इशारा इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी दिला आहे.



राजनैतिक चर्चेने मार्ग काढण्याची वेळ गेली आहे. आम्हाला अमेरिकेवर विश्वास राहिलेला नाही. ऊर्जा केंद्र आणि निवासी भागांवरील हल्ले सुरूच राहिल्यास कोणत्याही देशासाठी होर्मुझ जलमार्गाने तेल जाऊ दिले जाणार नाही. जागतिक तेल संकटासाठी अमेरिका जबाबदार असेल. मिनाबमधील शाळेतील १७० मुलींचा अमेरिकेच्या क्षेपणास्त्रामुळे मृत्यू झाला. वृत्तसंस्थेशी बोलताना अराघची म्हणाले, आमच्यावर इस्रायल आणि अमेरिकेने युद्ध लादले. इराण केवळ आपल्या लोकांचे आणि संसाधनांचे रक्षण करत आहे. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलमधील हैफा येथील तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि इंधन साठवणूक केंद्र आम्ही उद्ध्वस्त केले. अमेरिकन सैन्याला मदत करणारे आखाती देश सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती (यूएई), कतार, इराक आणि कुवेतसह अनेक देशांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने हल्ले करणे सुरू आहे. त्यांनी अमेरिकन सैन्याला आपल्या भूभागावरून बाहेर काढावे अन्यथा त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा अराघची यांनी दिला. ◂(वृत्तसंस्था)

### हिजबुल्लाहचे इस्रायलवर ड्रोन हल्ले

**हिजबुल्लाहने मंगळवारी पहाटे इस्रायलच्या अनेक शहरात ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा मारा केला. प्रत्युत्तर इस्रायली सैन्याने लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर हवाई हल्ले चढविले. दुसरीकडे इराणने इराकच्या कुर्दिश प्रदेशातील युएई वाणिज्य दूतावासावर ड्रोन हल्ला केला, यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. हल्ल्यापूर्वीच इमारत रिकामी करण्यात आल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.** ■

### ...तर २० पट जास्त ताकदीने हल्ला करू : ट्रम्प

**होर्मूझ जलमार्ग बाधित करण्याचा प्रयत्न झाल्यास इराणला २० पट जास्त ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला. इराणला विध्वंसापासून कोणतीही शक्ती रोखू शकणार नाही. मला आशा आहे की, अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही. लवकरच युद्धाचा निकाल लागेल आणि इराणला शरण येण्याशिवाय पर्याय उरणार नाही.** ■

### इराणी जहाजे पकडण्यापेक्षा बुडवण्यात आनंद

**फ्लोरिडा येथे आयोजित रिपब्लिकन मेंबर्स इश्यूज कॉन्फरन्समध्ये बोलताना ट्रम्प म्हणाले, इराणची ड्रोन आणि क्षेपणास्त्र क्षमता पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. त्यांचे नौदल आता संपले असून सर्व जहाजे समुद्राच्या तळाला विसावली आहेत. इराणी जहाजे पकडण्याऐवजी बुडवण्यात आम्हाला आनंद मिळते. शत्रूचा पूर्णपणे पराभव होईपर्यंत अमेरिका शांत बसणार नाही, असा निर्धारही त्यांनी यावेळी केला.** ■

# न्यायिक अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा नको

## सर्वोच्च न्यायालयाचा निवडणूक आयोगाला निर्देश

**◆ नवी दिल्ली, १० मार्च**

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या विशेष सघन सुधारणा प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्देश दिला आहे. न्यायालयीन अधिकाऱ्यांना त्यांचे काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी योग्य आणि अखंड परिस्थिती प्रदान करण्याचा निर्देश न्यायालयाने राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला दिला आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती आर. महादेवन आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या तीन न्यायाधीशांच्या न्यायासनाने असे नमूद केले की, प्रक्रियेत तैनात असलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांनी आतापर्यंत मतदार यादीतून नाव काढून टाकण्याची भीती असलेल्या १०.१६ लाख लोकांचे आक्षेप आणि दावे ऐकले आहेत.

**न्यायालयाचा निर्देश काय होता?**

न्यायालयाने निवडणूक आयोगाला कलकत्ता उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची मान्यता मिळेपर्यंत प्रक्रियेत कोणतेही नवीन अनिवार्य पाऊल उचलू नये, असा निर्देश दिला. न्यायालयाने असेही निर्देश दिले की, निवडणूक आयोगाच्या पोर्टलमधील तांत्रिक



समस्या त्वरित सोडवल्या पाहिजेत आणि अशा समस्या पुन्हा येऊ नयेत, याची खात्री करावी. मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया अखंडपणे सुरू राहावी, यासाठी न्यायालयीन अधिकाऱ्यांसाठी लवकरच नवीन लॉगिन आयडी तयार करण्याचा आदेशही न्यायालयाने दिला. निवडणूक आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या निर्णयांची समीक्षा करता येणार नाही, असे स्पष्ट केले.

**अपिलीय प्राधिकरण स्थापन करा**

न्यायालयाने म्हटले की, कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अपिलांच्या सुनावणीसाठी माजी मुख्य न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करू शकतात. न्यायालयाने निवडणूक आयोगाला अपिलीय प्राधिकरण स्थापन करण्यासाठी अधिसूचना जारी करण्याचे निर्देशही दिले. न्यायालय पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेशी संबंधित याचिकांवर सुनावणी करत होते. ◂(वृत्तसंस्था)

# खार्ग बेटावर ताबा मिळविणे अमेरिकेचे लक्ष्य

### ९० टक्के तेलाच्या निर्यातीवर हवे नियंत्रण

**◆ वॉशिंग्टन, १० मार्च**

अमेरिका, इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीजवळ असलेल्या खार्ग बेटाचे महत्त्व अचानक वाढले आहे. या बेटावर ताबा मिळवून इराणच्या अर्थव्यवस्थेवर घाव घालणे राष्ट्राध्यक्ष डौनाल्ड ट्रम्प यांचे लक्ष्य असल्याचे नुकत्याच प्रकाशित झालेल्या वॉशिंग्टन पोस्टच्या अहवालात म्हटले आहे.

९० टक्के इराणी तेलाची निर्यात खार्ग बेटावरून होते आणि त्या देशाच्या कमाईचा स्त्रोतदेखील हेच बेट आहे. येथे मोठे तेल टर्मिनल, पाइपलाइन, स्टोरेज टँक आणि जहाजांमध्ये तेल भरण्याची सुविधा



उपलब्ध आहे. येथून दररोज सुमारे ७० लाख बॅरलपर्यंत तेल जहाजांमध्ये भरले जाऊ शकते. १९६० च्या दशकात परदेशी गुंतवणुकीनंतर या ठिकाणाला मोठे तेल निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आणि तेव्हापासून हे इराणच्या तेल पुरवठ्याचा कणा बनले आहे. त्यामुळे या बेटावर ताबा मिळवून इराणला शरणागतीसाठी भाग पाडण्याचा ट्रम्प यांची रणनीती आहे. या ठिकाणांवर हल्ला झाला, तर इराण मोठ्या प्रमाणावर प्रत्युत्तर देऊ शकतो, ज्यामुळे तिसऱ्या महायुद्धासारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या अनेक लष्करी तळांना आणि अणु सुविधांना लक्ष्य केले, परंतु खार्ग बेटावर अद्याप हल्ला झालेला नाही. सॅटेलाइट डेटा आणि जहाजांवर लक्ष ठेवणाऱ्या कंपन्यांनुसार, युद्ध सुरू असूनही इराण येथून सातत्याने तेल निर्यात करत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### चीनच्या निर्यातीचा मार्ग

**खार्गमधून निर्यात होणाऱ्या तेलाचा चीन हा सर्वात मोठा खरेदीदार आहे. अमेरिकेच्या निर्बंधांना न जुमानता, चीनला होणारी ही तेल निर्यात इराणला केवळ मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देतेच शिवाय धोरणात्मक आधार देखील प्रदान करते.** ■

### ...तर जागतिक तेल संकट ओढवेल

**खार्ग बेटावर हल्ला झाल्यास जागतिक तेल पुरवठा विस्कळीत होईल आणि तेलाच्या किमती प्रति बॅरल १५० पेक्षा जास्त होऊ शकतात. इराणने इशारा दिला की, जर त्यांच्या ऊर्जा प्रतिष्ठानांवर हल्ला झाला तर ते अमेरिका आणि आखाती प्रदेशातील ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करून त्वरित प्रत्युत्तर देईल.** ■

# युरोपलाही युद्धाची झळ; पेट्रोल पंपावर रांगा

## ऊर्जा पुरवठा साखळी खंडित, युरोपात तेल, वायूचा तुटवडा




**◆ वॉशिंग्टन, १० मार्च**

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे भारतासह अनेक देशांना इंधन संकटाचा सामना करावा लागत आहे. पाकिस्तान, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी, पोलंड, व्हिएतनाम, बांगलादेश, श्रीलंका आणि इंडोनेशियामध्येही भीषण इंधन तुटवडा जाणवू लागला आहे. मध्य पूर्वेत आखाती देशांमधील युद्धामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी खंडीत झाली आहे, आठवडाभरात परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

होर्मुझचा जलमार्ग बाधित झाल्याने कच्च्या तेलाची किंमत २५ टक्क्यांनी वाढली आहे. ही परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारकडून शाळा बंदी, सरकारी कामकाजात कपात यासारखे निर्णय घ्यावे लागत आहेत. मागणी आणि पुरवठा यांच्यातील अनिश्चिततेमुळे नागरिकांमध्येही चिंता पसरली आहे. पाकिस्तानात शाळा बंद झाल्यात, सरकारी कार्यालयांना ४ दिवस वर्क फ्रॉम होम बंधनकारक केले आहे. बांगलादेशातही दुचाकींसाठी २ लिटर इंधन मर्यादा आखून दिली आहे. फ्रान्स, पोलंडमध्ये घाबरलेल्या लोकांनी पेट्रोल पंपावर रांगा लावल्या आहेत. महागाई वाढण्याची भीती लोकांमध्ये आहे. व्हिएतनाममध्ये सार्वजनिक वाहतूक वापरण्यावर भर दिला जात आहे. जगातील जवळपास ३१ टक्के कच्चे तेल आणि वायूचा पुरवठा होर्मुझ मार्गाने होतो. युद्धामुळे हा मार्ग बाधित झाला आहे. जर संघर्ष दीर्घकाळ चालला तर कच्च्या तेलाची किंमत १२० ते १४० डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली. ◂(वृत्तसंस्था)

### नामसाईमध्ये १.३७ लाखांचे हेरॉईन जप्त

**◆ इटानगर, १० मार्च**

अरुणाचल प्रदेशातील नामसाई जिल्ह्यातील नोंगटोव खामटी गावात छापा टाकला. यात पोलिसांनी एकाच्या घरातून सुमारे १.३७ लाख रुपये किमतीचे २६ ग्रॅम हेरॉईन जप्त केले, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले.

अमली पदार्थांच्या बेकायदेशीर विक्री आणि खरेदीबद्दल विश्वासार्ह माहितीवरून कारवाई करत, नामसाई एसडीपीओ केंगो दिर्ची यांच्या नेतृत्वाखालील पथकाने नामसाई एसपी सांगे थिनले यांच्या देखरेखीखाली ९ मार्च रोजी छापा टाकला. स्वतंत्र साक्षीदारांच्या उपस्थितीत झडतीदरम्यान आरोपीने वाहून नेलेल्या स्लिंग बॅगमधून हेरॉईन जप्त केले. ◂(वृत्तसंस्था)



**पश्चिम बंगालमध्ये कधीही विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊ शकते, आयोगाच्या अधिकाऱ्यांनी नुकताच राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी दक्षिण दिनाजपूर जिल्ह्यातील बालुरघाट येथे मंगळवारी सुरक्षा दलाच्या जवानांनी पथसंचलन केले**

# झाशीमधून ५२४ गॅस सिलेंडर भरलेला ट्रक चोरी

## महामार्गावर सापडला रिकामा ट्रक

**◆ झाशी, १० मार्च**

इराण, अमेरिका -इस्त्रायल युद्धामुळे इंधन पुरवठ्याबाबत देशभरात चिंता व्यक्त करण्यात येत आहे. गॅस पुरवठाही प्रभावित झाला आहे. अशातच उत्तर प्रदेशात झाशीमधून घरगुती गॅस सिलिंडरने भरलेला ट्रक चोरी झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, हा ट्रक महामार्गावर रिकामा सापडला आहे. या ट्रकमध्ये सुमारे ५२४ एलपीजी गॅस सिलिंडर भरले होते. या सिलिंडरची किंमत १८ लाख रुपये सांगण्यात येत आहे. ही घटना झांशीच्या सीपरी बाजार पोलिस स्टेशन हद्दीत घडली. याप्रकरणी ट्रक मालकाच्या तक्रारीवरुन अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास करत आहे.

ट्रक मालक नीरज अग्रवाल यांनी सांगितले की, त्यांचा ट्रक करारी स्थित भारत पेट्रोलियम कार्पोरेशनच्या प्लांटसोबत जुळलेला आहे. २ मार्चला प्लाँटमधून ट्रकमध्ये ५२४ गॅस सिलिंडर भरण्यात आले. ते सिलिंडर कानपूरच्या ग्रामीण भागात पाठवण्यात येणार होते. होळीमुळे ट्रकचालक राजकुमार ट्रक प्लांटबाहेरच उभा करुन घरी निघून गेला होता. ६ मार्चला माहिती मिळाली की, ट्रक झांशीच्या बडागांव पोलिस स्टेशनच्या हद्दीत पारीछाजवळ महामार्गावर उभा आहे. ट्रक मालकांनी घटनास्थळी जावून बघितले असता ट्रकमधील सिलिंडर गायब होते. वाहनावरील जीपीएसचीही तोडफोड करण्यात आली होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत ट्रक जप्त करुन गॅस सिलिंडरचा तपास सुरू केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### लाईव्ह कॉन्सर्टमध्ये रडली सुनिधी चौहान



**मुंबई :** गायिका सुनिधी चौहान सध्या तिच्या इंडिया म्युझिकल टूरवर आहे. याच दरम्यान लखनऊमध्ये झालेल्या एका कॉन्सर्टमध्ये ती स्टेजवर रडली. तब्येत खराब असून आणि घशात गंभीर समस्या असतानाही सुनिधी परफॉर्मन्स देण्यासाठी पोहोचली होती, पण आवाजाने साथ न दिल्याने तिच्या डोळ्यात अश्रू आले. सुनिधीने हजारो लोकांच्या गर्दीसमोर तिच्या खराब परफॉर्मन्ससाठी माफीही मागितली. आता तिच्या रडण्याचा व्हिडीओ समाज माध्यमावर वेगाने व्हायरल होत आहे. व्हिडीओमध्ये सुनिधी गाता गाता थांबते आणि रडू लागते. तरीही, चाहत्यांनी तिचा उत्साह वाढवण्यासाठी सतत जयजयकार केल्याचे दिसते आहे. ■


### प्रदर्शनापूर्वीच 'धुरंधर-२'चा बॉक्स ऑफिसवर दबदबा




**मुंबई :** 'धुरंधर २' विषयी चाहत्यांमध्ये असलेल्या क्रेझमुळे त्याच्या पेड प्रिव्ह्यू शोसाठी झालेल्या ॲडव्हान्स बुकिंगने रेकॉर्डब्रेक केला आहे. 'धुरंधर २' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर, ७ मार्चला ॲडव्हान्स बुकिंग सुरू झाल्यानंतर अवघ्या २४ तासांच्या आतच, चित्रपटाची ८७ हजार तिकिटे विकली गेली. ९ मार्चच्या सकाळपर्यंत, हा आकडा १,५० हजारांच्या वर पोहोचला होता आणि सर्व माध्यमांवर मिळून एकूण दोन लाखांचा टप्पा ओलांडून गेला होता. चित्रपटाच्या प्रिमियर शोजसाठी देशभरात दोन लाख सहा हजार तिकिटे विकली गेली आहेत. यातून १२.२९ कोटी रुपयांची कमाई केली आहे. ■

### पाकिस्तानी निर्माता आणणार टागोरांची कथा पडद्यावर

**मुंबई :** भारतीय साहित्यविश्वातील महान लेखक आणि नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांच्या एका प्रसिद्ध लघुकथेवर चित्रपट तयार होणार आहे. पाकिस्तानी निर्माता आबिद मर्चंट यांनी टागोर यांच्या १८९३ मध्ये लिहिलेल्या 'षष्टी' या लघुकथेवर आधारित चित्रपट तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. या चित्रपटामध्ये अनेक देशांतील चित्रपटसृष्टीतील व्यावसायिक सहभागी होणार आहेत. पाकिस्तानसह बांगलादेश, अमेरिका, युनायटेड किंगडम, हाँगकाँग आणि ऑस्ट्रेलिया येथील कलाकार व तांत्रिक तज्ज्ञ या प्रकल्पाचा भाग असणार आहेत. या चित्रपटासाठी बांगलादेशातील दिग्दर्शिका लीसा गाजी यांची निवड करण्यात आली आहे. हा चित्रपट 'सनत इनिशेएटिव्ह' या बॅनरखाली तयार होणार आहे. ■



# मातीचा ढिगारा कोसळल्याने सात जणांचा मृत्यू; चार जखमी

**◆ गुरुग्राम, १० मार्च**

एका बांधकाम स्थळावर मातीचा ढिगारा कोसळल्याने सात कामगारांचा मृत्यू झाला आणि नेपाळमधील तिघांसह चार जण जखमी झाले, असे मंगळवारी अधिकाऱ्यांनी सांगितले. गुरुग्रामच्या सिद्धरावली भागातील सिग्नेचर ग्लोबल सोसायटीमध्ये सोमवारी संध्याकाळी ही घटना घडली.

सीवरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) चे बांधकाम सुरू असताना अचानक मातीचा ढिगारा कोसळला आणि काही कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. ढिगाऱ्याखाली सुमारे १२ ते १५ कामगार अडकले, असे राजस्थानमधील भिवाडीचे पोलिस उपायुक्त योगेश यांनी भिवाडी येथे सांगितले. गुरुग्राममधील बिलासपूर पोलिस स्टेशनचे पोलिस पथक, राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले आणि कामगारांना वाचवले. त्यांनी त्यांना राजस्थानमधील भिवाडी येथील जवळच्या रुग्णालयात नेले. तिथे यापैकी सात जणांना मृत घोषित करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मृतांची शवविच्छेदन तपासणी गुरुग्राममध्ये केली जाईल, असे ते म्हणाले. श्वास गुदमरल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे दिसून येते. मातीचा ढिगारा त्यांच्यावर कोसळला तेव्हा ते कामगार काही फूट खाली काम करत होते, असे राजस्थानच्या भिवाडी येथे एका मृत कामगाराच्या नातेवाईकाने सांगितले.

मृताच्या नातेवाईकाने ५० लाख रुपयांची भरपाईची मागणीही केली आहे. मातीचा ढिगारा अचानक त्यांच्यावर कोसळला आणि ते ढिगाऱ्याखाली गाडले गेले. मृतांची ओळख शिवशंकर, परमेश्वर महतो, मंगल महतो, भागीरथ गोपे, सतीश, संजीव गोपे आणि धनंजय महतो अशी झाली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# ११ दिवसांत १३५०० किमी प्रवास

## ● ३०० ग्रॅमचा पक्षी न थांबला न दमला ● चरबीपासून मिळविली ऊर्जा

**◆ नवी दिल्ली, १० मार्च**

ऑक्टोबर २०२२ मध्ये एका लहान पक्ष्याने संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले होते. यानंतर आता तीन वर्षांच्या वैज्ञानिक अभ्यासानंतर एक विक्रम नोंदविण्यात आला आहे. बी ६ नावाच्या बार-टेल्ड गॉडविटने अमेरिकेतील अलास्का येथील कुस्कोकविम डेल्टा येथून थेट ऑस्ट्रेलियातील टास्मानिया येथे उड्डाण केले. विशेष म्हणजे या प्रवासात तो एकदाही थांबला नाही. हा प्रवास अंदाजे १३,५६० किलोमीटर होते.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेले हे जगातील सर्वात लांब न थांबता पक्षी स्थलांतर उड्डाण आहे. यूएस जिओलॉजिकल सर्व्हे (यूएसजीएस) च्या शास्त्रज्ञांनी पक्ष्याच्या प्रवासाचा मागोवा घेतला आणि त्यावर सौरऊर्जेवर चालणारा एक छोटासा टॅग लावला. ११ दिवसांपर्यंत पक्षी अन्न, पाणी किंवा



विश्रांतीशिवाय सतत उडत राहिला. 'बार-टेलेड गॉडविट' हा एक लहान पक्षी आहे. याचे वजन केवळ ३०० ते ४०० ग्रॅम असते. तथापि, स्थलांतर करण्यापूर्वी, त्याच्या शरीरात लक्षणीय बदल होतात. उड्डाणाच्या काही आठवड्यांपूर्वी तो खूप जास्त खातो आणि चरबी साठवतो. याने पक्ष्याचे वजन दुप्पट होते. यामुळे त्याचे अंतर्गत अवयव आकुंचन पावतात. पोट, आतडे आणि यकृतदेखील ५५ टक्क्यांपर्यंत आकुंचन पावते. पक्षी वाटेत खात नसल्याने या अवयवांची गरज नसते. ऊर्जा देण्यासाठी आणि पाणी निर्माण करण्यासाठी शरीरातील चरबी जाळली जाते. अशाप्रकारे पक्षी स्वतःचे पोट 'खातो', त्याचे वजन कमी करतो आणि यामुळेच तो दूरवर उडू शकतो. ही निसर्गाची एक उल्लेखनीय युक्ती आहे. ही लाखो वर्षांपासून विकसित झाली आहे. नेव्हिगेशनसाठी तो पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राची जाणीव करतो. त्याच्या डोळ्यांमध्ये एक क्वांटम यंत्रणा आहे. ती त्याला चुंबकीय रेषा पाहण्याची परवानगी देते. तो त्याचा मार्ग पाहवण्यासाठी तारे, सूर्य, हवेचा दाब आणि हवामान यांचादेखील वापर करतो. ◂(वृत्तसंस्था)

### एक डोळा बंद करत घेतो झोप

**उडताना, हा पक्षी एक डोळा बंद करून झोपतो. तो दुसऱ्या डोळ्याचा वापर त्याच्या मार्गाचे निरीक्षण करण्यासाठी करतो. उड्डाण करताना तो झोपत नाही, खात नाही किंवा पाणी पीत नाही. तथापि, त्याच्या मेंदूला विश्रांतीची आवश्यकता असते. म्हणून, तो अर्धवट झोपतो. एक डोळा आणि मेंदूचा अर्धा भाग झोपलेल्या अवस्थेत असतो, दुसरा अर्धा भाग जागा राहतो. या प्रक्रियेला 'युनिहेमिस्फेरिक स्लो-वेव्ह स्लीप' असे म्हणतात.** ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# स्वावलंबनाच्या ध्यासाचे दिवस...

राजकारणाच्या जगात एक वाक्य वारंवार उद्धृत केले जाते. ते असे की, राजकारणात कुणीच कुणाचा कायमचा मित्र नसतो आणि कुणीच कुणाचा कायमचा शत्रूही नसतो. हितसंबंध बदलले की समीकरणे बदलतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात तर हे वास्तव अधिक ठळकपणे प्रतिबिंबित होताना दिसते. राष्ट्रे एकमेकांशी मैत्री करतात ती मूल्यांसाठी नव्हे तर स्वार्थासाठी. राजकारणात शत्रुत्वही कायमस्वरूपी नसते. ते परिस्थितीनुसार बदलते. आजचे जग पाहिले तर हे वास्तव अधिक तीव्रपणे जाणवते. महासत्तांमधील स्पर्धा वाढत आहे, ऊर्जा संसाधनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी संघर्ष सुरू आहेत, तंत्रज्ञान हे नवे रणांगण बनले आहे आणि माहिती व सायबर हल्ले हे आधुनिक युद्धाचे प्रभावी साधन बनले आहेत. इराणवरील इस्रायल व अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे मध्यपूर्वेत निर्माण झालेला तणाव, समुद्री मार्गांवरील अनिश्चितता, तेल आणि गॅस पुरवठ्यावरील संभाव्य अडथळे आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होणारे सायबर हल्ले या पृष्ठभूमीवर भारतासारख्या विशाल पण अजूनही विकसनशील असलेल्या देशाने स्वतःच्या स्थितीकडे अत्यंत प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे. आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने भारत जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवत असला, तरी काही अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांत देश अजूनही परकीय पुरवठ्यावर अवलंबून आहे. ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, औषधनिर्मितीसाठी लागणारे कच्चे पदार्थ, दूरसंचार उपकरणे या अनेक क्षेत्रांत भारताची परावलंबिता स्पष्ट दिसते. जागतिक संघर्षामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली तर त्याचे परिणाम भारतावर तत्काळ होऊ शकतात. म्हणूनच स्वदेशी, स्वावलंबन आणि धोरणात्मक स्वायत्तता या संकल्पना पुन्हा नव्याने महत्त्वाच्या ठरत आहेत.

आखातात संघर्ष सुरू झाल्यापासून ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न भारतासाठी सर्वांत गंभीर बनतो आहे. देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे हे खरे. पण, त्या वाढीसाठी प्रचंड ऊर्जा लागते. उद्योग, वाहतूक, शेती, शहरे या सगळ्यांना ऊर्जा हवी. या ऊर्जा पुरवठ्याचा मोठा भाग आयातीवर अवलंबून आहे. भारताला लागणाऱ्या कच्च्या तेलापैकी सुमारे पंच्याऐंशी टक्के तेल परदेशातून आणावे लागते. सौदी अरेबिया, इराक, संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत हे भारताचे प्रमुख पुरवठादार आहेत. हा प्रदेश अत्यंत संवेदनशील आहे. तिथे युद्धाची किंवा तणावाची स्थिती निर्माण झाली तर त्याचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होतो आणि भारत त्यापासून अलिप्त राहू शकत नाही. इराणमधील संघर्ष हे त्याचे ताजे उदाहरण. पर्शियन आखातातून बाहेर पडणाऱ्या तेलवाहू जहाजांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. जगातील सुमारे वीस टक्के तेल व्यापार या अरुंद समुद्री मार्गातून होतो. भारताकडे येणाऱ्या तेलाचा मोठा भागही याच मार्गाने येतो. हा मार्ग इराणने बंद केला आहे. त्याचे परिणाम दिसत आहेत. सध्या आपल्याकडे साठा असला तरी भविष्यात तेलाच्या किमती प्रचंड वाढू शकतात. इंधनटंचाई निर्माण होऊ शकते आणि महागाई वाढू शकते. उद्योग आणि वाहतूक यावरही त्याचा परिणाम होईल. त्यामुळे ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न हा केवळ आर्थिक विषयांशी संबंधित नाही. तो राष्ट्रीय सुरक्षेशी व स्वायत्ततेशी देखील संबंधित आहे. नैसर्गिक वायूच्या बाबतीतही भारत मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. भारतात स्वच्छ ऊर्जा म्हणून गॅसचा वापर वाढवण्याचा प्रयत्न होत असताना या आयातीवरील अवलंबित्वही वाढत आहे. त्यामुळे ऊर्जा सुरक्षेच्या प्रश्नाकडे दीर्घकालीन दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

ऊर्जा क्षेत्रानंतर भारताची दुसरी मोठी कमजोरी म्हणजे तंत्रज्ञान क्षेत्रातील परावलंबन. आज भारतात वापरले जाणारे बहुतेक मोबाईल फोन आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे परदेशातून येतात. या उपकरणांमध्ये वापरले जाणारे सेमीकंडक्टर जवळजवळ पूर्णपणे परदेशी आहेत. जगातील चिप उत्पादनावर काही विदेशी कंपन्यांचे वर्चस्व आहे. या पुरवठा साखळीत अडथळा निर्माण झाला तर इलेक्ट्रॉनिक्स उद्योगावर मोठा परिणाम होऊ शकतो. दुसऱ्या बाजूला डिजिटल पायाभूत सुविधांच्या सुरक्षेचाही प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. भारतातील शहरांमध्ये, सरकारी कार्यालयांमध्ये आणि खाजगी प्रतिष्ठानांमध्ये मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले आहेत. त्यापैकी मोठा भाग विदेशी कंपन्यांकडून आलेला आहे. या उपकरणांमध्ये जर गुप्त सॉफ्टवेअर किंवा बॅकडोअर मालवेअर असतील तर सायबर हेरगिरीची शक्यता नाकारता येत नाही. डिजिटल युगात माहिती ही सर्वांत महत्त्वाची संपत्ती आहे आणि डिजिटल सुरक्षेचा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी थेट संबंधित आहे. औषध उद्योगाच्या बाबतीत भारताला जगात वेगळे स्थान आहे. भारतीय औषध उद्योग जगभर औषधे पुरवतो. परंतु या उद्योगाचे एक मोठे न्यून आहे. ते म्हणजे, औषधनिर्मितीसाठी लागणारे एपीआय (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इन्ग्रेडिएन्ट्स) मोठ्या प्रमाणावर चीनमधून आयात केले जातात. या पुरवठ्यावर परिणाम झाला तर भारतातील औषध उत्पादनावरही परिणाम होऊ शकतो. कोविड महामारीच्या काळात पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे हा प्रश्न लक्षात आलाच होता. भारत पूर्णपणे परावलंबी आहे, असे समजण्याचे कारण नाही. काही क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय स्वावलंबन साधले आहे. अन्नसुरक्षा हे त्यातील सर्वांत महत्त्वाचे उदाहरण. त्यामुळे युद्धजन्य परिस्थितीत अन्नटंचाईचा धोका तुलनेने कमी आहे. अवकाश संशोधन क्षेत्रातही भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. भारताने चंद्र आणि मंगळ मोहिमा यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. तसेच भारताची स्वदेशी नेव्हिगेशन प्रणाली ही सामरिकदृष्ट्या महत्त्वाची उपलब्धी आहे. यामुळे परकीय नेव्हिगेशन प्रणालींवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी झाले आहे. संरक्षण क्षेत्रातही स्वदेशीकरणाचा प्रयत्न सुरू आहे. या क्षेत्रात अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. परावलंबन कमीत कमी असावे किंवा शक्यतो नसावेच हा वर्तमानाचा धडा आहे. आधुनिक काळात संघर्षाचा चेहरा बदलला आहे. आता युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही. सायबर हल्ल्यांद्वारे एखाद्या देशाची वीज व्यवस्था, बँकिंग प्रणाली, वाहतूक नियंत्रण आणि लष्करी संप्रेषण व्यवस्था ठप्प करता येते. इराणच्या सर्वोच्च नेत्याला संपविण्यासाठी सीसीटीव्हीच्या माध्यमातून गुप्त माहितीचे संकलन केले गेले, हे साऱ्यांना ठावूक आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेचा अविभाज्य भाग बनली आहे. या सगळ्या पृष्ठभूमीवर भारताने काही धोरणात्मक निर्णय घेऊन स्वायत्ततेला पूरक म्हणून स्वदेशी व स्वावलंबनाच्या कामाला गती दिली पाहिजे. त्यासाठी संशोधक व संशोधक संस्थांना भरीव पाठबळ दिले पाहिजे. सर्वप्रथम ऊर्जा स्वावलंबनावर भर देणे आवश्यक आहे. सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा या क्षेत्रांत भारताकडे प्रचंड क्षमता आहे. भारतात वर्षभर भरपूर सूर्यप्रकाश मिळतो. त्यामुळे सौर ऊर्जा हा देशासाठी मोठा पर्याय ठरू शकतो. अणुऊर्जा आणि हरित हायड्रोजन यासारख्या पर्यायांचाही विचार करणे आवश्यक आहे. आकस्मिकता हाताळण्यासाठी तेलसाठे वाढवणे ही दुसरी महत्त्वाची गरज आहे. तिसरे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे सेमीकंडक्टर उद्योग. २१ व्या शतकातील अर्थव्यवस्थेचा पाया सेमीकंडक्टरवर उभा आहे. मोबाईल फोनपासून कारपर्यंत आणि संगणकांपासून संरक्षण उपकरणांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात चिप्स आवश्यक आहेत. त्यामुळे भारताने या क्षेत्रात गुंतवणूक व संशोधन करणे अत्यावश्यक आहे. डिजिटल सार्वभौमत्व ही देखील भविष्यातील मोठी गरज आहे. भारताने स्वतःच्या क्लाऊड सेवा, ऑपरेटिंग सिस्टिम आणि सायबर सुरक्षा प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा हे भविष्यातील सर्वांत मोठे संसाधन मानले जाते. त्यामुळे त्याचे नियंत्रण आणि संरक्षण देशाच्या हातात असणे महत्त्वाचे आहे. भारताने सर्वांशी संबंध ठेवावेत, पण कोणत्याही एका शक्तीवर पूर्णपणे अवलंबून राहू नये. तशी गरज पडू नये, हीच काळाची गरज आहे. स्वदेशीचा वर्तमानातील अर्थ केवळ बाजारातील विदेशी वस्तूंना नाकारण्यापुरता नाही. तो तंत्रज्ञान स्वायत्तता, ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्वावलंबन आणि डिजिटल सार्वभौमत्वाशी संबंधित आहे आणि या साऱ्यांचा संबंध आपल्या साऱ्यांच्या अस्तित्वाशी आहे.

## विशेष

# बांधकामातही एआयची मदत

प्रा. सुखदेव बखळे

भारतीय बांधकाम उद्योग जीडीपीमध्ये सुमारे नऊ टक्के योगदान देतो. आपल्या संपूर्ण क्षमतेचा उपयोग करून घेण्यासाठी डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पुढे येऊ घातलेल्या पायाभूत प्रकल्पांच्या प्रचंड प्रमाणाचा विचार करता उच्च दर्जा कायम ठेवत बांधकामाला गती देण्यासाठी प्रगत आणि अधिक विश्वासार्ह पद्धतींचा वेगाने अवलंब करणे आवश्यक ठरते. विकसक आणि कंत्राटदारांसह उद्योगातील विविध भागधारक आता प्रकल्प वितरणाच्या सर्व टप्प्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) क्षमतेचा शोध घेत आहेत. एआयमुळे मानवी श्रम कमी होतात आणि वेळेच्या दृष्टीने संवेदनशील निर्णयांसाठी जलद प्रतिसाद देणे शक्य होते. उद्योगाच्या अंदाजानुसार या क्षेत्रातील एआय बाजारपेठ २०२५ मध्ये सुमारे २.१ अब्ज डॉलर इतकी असून पुढील पाच वर्षांमध्ये जवळपास दुप्पट वाढून २०३० पर्यंत ५.२ ते ५.३ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. एआयसारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादकतेत २०-३० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. या पृष्ठभूमीवर प्रकल्प नियोजन, डिझाईन, खरेदी, बांधकाम आणि संचालन या सर्व टप्प्यांमधील निकालांवर प्रभाव टाकणारा महत्त्वाचा घटक म्हणून एआय उदयास येत आहे. बांधकाम प्रकल्पांमध्ये बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग (बीआयएम) आणि भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) यांसारखी साधने आधीच वापरात आहेत. त्यात थेट प्रक्षेपण करणारे कॅमेरे आणि उपग्रह प्रतिमांचा वापर केला जातो. कंपन्या यासंदर्भात गोळा केलेल्या माहितीला (डेटा) विश्लेषणाशी जोडून संपूर्ण मूल्यसाखळीत एआयचा वापर करीत आहेत. त्यामुळे जलद आणि अधिक माहितीपूर्ण निर्णय घेणे शक्य होते.

नियोजन टप्प्यात मागणी विश्लेषण आणि मार्ग अनुकूलनासाठी एआयचा वापर केला जात आहे. मागणी विश्लेषण हे पूर्वीचा डेटा, हंगामी नमुने आणि मान्सूनशी संबंधित प्रवृत्ती यावर आधारित असून सुरुवातीच्या प्रकल्प नियोजनाला आधार देते. मार्ग अनुकूलनात हॉटस्पॉट मॅपिंग, वाहतूक प्रवाह डेटा आणि हंगामी डेटा संचांचा वापर करून योग्य संरेखन निश्चित करण्यात मदत होते. अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकामाच्या दृष्टीने, ग्राहक आणि क्लायंट मॅपिंग तसेच जोखीम मूल्यांकनासाठीही एआययचा वापर होत आहे. उदाहरणार्थ, 'रोबोटिक प्रोसेस ऑटोमेशन' देशपातळीवरील राजकीय, आर्थिक आणि भौगोलिक माहिती तसेच स्पर्धकांशी संबंधित डेटा एकत्रित करून त्यांना एआय स्तर असलेल्या विश्लेषण साधनांमध्ये समाविष्ट करू शकते. यामुळे पूर्वी हाताने संकलित करण्यासाठी महिन्यांचा कालावधी घेणारी सतत जोखीम मूल्यांकन प्रक्रिया शक्य होते. अभियांत्रिकी आणि डिझाईन क्षेत्रात, अनुकूलन आणि पर्याय निर्मिती या दोन्ही पातळ्यांवर एआयचा स्वीकार दिसून येतो. नदी ओलांडणे, जंगलातील मार्ग किंवा रेल्वे क्रॉसिंग यांसारख्या प्रत्यक्ष अडचणींचा विचार करून अधिक योग्य संरेखन ओळखण्यासाठी एआय स्तरांचा वापर केला जात आहे. संकल्पनात्मक टप्प्यावर पूल किंवा मेट्रो मार्गांसारख्या मालमत्तांसाठी अनेक डिझाईन पर्याय निर्माण करण्यासाठी 'जनरेटिव्ह एआय'चा प्रयोग सुरू आहे. त्यामुळे जलद मूल्यमापन करून डिझाईन चक्राच्या सुरुवातीलाच व्यवहार्य पर्याय निवडणे शक्य होते. खरेदी आणि अंमलबजावणी टप्प्यात, खर्च आणि लॉजिस्टिक्स व्यवस्थापन सुकर करण्यासाठी एआयचा वापर होत आहे.

वस्तूंच्या किमतींचे नियमित निरीक्षण करून खर्च मूल्यांकन मजबूत करण्यासाठी विश्लेषण स्तरांचा वापर केला जातो. लॉजिस्टिक्स हे आणखी एक क्षेत्र आहे, जिथे स्वीकार अधिक ठोस स्वरूपात दिसतो. उपकरणांवर बसवलेली जीपीएस साधने मार्ग अनुकूलन, वापर क्षमता सुधारणा आणि इंधन खर्च कमी करण्यासाठी वापरली जातात. प्लांट आणि यंत्रसामग्री ट्रॅकिंग जीपीएस ट्रॅकर्स आणि इंधन व्यवस्थापन प्रणालीद्वारे केले जाते. करार व्यवस्थापन डिजिटलदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी काही अनुप्रयोगांचाही शोध घेतला जात आहे. बांधकाम आणि संचालन हे एआय आधारित तैनातीची सर्वाधिक दृश्यमान क्षेत्रे आहेत. नियमित निरीक्षणासाठी ड्रोन आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) चा वापर केला जातो, तर ड्रोन प्रतिमा आणि मशीन लर्निंगच्या संयोगातून ट्रान्समिशन टॉवर आणि रेल्वे पूल यांसारख्या मालमत्तांसाठी स्वयंचलित तपासणी अहवाल तयार केले जातात. विशेषतः बायोमेट्रिक प्रणाली तैनात करणे अवघड असते, अशा प्रकल्पांमध्ये कामगारांची उपस्थिती हे आणखी एक एआय सक्रिय वापर क्षेत्र आहे. या पद्धतीत निश्चित परिघात प्रवेश ओळखण्यासाठी 'जिओफेन्सिंग'चा वापर केला जातो आणि उपस्थिती नोंदविण्यासाठी चेहरा ओळख तंत्रज्ञान वापरले जाते. संचालन आणि देखभाल, तपासणी, निरीक्षण आणि मालमत्ता कार्य प्रदर्शन ट्रॅकिंगसाठीही एआयचा वापर होत आहे. सक्रिय वापर प्रकरणांची संख्या वाढत असली, तरी स्वीकार अजूनही असमान आणि अनेक घटकांमुळे मर्यादित आहे.

याबाबत पहिला मुद्दा म्हणजे बदलाला होणारा प्रतिकार. वाहतूक प्रकल्प अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात राबवले जातात आणि डिझाईन आणि अंमलबजावणी वेळापत्रकात विलंब होण्याचा धोका जाणवला, तर भागधारक नवी साधने आणण्यास संकोच करतात. दुसरे म्हणजे प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता. एआय साधनांसाठी कौशल्यविकास आवश्यक असून विद्यमान व्यावसायिकांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. डेटाशी संबंधित अडचणी अनेक समस्यांच्या मुळाशी आहेत. एआय मोठ्या डेटा संचांवर अवलंबून असतो, परंतु डेटा गुणवत्तेचे आणि विखंडनाचे प्रश्न उद्‌भवतात. मालकी आणि परवानग्यांबाबतही प्रश्न उपस्थित होतात. गर्दीच्या शहरांमध्ये संरेखन डिझाईन अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक असलेला 'स्ट्रीट-लेव्हल डेटा', विशेषतः बायोमेट्रिक प्रणाली तैनात करणे अवघड असते. अशा प्रकल्पांमध्ये अनेकदा डाटा उपलब्ध नसतो. त्यामुळे मार्ग डिझाईन आणि निर्णयप्रक्रियेसाठी एआय साधनांचा वापर मर्यादित राहतो. नेटवर्क मर्यादाही गुंतागुंत वाढवतात. अनेक प्रकल्प दुर्गम भागांमधून जात असल्याने इंटरनेट उपलब्धता मर्यादित असते आणि रिअल-टाईम आयओटी निरीक्षणावर परिणाम होतो. यासाठी पर्याय म्हणून कालांतराने ड्रोन किंवा लिडार सर्वेक्षण, त्यांचे 'थ्री डी बीम' मॉडेलमध्ये रूपांतर आणि ऑफलाईन डेटा संकलन करून नंतर समक्रमित करणाऱ्या प्रणाली वापरल्या जातात. परिणाम वापरकर्त्यांच्या क्षमतेशी आणि प्रशासकीय चौकटीशी निकट संबंधित असतात.

एआय तज्ज्ञांना जलद आणि अधिक चांगले परिणाम देण्यास मदत करू शकते, परंतु या क्षेत्रातील सखोल ज्ञान आणि नियंत्रण नसल्यास त्यातून नवीन जोखमी उद्‌भवू शकतात. व्यापक स्वीकारासाठी नेतृत्व प्रशिक्षण, पुढील तीन ते चार वर्षांसाठी स्पष्ट गुंतवणूक परतावा, अपेक्षांसह निश्चित आराखडा आणि डेटा-आधारित निर्णय संस्कृती आवश्यक आहे. अलिकडच्या वर्षांमध्ये एआयचा स्वीकार अर्थपूर्ण गतीने वाढला आहे. तथापि, प्रभावी अंमलबजावणीसाठी तंत्रज्ञानकेंद्रित नव्हे, तर समस्याकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक आहे. केवळ पुढील प्रवाह म्हणून एआय तैनात करण्याऐवजी स्पष्ट व्यावसायिक समस्या ओळखून उपाय म्हणून एआय वापरणे परिणामकारक ठरते. यामुळे अंमलबजावणी परिणामांशी जोडलेली राहते, वापरकर्त्यांचा स्वीकार वाढतो आणि एआयला स्वतंत्र उपक्रम न मानता दैनंदिन प्रकल्प व्यवस्थापनात समाविष्ट केले जाते. प्रकल्प प्रत्यक्षात ज्या पद्धतीने चालतात, त्यावर आधारित व्यवहार्य अंमलबजावणी दृष्टिकोन आवश्यक असतो. नेतृत्वाची तयारी, एआय क्षमतांची मूलभूत समज, मोजता येण्याजोगे मूल्य देणाऱ्या क्षेत्रांची स्पष्टता आणि गुंतवणुकीला अपेक्षित परिणामांशी जोडणारा बहुवर्षीय आराखडा हे सर्व निर्णायक ठरणार आहे. प्रकल्प अंमलबजावणी पातळीवर नियंत्रणासह वापर हा केंद्रस्थानी राहिला पाहिजे. क्षेत्र तज्ज्ञतेला प्राधान्य देत एआयने सहायक भूमिका बजावली पाहिजे. वेग आणि विश्वसनीयता यांच्यातील संतुलन राखल्यास एआय प्रकल्प शिस्त बळकट करेल आणि अनियंत्रित निष्कर्षांमुळे निर्माण होणाऱ्या नव्या जोखमी टळतील.

शहरी सक्षमता आणि नियोजन हेही एआय वापराचे उदयोन्मुख क्षेत्र आहे. तिथे स्पष्ट आणि संदर्भाधारित उद्दिष्टांसह तैनाती शक्य आहे. 'आयओटी'आधारित पद्धतींमुळे पावसाच्या परिणामांचा अंदाज करणे आणि शहरी जलप्रणालीत पाणी कसे वाहते, हे समजणे शक्य होते. त्यामुळे पूर व्यवस्थापनासाठी अचूक प्रतिसाद देता येतो. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण ही अशी क्षेत्रे आहेत, जिथे सुधारित डेटा वापर आणि लक्ष्यित विश्लेषणामुळे मूळ समस्या ओळखून अधिक प्रभावी हस्तक्षेप करता येतात. मेट्रो संचालनात ऊर्जा व्यवस्थापन हे आणखी एक आशादायक क्षेत्र असून रिअल-टाईम निरीक्षण आणि पूर्वानुमान साधनांद्वारे नियोजन सुधारता येते आणि अनपेक्षित खर्चवाढ टाळता येते.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# रेशन कार्ड नियमांचा अंमल प्रभावीपणे व्हावा

रेशन कार्ड हे काहींसाठी महत्त्वाच्या अनेक कागदपत्रांपैकी एक शासकीय दस्तावेज आहे तर अनेकांसाठी अन्नधान्यांची हमी देणारे पुस्तक आहे. देशात १९४० म्हणजे ब्रिटिश साम्राज्यातच राशन व्यवस्था सुरू झाली. स्वातंत्र्यानंतरही ती कायम ठेवण्यात आली. १९६० पासून ही व्यवस्था अधिक व्यापक करण्याला सुरुवात झाली. १९६५ साली भारतीय अन्न महामंडळाची स्थापना (एफसीआय) करण्यात आली. राशन वितरण व्यवस्थेत जून १९९७ मध्ये आणखी काही बदल करून गरिबांना त्याचा लाभ मिळेल यासाठी धोरणात्मक प्रयत्न सुरू झाले. पुढे आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्यात आले. ५ जुलै २०१३ रोजी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा करण्यात आला. तेव्हापासून पात्र कुटुंबांना अनुदानित दरात अन्नधान्य मिळणे हा कायदेशीर हक्क आहे. ग्रामीण भागातील ७५ टक्के तर शहरी भागातील ५० टक्के लोकसंख्या या कायद्याच्या कक्षेत आली. धान्य देऊ न शकल्यास राज्य सरकारांना अन्न सुरक्षा भत्ता द्यावा लागतो. महाराष्ट्रात या कायद्याची अंमलबजावणी १ फेब्रुवारी २०१४ पासून सुरू झाली. ९ मार्च २०२६ पर्यंत राज्यात सर्व प्रकारचे २ कोटी ५५ लाख २२ हजार ९१४ रेशन कार्डधारक आहेत. ९ कोटी ८७ लाख ६७ हजार ९६६ लाभार्थी आहेत. ५९ हजार ८४० रेशन दुकानातून अन्नधान्यांचे वितरण होते. इतकी व्यापक ही व्यवस्था आहे आणि ऑनलाईन तंत्रज्ञानाच्या मदतीने ती चालविली जात असल्याने धान्याची काळाबाजारी कमी झाली असून रेशन कार्डाची इतर कामे गतीने होत आहेत.

पात्र लाभार्थी कोणते हा यातला सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. शहरी भागात ५९ हजार व ग्रामीण भागात ४४ हजारापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना प्राधान्य कुटुंब लाभार्थी (पीएचएच) संबोधले जाते. पूर्वी त्याला बीपीएल म्हणायचे. अंत्योदय योजनेत बीपीएलपेक्षाही कमी उत्पन्न असलेल्यांना घेण्यात आले आहे. दारिद्र्यरेषेच्यावर (एपीएल) आणि बिगर प्राधान्य कुटुंब (एनपीएच), एपीएल शुभ्र शिधापत्रिका असे एकूण रेशनकार्डचे पाच प्रकार आहेत. यातील पहिल्या दोन प्रकारातलेच लाभार्थी सर्वांत जास्त आहेत. त्या खालोखाल केशरी कार्डधारक आहेत. एकूण लाभार्थींची जी संख्या दाखविली आहे, त्यात जवळपास ७५ टक्के लाभार्थी हे उपरोक्त तीन प्रकारातलेच आहे. सांगायचा मुद्दा असा की, जे निकष रेशन कार्ड देण्यासाठी आहेत, ते पाळले जातात का आणि तपासणी करून कार्ड दिले जाते का? प्राधान्य कुटुंब व अंत्योदयसाठी उत्पन्नाची जी मर्यादा ठरविण्यात आली आहे, त्या निकषात एक तरी कुटुंब बसते का? इतक्या कमी वार्षिक उत्पन्नात (काही अपवाद असू शकतात) कोणतेच कुटुंब जगू शकत नाही, हे उघड सत्य असताना याच निकषांचा आधार घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून रेशन कार्ड दिले जात आहेत. शासकीय कागदावरच्या नियमांचा आधार घेऊन सखोल तपासणी केली तर निम्म्यापेक्षा जास्त लाभार्थी एका क्षणात अन्नधान्यांच्या लाभासाठी अपात्र होतात. नेमकी हीच बाब केंद्र आणि राज्य शासनाच्या लक्षात आल्याचे दिसत असल्याने त्यांनी नव्या धोरणाचे सुतोवाच केले आहे.

सरकारचे 'वन नेशन, वन रेशनकार्ड' योजनेअंतर्गत नवे धोरण १ एप्रिल २०२६ पासून अमलात येणार आहे. खऱ्या गरजू कुटुंबांना लाभ देणे, अपात्र लाभार्थींची नावे रेशन यादीतून कायमची वगळणे हा नव्या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. नवीन नियमांनुसार रेशन कार्डासाठी पात्रता ठरवताना कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न, मालमत्ता, वाहन आणि घरातील सुविधा यांचा विचार केला जाणार आहे. शहरी भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख आणि ग्रामीण भागातील कुटुंबाचे उत्पन्न २ लाखांपेक्षा जास्त असल्यास ते अपात्र ठरविले जाणार आहेत. ज्या कुटुंबाकडे कार, ट्रॅक्टर किंवा इतर चारचाकी वाहन असेल त्यांना रेशनचा लाभ मिळणार नाही. मालमत्ता निकषानुसार १०० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळाचा प्लॉट, फ्लॅट किंवा स्वतःचे पक्के घर असलेल्या लाभार्थींना देखील योजनेतून वगळले जाणार आहे. तपासणीत चुकीची माहिती देऊन रेशन लाभ घेतल्याचे आढळले, तर केवळ त्यांचे रेशन कार्डच रद्द होणार नाही, तर आतापर्यंत घेतलेल्या धान्याची वसुली बाजारभावानुसार केली जाईल आणि कायदेशीर कारवाई देखील होणार आहे. बऱ्याच सुधारणा करून नवे निकष तयार करण्यात आले आहेत. वाचता क्षणीच ते कडक वाटतात. पण, या निकषांची कोटेकोर अंमलबजावणी झाली तर विद्यमान स्थितीतले निम्म्यापेक्षा जास्त लाभार्थी बाहेर होतात. पूर्वीचे आणि आताचे उत्पन्नाचे निकष तुलनात्मकपणे जवळपास सारखेच आहेत. कारण, दरडोई उत्पन्न वाढले आहे. केलेल्या नियमांची प्रामाणिक अंमलबजावणी केली तरच त्या नियमांची किंमत असते. सरकाने इतके तरी ध्यानात ठेवावे, ही अपेक्षा!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती


# स्कंदपुराण

प्रा. दिलीप जोशी

१८ पुराणातील मोठे पुराण म्हणून या पुराणाचा उल्लेख आहे. स्कंद हे नाव भगवान शिव आणि पार्वती यांचे पुत्र कार्तिकेय यांचे नाव आहे. खरं तर हे पुराण भगवान शिवांनी पार्वतीला सांगितले. पार्वतींनी हे पुराण आपला पुत्र कार्तिकेय म्हणजे स्कंदाला सांगितले. स्कंदाने ते नंदींना सांगितले. नंदी भगवंताने दत्तांना सांगितले. दत्तांनी व्यास महर्षी यांना तर व्यासांनी ते सुतांना सांगितले. या पुराणाचे विशेष विश्लेषण स्कंद यांनी सांगितले म्हणून या पुराणाला स्कंद पुराण म्हणतात.

सुप्रसिद्ध सत्यनारायण कथा याच पुराणातील कथा आहे. प्रसिद्ध असे सोमवार व्रत, शिवरात्री व्रत, प्रदोष व्रत, एकादशी व्रत याच पुराणात असून सर्वत्र साजरा होणारा व्यंकटेश-पद्मावती विवाह सोहळा सर्वप्रथम याच पुराणात आहे. भगवान जगन्नाथाची काष्ठमयी प्रतिमा कथा, नर्मदा परिक्रमा महिमा इथेच आहे. अल्पभेद असलेले सुप्रसिद्ध विष्णुसहस्रनामही इथेच आहे. तुळशी विवाह सोहळा या पुराणात आहे. दिवाळी सण म्हणजे वसु-बारस ते भाऊबीज या दिवसाचे महिमान आणि त्याचा विधी, परंपरा या पुराणात सांगितल्या आहेत. विशेषतः लक्ष्मीपूजन आणि भाऊबीज याचा विशेष उल्लेख आहे. आवळीचे पूजन अ ावळ्याखाली दीपपूजन इथे आहे. याशिवाय महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरा होणारा भाद्रपदातील ज्येष्ठा गौरीपूजन विधी आणि महात्म्य याच पुराणात आहे. अक्षयतृतीया साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्ताचे महत्त्व इथेच आहे.

या पुराणाचे सात खंड म्हणजे भाग आहेत. माहेश्वर खंड, वैष्णव खंड, ब्राह्म खंड, काशी खंड, अवंती खंड, नागर खंड आणि प्रभास खंड असे सात खंड असून काशी खंड आणि रेवा खंड प्रसिद्ध आहेत. सत्यनारायण कथा रेवाखंडात आहे. सातही खंडांचे उपखंड किंवा उपविभाग आहेत. स्कंदपुराण संहितात्मक विभागले आहे. सनत्कुमार संहिता, शंकर संहिता, ब्राह्मसंहिता, सौर संहिता, वैष्णव संहिता, सूत संहिता असे विभाजन आहे. या पुराणात बदरीकाश्रम, अयोध्या, प्रभास क्षेत्र अशा विविध तीर्थांचे वर्णन आहे. गंगा, यमुना, सरस्वती, नर्मदा या नद्यांच्या उद्‌गम कथा याच पुराणात आहेत. रामायण, भागवत इत्यादी ग्रंथांचे महात्म्य इथे सांगितले आहे.




सती चरित्र, दक्षयज्ञ, पार्वती जन्म, शिव-पार्वती विवाह, कार्तिकेय म्हणजे स्कंद जन्म, तारकासुर वध कथा या पुराणात आहे. विश्वकर्म्याच्या तपासून वृत्रासुर उत्पत्ती, दधीची ऋषी द्वारा अस्थिदान ही कथा, वराह अवतार, वामनादी दश अवतार कथा यात आहेत. रामेश्वर धनुष्कोटी येथील राम सेतू, गोकर्ण क्षेत्र सोबतच रुद्राक्ष, रुद्राध्यायी, शालिग्राम विग्रह, नर्मदेश्वर शिवलिंग महिमा या पुराणात आहे. विंध्य-नारद संवाद, स्कंद-अगस्ती संवाद, जय-विजय चरित्र, घटोत्कच विवाह, बर्बरिक जन्म इत्यादी कथा या पुराणात आहे. बर्बरिक ज्यांना आपण खाटू श्याम म्हणतो, त्यांची यथार्थ कथा, त्यांचे सामर्थ्य, भगवान कृष्णाने त्यांचे मस्तक का उडविले, मस्तकाला पूजनीय स्थान देऊन त्यांना मिळालेले वरदान पूर्ण केल्याची कथा स्कंद पुराणात आहे.

काशीचे महात्म्य, शिवांचे काशीत आगमन, मणिकर्णिका उत्पत्ती कथा, विश्वनाथ वैभव, काशीतील विविध लिंग, काशियात्रा फळ असे काशीचे महत्त्व याच पुराणात आहे. कार्तिक महिन्याचे महत्त्व, कार्तिक स्नान, मार्गशीर्ष महात्म्य, वैशाख महात्म्य इथे दिले आहे. रघू राजा आणि कौत्साची दसऱ्याची कथा, दत्तावतार कथा, उज्जैन महाकाल, क्षिप्रा महिमा, ओंकार मांधाता, अमरकंटकचे महत्त्व या पुराणात आहे. स्त्रीभ्रूण हत्या त्या काळात होत नसत; कारण स्कंद पुराणात कन्येचे महत्त्व खूपच सुंदर विशद केले आहे.

'दशपुत्रसमा कन्या दशपुत्रान्प्रवर्द्धयन् ।
यत्फलं लभते मर्त्यस्तल्लभ्यं कन्यये‍कया ॥'

एका मुलीचे पालनपोषण दहा पुत्रांच्या पालनासमान असा स्पष्ट संकेत या पुराणात आहे. वृक्षारोपणाचे महत्त्व आणि त्यातल्या त्यात प्राणवायू देणारे, फळफळावळ देणारे तथा औषधीय वनस्पती यांचे संवर्धन केल्यास पुण्य लाभते, हे स्कंद पुराण वृक्षांच्या नावासह सांगते.

'अश्वत्थमेकं पिचुमन्दमेकं न्यग्रोधमेकं दश चिञ्चिणीकान् ।
कपित्थबिल्वाSSमलकत्रयञ्च पञ्चाSSम्रमुप्त्वा नरकन्न पश्येत् ॥'

जो कोणी एक पिंपळ, एक कडूलिंब, एक वटवृक्ष, दहा चिंचेची झाडे, तीन कविट, तीन बेल, तीन आवळा आणि पाच आंब्याची झाडे लावतो त्याला नरकाचे तोंडही दिसत नाही तर तो स्वर्गात स्थान मिळवितो. स्कंद पुराण हे यथार्थ पुराण असून व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्ठी विचार मांडणारे सुंदर पुराण आहे. सर्वांनी ते अवश्य वाचले पाहिजे.

९८२२२६२७३५

## हिंदू संमेलने काळाची गरज

आज देशभरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी महोत्सव सुरू आहे. शताब्दी महोत्सवामध्ये कुठेही मनोरंजनात्मक कार्यक्रम होत नसून देश घडविण्यासाठी लागणारी पिढी घडवण्याचं काम सुरू आहे. देशाप्रति स्वाभिमान, आपल्या धर्माबद्दल जागृती हे कार्य करता यावे यासाठी नवीन पिढी तयार व्हावी या उद्देशाने कार्य सुरू आहे. संघाने सांगितलेली पंचसूत्री यावर काम सुरू आहे. कुटुंब प्रबोधन हा विषय तसा बघितला तर फार जुना आहे. पूर्वी प्रत्येक घरात संयुक्त कुटुंब पद्धती होती. घरात आजी, आजोबा नातवांना घेऊन दिवे लावणीला रामरक्षा, भीमरूपी शिकवायचे. उत्तम धार्मिक संस्कार नातवांवर व्हायचे. घरातील मुलींना संध्याकाळच्या आत घरात यायला सांगायचे. सर्व जण एकत्र जेवायला बसायचे. त्यावेळेस, मुलांचा अभ्यास, खेळ, त्यांची प्रगती, कुटुंबासमोरील समस्या यावर चर्चा होत असे. त्यामुळे कुटुंबामध्ये संवाद असायचा. परंतु आता पूर्ण चित्र बदललेलं आहे. कुटुंब ही संकल्पना संपुष्टात येते की काय अशी शंका यायला लागली आहे. दोन किंवा तीन माणसं कुटुंबात असतात. त्यातही संवाद नसतो १२-१२ तास काम करून एकमेकांशी न बोलता दिवस जातो. त्यामुळे असलेला ताण, तणाव याबद्दल कोणीही बोलत नाही. त्यामुळे स्वास्थ्य बिघडते व कुटुंबाची हानी होते. संघाने कुटुंब प्रबोधन हा विषयच याकरिता घेतला की समाजातील प्रत्येक घटकाशी संपर्क साधून त्यांचे विचार, त्यांच्या समस्या ऐकून त्यांना मुख्य प्रवाहात आणून आपल्या धर्माशी सुसंगत कार्य वाढवण्यासाठी उपयोग व्हावा. तसेच त्यांचे कुटुंब सुशिक्षित, सुसंस्कारित व्हावे व सज्जनशक्तीचा विकास व्हावा व देशाच्या जडणघडणीमध्ये योगदान द्यावे हाच एकमेव उद्देश आहे. एकदा का उद्देश सफल झाला की पर्यावरण, समरसता, स्वदेशी हे घटक सुद्धा सर्व समाजाच्या अंगवळणी पडून एक सशक्त समाज निर्माण व्हायला मदत होईल. हीच संकल्पना घेऊन देशभरात हिंदू संमेलने आयोजित केली जात आहे. या संमेलनांच्या माध्यमातून सामाजिक समरसता, जातिपातीपासून मुक्तता, सर्व हिंदू धर्मीयांची एकता, सज्जनशक्तीची एकी हे सर्व साधले जाणार आहे आणि हे आजच्या परिस्थितीत खूप आवश्यक आहे. लव्ह जिहाद, जमीन जिहाद, दहशतवादी कारवाया या सर्वांना नेस्तनाबूत करायचे असेल तर अशी हिंदू संमेलने घेणे आवश्यक आहे.



**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## वाचक पत्रे

## कार्यकर्ते कार्यक्रमापुरते, पक्ष नेत्यांच्या भरवशावर?

आजच्या राजकारणात एक गंभीर वास्तव दिसून येत आहे. राजकीय पक्षांची ताकद एकेकाळी विचारसरणी, संघटन आणि कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर उभी असायची. परंतु सध्याच्या काळात अनेक पक्षांचे अस्तित्व आणि चालना प्रामुख्याने लोकप्रतिनिधी आणि नेत्यांच्या भरवशावर अवलंबून असल्याचे दिसते. पूर्वी कार्यकर्ते हे पक्षाचे आधारस्तंभ मानले जायचे. गावोगावी, शहरात विचार पोहोचवणे, जनतेच्या समस्या मांडणे आणि पक्षाच्या धोरणांसाठी लोकांमध्ये जनजागृती करणे ही त्यांची भूमिका असायची. आज मात्र अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांची भूमिका कार्यक्रमापुरती मर्यादित झाल्याचे दिसते. एखादा मोठा कार्यक्रम, सभा किंवा दौरा असेल तेव्हा कार्यकर्त्यांची उपस्थिती दिसते, पण रोजच्या जनतेच्या समस्या प्रश्नांवर काम करणारे कार्यकर्ते कमी होत चालले आहेत. दुसरीकडे, पक्षाचे संपूर्ण राजकारण काही मोजक्या नेत्यांभोवती फिरताना दिसते. त्यांच्या लोकप्रियतेवर, आर्थिक व संघटनात्मक ताकदीवर पक्ष उभा राहतो. त्यामुळे पक्षाची विचारसरणी आणि कार्यकर्त्यांचे स्थान दुय्यम ठरत असल्याची टीका अनेक राजकीय विश्लेषक करत आहेत. लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष हे केवळ नेत्यांचे व्यासपीठ नसते, तर ते समाजाच्या विविध घटकांना जोडणारे माध्यम असते. जर कार्यकर्ते फक्त कार्यक्रमापुरते सक्रिय राहिले आणि पक्ष फक्त नेत्यांच्या भरवशावर चालू लागले, त्यामुळे लोकशाहीचा पाया कमकुवत होण्याची भीती निर्माण होते. म्हणूनच आज गरज आहे ती राजकीय पक्षांनी पुन्हा संघटन बळकट करण्याची. कार्यकर्त्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान देणे, त्यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे आणि जनतेशी थेट संवाद वाढवणे आवश्यक आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

## थोर महापुरुषांचे कार्य पुढे यावे

भारतीय स्वातंत्र्यलढा आणि राष्ट्रनिर्मितीतील विविध महापुरुषांचे योगदान वाचकांसमोर मांडण्याचे कार्य तरुण भारतने सातत्याने करावे. इतिहासाचे वस्तुनिष्ठ चित्रण ही आजची गरज आहे.

**राजू इनामदार**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६५०/२०२५-२६ | ७७,६५०/- | १ | **नागेश गोपीनाथ महाडीक** रा. विनायंक काडादी नगर, तळे हिप्परगा रोड शेळगी, सोलापूर |
| | | | ३ | **नागेश महाडीक** रा. विनायक काडादी नगर, तळे हिप्परगा रोड, शेळगी, सोलापूर |
| २ | १००४/२०२५-२६ | १,२९,२४३/- | २ | **अजित बसवंत बिराजदार** रा. प्लॉ. नं. १४ माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर |
| ३ | ११९६/२०२५-२६ | १,६०,७१४/- | १ | **सचिन दगडू आठवले** रा. २१२ गौतम नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ४ | ११९७/२०२५-२६ | ३,७७,३७७/- | १ | **विरभद्रेश्वर एजन्सी प्रो. मल्लिनाथ सिध्दाराम याळगी** रा. शॉप नं. ६४, कमला नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | २ | **सत्यवीर इंदलिसिंग पाल** रा. १०३, अकबर अली दर्गाहजवळ ग.ह. झोपडपट्टी, सोलापूर |
| | | | ३ | **रामा सिध्देश्वर वंजारे** रा. ११९४, जुनी पोलीस लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर |
| ५ | ११९८/२०२५-२६ | १,७७,२७४/- | १ | **माऊली इलेक्ट्रीकल्स प्रो.प्रा. लक्ष्मीकांत उत्तरेश्वर कापसे** रा. १९९७, जुनी पोलीस लाईन, निराळे वस्ती, सोलापूर |
| | | | २ | **शहाजी जनार्दशन भोसले** रा. मु.पो. पापरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ६ | ११९९/२०२५-२६ | १,७३,९४२/- | १ | **अमृता मार्केटींग प्रो. राहुल बसवराज कत्ते** रा. १५१, शुक्रवार पेठ, सोलापूर |
| ७ | १२००/२०२५-२६ | ९९,६४५/- | २ | **प्रकाश उमाजी हुच्चे** रा. ११९ अे, मोतीराम नगर, मारुती मंदिरजवळ, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. २४/०३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक : १०/०३/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. दिपक भास्कर केसकर**
बी.ए., एल.एल.एम (ॲडव्होकेट)
प्लॉट नं. ९ प्राची अपार्टमेंट, गांधी नगर,
२२४/९ सिव्हील लाईन सोलापूर ४१३००३

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर** - **अर्जदार / वादी**
विरुध्द
**श्री. शिंदे नारायण रामचंद्र वगैरे ३** - **जाबदार / प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादाचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०३/२०२५ | नं. १ शिंदे नारायण रामचंद्र साठे वस्ती मु.पो. मंद्रुप तालुका - दक्षिण सोलापूर, सोलापूर - ४१३२२१ | ११,०२,०५५/- | २०/०३/२०२६ |

अर्जदार यानी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. यांची नोटीस काढून खूप दिवस झालेले असून त्यांची नोंटीसीची पोच पावती परत मिळत नसल्याकारणाने नं. १ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार - शुक्रवार, दिनांक २०/०३/२०२६ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी

दिनांक : ०७/०३/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकरी साहेब याच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, लि., सोलापूर**

**ठिकाण** : श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
पत्ताः प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

---

## जाहीर नोटीस

**ॲड. दिपक भास्कर केसकर**
बी.ए., एल.एल.एम (ॲडव्होकेट)
प्लॉट नं. ९ प्राची अपार्टमेंट, गांधी नगर,
२२४/९ सिव्हील लाईन सोलापूर ४१३००३

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर** - **अर्जदार / वादी**
विरुध्द
**साळुंके माधुरी शंतनु - वगैरे ३** - **जाबदार / प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादाचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०५/२०२५ | नं. ३ मुजावर निसार इसाक १०, मुमताज नगर, कुमठा नाका, सोलापूर - ४१३००६ | ८६,९५,१९१/- | २०/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. ३ ची नोटीस ची नोटीस नोटीस काढून खूप दिवस झालेले असून त्यांची नोटीसीची पोच पावती परत मिळत नसल्याकारणाने नं. ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार - शुकवार, दिनांक २०/०३/२०२६ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकरी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, लि., सोलापूर**

**ठिकाण** : श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
पत्ताः प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

---

# स्वागत नगरमध्ये बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या युवकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १० मार्च-**
कुमठा नाका येथील अझर सैफन पठाण (वय २७, रा. स्वागत नगर, सोलापूर) हा दि. १० मार्च रोजी शांतीनगर येथील भोसले कॅन्टीन समोरील घराच्या समोर मोकळ्या जागेत बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात त्याचे वडील सैफन पठाण यांनी दाखल केले. परंतु उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका सोलापूर शहर नवीन हद्दवाढ भागातील बाळे येथील स.नं.४/२ब पैकी प्लॉट नं.१२ पैकीची खुली जागा याचे एकूण क्षेत्रफळ ९०.०० चौ.मी. अगर ९६८.४० चौ. फुट इतके असून यासी आकार रुपये ०६-४० पैसे इतका आहे.

सदर खुल्या जागेची यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे पूर्वेस - प्लॉट नं. ११, पश्चिमेस - प्लॉट नं. १२ पैकी उर्वरीत जागा, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं.६०.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील वर नमुद मिळकत ही विद्यमान मालक श्री. सुरेश श्रीमंत गवंडी रा. ८३/८४ लक्ष्मी नगर, होटगी रोड, हत्तुरे वस्ती, सोलापूर यांच्या मालकी वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिल श्री. दिगंबर केदार पौळ रा. आकाश नगर, बाळे यांना खुषखरेदीने विकण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिली आहे. आमचे अशिल लवकरच नमूद प्लॉटचे रजिस्टर खरेदीखत करुन घेणार आहेत. तथापि ज्या कोणाचाही या मिळकतीत करार, मदार, साठेखत, दान, गहाण, टाच, लिज, बक्षिस, पोटगी, बोजा, विल्हेवाट, वाटणीपत्र, मृत्युपत्र या अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हक्क अथवा हितसंबंध असल्यास अथवा कोर्ट केसेस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील पत्त्यावर भेटून, कागदोपत्री हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरुन रजिस्टर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार मिळकतीवर अगर आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये व कोणास कळविले नाही असे होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

ही खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिली ता. ०९/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. रणजीत आर. चौधरी**
**एम.ए., एल.एल.बी. ॲडव्होकेट**
**पत्ता : वसंत विहार, सोलापूर**
**मो.नं.८२०८५१६९१३ / ७०८३२७८४२०**

---

## जाहीर सुचना

तमाम लोकास विशेषतः अक्कलकोट पंचक्रोशीतील लोकांना कळविण्यात येते की, डि व सब डी सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी अक्कलकोट ग्रामीण मधील शेतजमीन गट नं.९९२/१०/अ याचे एकूण क्षेत्रफळ १ हे. ९९ आर. यांसी आकार १ रुपये ८० पैसे ही मिळकत यातील प्रस्तावक शरणव्वा सायबण्णा जमादार, रा. अक्कलकोट यांना त्यांचे मयत वडिल सायबण्णा रायप्पा बेरड यांच्यापश्चात एकुलती एक मुलगी म्हणून वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. यातील फेरफार क्र. ६२८२ अन्वये दि. ३१/०१/२००३ रोजीपासून शरणव्वा सायबण्णा जमादार ही मालक वहिवाटदार ठरली आहे.

सदर शेतजमीन गट नं.९९२ मधील गट विभाजनातून तयार झाली आहे. दि. ०९/०६/१९७६ रोजी महाराष्ट्र जमिनी (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील तरतुदींप्रमाणे अतिरिक्त जमीन म्हणून घोषित झालेली आहे. याची मूळ मालकी सुनिताराजे जयसिंगराव भोसले यांच्या राजघराण्याची होती. त्यानुसार सदर जमिनीचे १९ भागात विभाजन होऊन भूमीहीन लाभार्थीना जमिनीचे वाटप करण्यात आले. त्यानुसार फेरफार नं.८० व ४१७ नुसार गट क्र.९९२/१० यांसी क्षेत्र ०१ हे. ९३ आर. ही जमीन प्रथमतः सायबण्णा मुकण्णा बेरड यांना देण्यात आली होती. मात्र तांत्रिक दोष दूर करून फेरफार क्र. २२६ च्या बदलाप्रमाणे सायबण्णा रायप्पा बेरड यांच्या हक्कात वाटप झाली. पुढे दि. ३०/०३/२००२ रोजी जमीनधारक सायबण्णा रायप्पा बेरड हे मयत झाल्याने त्यांच्या मृत्यूपश्चात वारसा हक्काने जमिनीची मालकी शरणव्वा सायबण्णा जमादार यांच्याकडे हस्तांतरित झाली आहे. प्रस्तुत जमीन गट नं. ९९२/१० याचे क्षेत्र ०१हे. ९३आर. इतके होते. परंतु त्यातील ०१ हे. ०३ आर. इतकी जमीन पाझर तलावाकरिता दि. ३१/०५/२००८ रोजीचे परिपत्रकानुसार संपादित होऊन सदर गट नं. ९९२/१० चे विभाजन होऊन गट नं. ९९२/१०/अ यांसी क्षेत्र ०हे. ९०आर. ही जमीन शरणव्वा सायबण्णा जमादार यांना वारसाने मिळालेली आहे. तेव्हापासून सदर जमिनींची शरणव्वा जमादार हिच निर्विवाद मालक भोगवटदार ठरली आहे.

सदर शरणव्वा जमादार ही वयोवृध्द असून मुलगा नसून केवळ विवाहित मुलगी आहे. त्यामुळे सदर जमीन वहिवाटणे गैरसोयीचे व अनुत्पादक स्वरूपाचे झाले आहे. ती जमीन सद्या पडिक होऊन कसलेही उत्पादन मिळत नाही. त्यामुळे प्रस्तुत जमीन स्वेच्छेने विक्री करणेसंदर्भात श्री. सुरेश भालचंद्र गायकवाड, रा. सोलापूर यांचेशी बोलणी करून त्यांच्या हक्कात रजिस्टर साठेखताचा दस्त लिहून नोंदवून दिला आहे. ती मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची हमी साठेकराराच्यावेळी दिलेली आहे.

याशिवाय सदरची जमीन ही नवीन शर्तीची भोगवटदार वर्ग-२ ची सत्ता प्रकारातील असल्याने प्रस्तुत जमीन हस्तांतरणांस मा. जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. त्यामुळे जमीन विक्रीसाठी परवानगी मिळावी म्हणून मे. अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर (कुळ कायदा शाखा) यांच्याकडे प्रस्ताव दिला आहे.

तरी सदर शेतजमीनी संदर्भात अगर त्याअनुषंगाने झालेल्या व्यवहाराबाबत कोणाची हरकत, हितसंबंध असल्यास, शिवाय या मिळकतीसंदर्भात कोणाचा करार, मदार, लीज भाडेपट्टा, पेटगी, हक्क, वारसा हक्क बोजा गहाण, दान, लीज, कर्ज, मृत्युपत्र, खरेदी विक्री साठेखत दस्त, सावकारी बोजा, वगैरे काही हितसंबंध गुंतले असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यासपासून ०७ दिवसाचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळ कायदा शाखा) याकडे पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची कसलीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर व्यवहाराच्या पुर्व परवानगीची प्रक्रिया निर्वेध, निजोखमी व कायदेशीर असल्याचे समजून पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरचे प्रसिध्दीकरण केले ता. १०/०३/२०२६.

**सही/-**
**श्री. शरणव्वा सायबण्णा जमादार**
**करीता ॲड. मंजुश्री एस. खरसडे-देशमुख**
**कार्या. : बेसकर चेंबर नं. १०८,**
**जिल्हा न्यायालयाचे शेजारी,**
**सोलापूर मो.नं.९१३०५५५८८१**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. दिपक भास्कर केसकर**
बी.ए., एल.एल.एम (ॲडव्होकेट)
प्लॉट नं. ९ प्राची अपार्टमेंट, गांधी नगर,
२२४/९ सिव्हील लाईन सोलापूर ४१३००३

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर** - **अर्जदार / वादी**
विरुध्द
**श्री. अनिकेत निशिकांत कुलकर्णी - वगैरे ३** - **जाबदार / प्रतिवादी**
**संगिता निशिकांत कुलकर्णी - वगैरे ४**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादाचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०४/२०२५ | नं. २ संगिता निशिकांत कुलकर्णी ब्लॉक नं. ४७ सी, अमोल नगर ज्ञानेश्वर नगर बसस्टॉप शेजारी जुळे सोलापूर, सोलापूर-४१३००८ | १५,७५,२८९/- | २०/०३/२०२६ |
| २ | ०४/२०२५ | नं. ४ जमादार लक्ष्मी राम ब्लॉक नं. ४७ सी, अमोल नगर, ज्ञानेश्वर नगर बसस्टॉप शेजारी जुळे सोलापूर, सोलापूर-४१३००८ | १५,७५,२८९/- | २०/०३/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ व नं.४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. २ व नं. ४ ची नोटीस काढून खूप दिवस झालेले असून त्यांची नोटीसीची पोच पावती परत मिळत नसल्याकारणाने नं. २ व नं. ४ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. २ व नं. ४ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार - शुक्रवार दिनांक २०/०३/२०२६ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०२/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकरी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, लि., सोलापूर**

**ठिकाण** : श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
पत्ताः प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

---

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी नगरपरिषद हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील मिळकत सि.स.नं. ४०६ याचे मालमत्ता पत्रकावरील क्षेत्रफळ ७६.५० चौ.मी. व प्रत्यक्ष जागेवरती क्षेत्रफळ ८८.३९२ चौ.मी. याची जागेवरती मोजमापे लांबी पुर्व-पश्चिम फुट ५०, याचे मी. १५.२४ व रुंदी दक्षिण-उत्तर फुट १९, याचे मी. ५.८०, यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - जगदाळे यांची मिळकत, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस- बोळ रस्ता व उत्तरेस - झरेगांवकर यांची जागा, यात पुर्वेकडील बाजुस आर.सी.सी. बांधकामाच्या दोन खोल्या तळमजल्यावर असून, पुढील पश्चिमेकडील बाजुस जुने दगड-मातीचे माळवदाचे दोन मजली कच्चे बांधकाम, यात स्वतंत्र विज कनेक्शन व नळ कनेक्शनसह, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक वर्णनाची मिळकत, आतील बांधकामासह, वगैरे तदंगभूत वस्तुंसह, वहिवाटीचे हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही हेमा उर्फ निता शहजादा सय्यद, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांच्या मालकीची असून, मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही हेमा उर्फ निता शहजादा सय्यद यांनी योग्य त्या बाजारभाव किंमतीने विक्री करण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकत विक्रीबाबत आमचे अशिलांसोबत इसार पावतीचा करार केलेला आहे. सदर मिळकत ही स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची, निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकाने आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलांचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसांच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलांचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १०/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत पांडुरंग एडके**
**बी.एस.एल., एलएल.एम.**
**कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,**
**खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**मो. नं. ७३८५११०१८५ / ९८२२८१६४७८**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

---

# बायकोशी तक्रारीमुळे तोंडावर जखम

**सोलापूर, दि. १० मार्च-**
राहत्या घरी बायकोसोबत तक्रार चालू असताना रवी बन्सी कय्यावले (वय ३६, रा. लष्कर, लोधी गल्ली) हे धक्काबुक्की करताना पडल्याने तोंडावर जखम झाली. उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे नातेवाईक रोहित मनसावाले यांनी दि. १० मार्च रोजी दाखल केले. सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

कि. अर्ज नं. ११६/२०२५

**बार्शी येथील मे. सि.ज. ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **सुनिता भाऊसाहेब चव्हाण,**
वय - ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा. तांबेवाडी तांडा (भातंबरे),
ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **समर्थ भाऊसाहेब चव्हाण**
वय - १९ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **मिनाक्षी भाऊसाहेब चव्हाण**
वय - २५ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर
— **अर्जदार**

विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्या अर्थी, यातील अर्जदार हे मौजे बार्शी येथील कायमचे रहिवासी आहे. अर्जदार नं. १ यांचे अर्जदार नं. २ व ३ हि मुले ओहत. तसेच अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण हे दि. ०६/०८/२०२५ रोजी तांबेवाडी तांडा (भातंबरे) येथे मयत झालेले आहेत. मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांचे अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांना अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांच्या पश्चात मिळणाऱ्या शासकीय व निमशासकीय लाभास अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांना एकमेव जवळचे व कायदेशीर वारस होते व आहेत. मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांच्या मृत्युनंतर मिळणारे शासकीय लाभ घेण्यासाठी यातील अर्जदार संबंधीत अधिकाऱ्याकडे गेले असता, सदर अधिकारी यांनी मे. कोर्टातून मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांना कोण वारस आहेत याबाबत वारस प्रमाणपत्र आणणेसंबंधी कळविलेले आहे. त्यामुळे यातील अर्जदाराने सदरचा अर्ज हा मयत भाऊसाहेब लक्ष्मण चव्हाण यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी, सदर प्रकरणी अर्जदाराचे मागणीबाबत जर कोणाची काही हरकत अथवा तक्रार असल्यास सदर जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा सदर प्रकरणी पुढील नेमेलेली तारीख १७/०४/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः अथवा विद्याज्ञामार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. तसे न केल्यास आपणास कोणतेही म्हणणे देण्याचे नाही असे समजणेत येवून सदर प्रकरणी योग्य ते आदेश पारीत होतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रकटीकरण दिले असे. ता. ०४/०३/२०२६

**सही/-** **लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. बार्शी**

---

## जाहीर सूचना

तमाम लोकास विशेषतः मोहोळ तालुका पंचक्रोशातील लोकांना कळविण्यात येते की, डि व सब डी सोलापूर पैकी तालुका मोहोळ पैकी मौजे मसलेचौधरी येथील शेतजमीन गट नं. ३०१/१/अ यांसी एकूण क्षेत्रफळ २ हे. ०७ आर यांसी आकार ३ रुपये ०० पैसे याचा खाते नं.४९३ ही जमीन श्री. मारुती रतन अंधारे यांना भूमिहिनाची सोय म्हणून नविन/सेलिंग/वाशी/२१४ दि. १६/०४/१९७९ चे आदेशाने दि.३०/०५/१९७९ रोजी पात्र लाभार्थी म्हणून मिळालेली आहे. सदर जमीन ही मुळ गट नं. ३०१ याचे एकूण क्षेत्रफळ ३५ एकर ० गुंठे यामधील असून सदरची जमीन रंगराव गोवर्धन पाटील यांची होती. ती जमीन महाराष्ट्र शेतजमीनी (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मधील तरतुदी अन्वये अतिरिक्त जमीन म्हणून घोषित झाली होती. या संदर्भात मा. उपविभागीय अधिकारी माढा (कुर्डुवाडी) यांच्याकडे सेलिंग आदेश क्र.५२/६०/७६ दि.१५/०४/१९७८ अन्वये भूमीहीनांना देण्याचा आदेश झाला. त्यामध्ये मारूती रतन अंधारे यांना प्रस्तुत जमिनीपैकी विभाजनातील गट नं. ३०१/१/अ यांसी क्षेत्र ०२ हे. ०७ आर. ही जमीन फेरफार नं. १७२ अन्वये प्राप्त झाली आहे.

सदर जमीन अनुउत्पादक ठरत असल्याने व शारिरीक अकार्यक्षमतेमुळे जमीन वहिवाटणे श्री. मारूती रतन अंधारे यांना व त्यांच्या कुटुंबियांना शक्य होत नसल्याने सौ. अस्मिता सुरेश गायकवाड, यांच्याशी सदर जमीन खरेदी देण्याचे ठरवून बोलणी केली आहेत. तसेच ही शेतजमीन भोगवटदार वर्ग-२ सत्ता प्रकारात समाविष्ट होत असल्याने मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आदेशाशिवाय जमीन हस्तांतरणांस बंदी आहे. त्यामुळे जमीन विक्रीस परवानगी मिळणेकरिता प्रस्ताव दाखल करण्याचे अधिकार सुरेश भालचंद्र गायकवाड यांना रजिस्टर कुलमुखत्यारपत्राने दिलेले आहेत. त्या अधिकारात मूळ जमीनधारक मारूती रतन अंधारे यांनी जमीन विक्रीस परवानगी मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळ कायदा शाखा) यांच्याकडे दिला आहे. तो चौकशीकामी मा. तहसिलदार मोहोळ यांच्या कार्यालयाकडे देण्यात आला होता.

तरी सदर शेतजमीनी संदर्भात अगर त्याअनुषंगाने झालेल्या व्यवहाराबाबत कोणाची हरकत, हितसंबंध असल्यास, शिवाय या मिळकतीसंदर्भात कोणाचा करार, मदार, लीज भाडेपट्टा, पेटगी, हक्क, वारसा हक्क बोजा गहाण, दान, लीज, कर्ज, मृत्युपत्र, खरेदी विक्री साठेखत दस्त, सावकारी बोजा, वगैरे काही हितसंबंध गुंतले असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यासपासून ०७ दिवसाचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळ कायदा शाखा) याकडे पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची कसलीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर व्यवहाराच्या पुर्व परवानगीची प्रक्रिया निर्वेध, निजोखमी व कायदेशीर असल्याचे समजून पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरचे प्रसिध्दीकरण केले ता. १०/०३/२०२६.

**सही/-**
**श्री. मारूती रतन अंधारे**
**करीता ॲड. मंजुश्री एस. खरसडे-देशमुख**
**कार्या. बेसकर चेंबर नं. १०८,**
**जिल्हा न्यायालयाचे शेजारी,**
**सोलापूर मो.नं. ९१३०५५५८८१**

---

**श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था**
**श्री नीलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान, सोलापूर**
**१९१, साखर पेठ, सोलापूर (नोंदणी क्रमांक -अ-७०/ सोलापूर)**

## विश्वस्त मंडळ पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम सुचना

सोलापूर येथील श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था श्री. नीलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान, सोलापूर सार्वजनिक न्यास नोंदणी क्र. -७० (सोलापूर) या संस्थेची मंजूर योजनेतील (स्किम) तरतुदीनुसार १५ विश्वस्त मंडळाची सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिकसाठी गुप्त मतदान पध्दतीने होणाऱ्या निवडणुक संदर्भात मी ॲड. अजित अशोक करंदीकर निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवडणुकीची सुचना प्रसिध्द करीत आहे.

### निवडणूक कार्यक्रम पत्रिका

| | | |
|---|---|---|
| १ | दि.१७/०३/२०२६ रोजी वार - मंगळवार सकाळी १२.०० | संस्थेच्या नोटीस बोर्डावर मतदार यादी प्रसिध्दी करणे |
| २ | दि.१८/०३/२०२६ रोजी वार - बुधवार दुपारी १२ ते ३.०० | मतदार यादीतील नावात दुरुस्ती, सुचना अगर हरकती नोंदविणेबाबत |
| ३ | दि.१९/०३/२०२६ रोजी वार - गुरुवार दुपारी १२.०० वाजता | संस्थेच्या नोटीस बोर्डावर पात्र मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे |
| ४ | दि.२०/०३/२०२६ रोजी वार - शुक्रवार व दि.२१/०३/२०२६ रोजी वार - शनिवार दुपारी १२ ते ३.०० | संस्थेच्या कार्यालयात उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज देणे व स्विकारणे |
| ५ | दि.२२/०३/२०२६ रोजी वार - रविवार दुपारी ४.०० ते ६.०० | संस्थेच्या कार्यालयात नामनिर्देशन अर्जाची छाननी करणे व पात्र उमेदवारांची यादी संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे |
| ६ | दि.२३/०३/२०२६ रोजी वार - सोमवार दुपारी १२. ते ०५.०० | उमेदवारांचा नामनिर्देशन उमेदवारी अर्ज माघार घेणेबाबतचे अर्ज संस्थेच्या कार्यालयात स्विकारणे. |
| ७ | दि.२४/०३/२०२६ रोजी वार - मंगळवार दुपारी १२.०० वा. | निवडणुकीस पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे |
| ८ | दि.२९/०३/२०२६ रोजी वार - रविवार सकाळी ८. ते सांय. ६.०० | मतदान - स्थळः श्री. निलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान, १९१, साखर पेठ, सोलापूर |
| ९ | दि.३०/०३/२०२६ रोजी, वार - सोमवार सकाळी ०९ वाजल्यापासून प्रक्रिया मतमोजणी पुर्ण होईपर्यत | संस्थेच्या मंदिरात मतमोजणी व निवडणुकीचा निकाल जाहीर करणे |

**टिपः-**
१) सदरची विश्वस्त मंडळाची निवडणूक संस्थेच्या मंजूर योजनेतील (स्किम) तरतुदीनुसार होईल.
२) निवडणुक संदर्भात निवडणुकीची कार्यक्रमपत्रिका संस्थेच्या नोटीस बोर्डावर डकवली आहे.
३) इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज शुल्क रुपये १००/- संस्था कार्यालयात भरुन रितसर पावती घेऊन निर्देशन अर्ज घ्यावे.
४) उमेदवारांनी रुपये ५००/- रोख भरुन नामनिर्देशन पत्रासोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे निवडणूक ठेव (डिपॉझीट) भरल्याशिवाय निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.
५) निवडणूक चिन्हांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी, श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था, श्री. निलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान, सोलापूर येथील कार्यालयात पाहण्यास मिळेल.
६) संस्थेची मंजूर योजना (स्किम) व नियमावली, नामनिर्देशन अर्ज, सभासद यादी, निवडणूक चिन्ह, निवडणुकीचे अटी व इ. सुचना संस्थेच्या कार्यालयात सकाळी १० ते २ व दुपारी ४ ते ६ पर्यंत पाहण्यास मिळेल.

**स्थळः - सोलापूर**
**दिनांक ०९/०३/२०२६**

शिक्का

**सही/-**
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**ॲड. अजित अशोक करंदीकर**
**बी.कॉम., एल.एल.बी., ॲडव्होकेट**
**श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था**
**श्री. निलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान, सोलापूर**

---

# कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी

**ता. बार्शी, जि. सोलापूर फोन. - ०२१८४-२२२९७६**
**E-mail :- am_barshi@msamb.com**

## जाहिर प्रसिध्दीकरण

कृषि उत्पन्न बाजार समितीचे लातूर रोड गट नं.१३९८/२ व उपबाजार वैराग मधील १००० मे.टन क्षमतेचे कोल्ड स्टोअरेज करीता मासिक एकत्रिक मेहनतानावर तांत्रिक कामगार व इतर कामगार यांची नेमणूक एक वर्ष कालावधी करीता करावयाची आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | कामाचे स्वरुप | पात्रता | कामगार संख्या | मासिक एकत्रित मेहनताना |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुपरवायझर | लातूर रोड गट नं.१३९८/२ व उपबाजार वैराग मधील १,००० मे.टन क्षमतेचे कोल्ड स्टोअरेच्या कामकाजाची देखभाल करणे /०५ ते १० वर्षाचा कोल्ड स्टोअरेजच्या कामकाजाचा अनुभव असावा. | आय.टी. आय/एम. आर.ए.सी व कोणत्याही शाखेची पदवी | ०१ | रु.२१,०००/- |
| २ | रेफ्रिजरेशन ऑपरेटर | कोल्ड स्टोअरेज ऑपरेट करणे | आय.टी.आय/ एम.आर.ए.सी | ०५ | रु.१८,०००/- |
| ३ | कोल्ड स्टोअरेज कार्यालयीन कामगार | कोल्ड स्टोअरेज मधील मालची आवक, जावक, बिलींग, पत्रव्यवहार व इतर सर्व अनुशंगीक कामकाज पाहणे | कोणत्याही शाखेची पदवी (संगणक ज्ञान आवश्यक) | ०४ | रु. १६,०००/- |

तरी वरील शैक्षणिक पात्रता असणाऱ्या इच्छुकांनी दि. १७/०३/२०२६ रोजी पर्यंत आपले अर्ज शैक्षणिक पात्रतेसह कार्यालयीन वेळेत बाजार समितीकडे सादर करावेत. उशीरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**सचिव**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गगनजित भुल्लर आयजीपीएल २०२६ चे आकर्षण

**चंदीगड** : ११ ते १३ मार्च दरम्यान येथे होणाऱ्या इंडियन गोल्फ प्रीमियर लीग (आयजीपीएल) च्या पहिल्या टप्प्यात गतविजेता गगनजित भुल्लर हा इतर अनेक अव्वल खेळाडूंसह आकर्षणाचे केंद्र असेल. भुल्लरने २०२५ मध्ये आयजीपीएलचे विजेतेपद पटकावले होते आणि यावेळी सर्वांच्या नजरा त्याच्या कामगिरीवर असतील. ११ विजयांसह आशियाई टूरवरील भारताचा सर्वांत यशस्वी खेळाडू भुल्लर व्यतिरिक्त, २०२५ मध्ये आयजीपीएल ऑर्डर ऑफ मेरिट जिंकणारा पुखराज सिंग गिल देखील या स्पर्धेत सहभागी होईल. यासह, आशियाई टूर स्टार करणदीप कोचर आणि अमन राज हे देखील त्यांचे आव्हान कायम ठेवतील. या स्पर्धेत नऊ हौशी खेळाडूंसह एकूण ५८ खेळाडू सहभागी होतील. कोणताही कट-ऑफ नसेल. हौशी खेळाडूंमध्ये जीव मिल्खा सिंग यांचा मुलगा हरजाई मिल्खा सिंग यांचा समावेश आहे.



### राष्ट्रीय निवड चाचण्यांमध्ये मनू भाकर अव्वल

**नवी दिल्ली** : मंगळवारी येथे झालेल्या राष्ट्रीय निवड चाचण्या ३ (ग्रुप अ) च्या महिलांच्या १० मीटर पिस्तूल अंतिम फेरीत ऑलिम्पिकपटू मनू भाकर अव्वल स्थानी राहिली. चाचणी २ ची विजेती संयम दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर ईशा सिंग आठ शूटरच्या अंतिम फेरीत तिसऱ्या क्रमांकावर राहिली. शेवटच्या पात्रता फेरीत अंतिम फेरीत पोहोचलेल्या मनूने दुसऱ्या मालिकेच्या शेवटी आघाडी घेतली आणि नंतर २४६.१ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. संयमने २४१.९ गुणांसह ४.२ गुणांसह आघाडी घेतली. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेती ईशा २२०.६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिली.

### लक्ष्य सेन मोठ्या स्पर्धांवर लक्ष केंद्रित करणार

**नवी दिल्ली** : ऑल इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पराभव झाल्यानंतर निराश झालेला भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने कबूल केले आहे की आधुनिक पुरुष एकेरी स्पर्धेतील वाढत्या शारीरिक गरजांमुळे त्याला त्याच्या पुनर्प्राप्ती आणि तयारीच्या धोरणावर पुनर्विचार करावा लागत आहे. लक्ष्य सेन दुसऱ्यांदा ऑल इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. बर्मिंगहॅममध्ये त्याने अनेक कठीण सामने खेळले. अंतिम फेरीत तो चिनी तैपेईच्या लिन चुन-यीकडून पराभूत झाला. २४ वर्षीय लक्ष्य सेन म्हणाला, एकंदरीत, हा आठवडा चांगला होता पण भावनिक होता. दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचणे आणि जेतेपद न जिंकणे सामन्यानंतर थोडे निराशाजनक वाटते. संपूर्ण स्पर्धेकडे पाहता, मला काही चांगले विजय मिळाले, चांगली मोहीम मिळाली आणि मी माझे सामने ज्या पद्धतीने खेळलो त्यामुळे मला आगामी स्पर्धांसाठी ऊर्जा मिळाली. लक्ष्यने या आठवड्यात कोर्टवर पाच तासांपेक्षा जास्त वेळ घालवला. यामध्ये एक अतिशय कठीण उपांत्य फेरीचा समावेश होता. त्यानंतर अंतिम फेरीत त्याला निकटचा पराभव पत्करावा लागला. त्याने सांगितले की या अनुभवामुळे स्पर्धेचे वेळापत्रक, पुनर्प्राप्ती आणि पद्धतशीर प्रशिक्षण यांचे संतुलन राखण्याचे महत्त्व त्याला अधिक बळकटी मिळाली आहे. लक्ष्य म्हणाला की व्यस्त वेळापत्रकामुळे, कामाचे व्यवस्थापन (सराव आणि स्पर्धा निवडण्यात सतर्क राहणे) देखील खूप महत्त्वाचे झाले आहे.

### वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंसाठी विमाने निश्चित

**कोलकाता** : कोलकाताहून चार्टर्ड विमान रद्द झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने भारतात अडकलेल्या वेस्ट इंडीज आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांसाठी स्वतंत्र व्यावसायिक विमान उड्डाणे आरक्षित केली आहेत. या प्रकरणी आयसीसीच्या सूत्राने सांगितले की, वेस्ट इंडीज आणि दक्षिण आफ्रिकेच्या सर्व खेळाडूंसाठी वेगवेगळी व्यावसायिक विमाने निश्चित केली आहेत. त्यांना एकाच विमानाने जाता येणार नाही. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी खेळाडूंशी वैयक्तिकरीत्या बोलून त्यांना सुरक्षित मायदेशी परतण्याचे आश्वासन दिले आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की डॅरेन सॅमी सोमवारी रात्री मायदेशी परतण्यासाठी रवाना झाला.

### पॅरा बॅडमिंटन स्पर्धेत कृष्णा नागरचे दुहेरी यश

**हैदराबाद** : पॅरालिम्पिक विजेत्या कृष्णा नागरने मंगळवारी येथे झालेल्या ७ व्या सीनियर राष्ट्रीय पॅरा बॅडमिंटन स्पर्धेत ६ प्रकारांत दोन सुवर्णपदके जिंकली. पुरुष एकेरी ६ च्या अंतिम फेरीत कृष्णाने सुदर्शन एमएसचा २१-१०, २१-१९ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. त्यानंतर कृष्णाने नित्या श्री सुमथी सिवनसोबत मिळून मिश्र ६ प्रकारात आपले दुसरे सुवर्णपदक जिंकले. या जोडीने सुदर्शन एमएस आणि श्रेया कुमारी यांचा २१-७, २१-११ असा पराभव केला. ६ हा पॅरा बॅडमिंटनमधील एक प्रकार आहे जो कमी उंचीच्या खेळाडूंसाठी असतो.

# भारतीय संघाला मिळणार १३१ कोटी रुपये

## बीसीसीआयने केले बक्षीस जाहीर ● खेळाडूंसह इतर सदस्यही होणार धनवान

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

२०२६ च्या टी-२० विश्वचषकातील भारतीय संघाच्या ऐतिहासिक विजयाबद्दल भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) घसघशीत बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. मंगळवारी बोर्डाने जाहीर केले की, संपूर्ण भारतीय पथकाला १३१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस मिळेल. हे बक्षीस खेळाडूंना तसेच प्रशिक्षक कर्मचारी आणि इतर सहायक कर्मचाऱ्यांना वाटले जाईल.

या रकमेत १५ खेळाडू, प्रशिक्षक कर्मचारी आणि इतर सहायक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. खेळाडूंना बक्षीस रकमेचा सर्वांत मोठा वाटा मिळेल असे वृत्त आहे, तर सहायक कर्मचाऱ्यांना मिळणारी रक्कम त्यांच्या जबाबदाऱ्या आणि पदांनुसार निश्चित केली जाईल.

या वर्षी जाहीर केलेली १३१ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम २०२४ च्या टी-२० विश्वचषकानंतर देण्यात आलेल्या १२५ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. याचा अर्थ बोर्डाने मागील पुरस्कारापेक्षा जास्त रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे.

बीसीसीआय सचिव देवजित सैकिया यांनी संघाचे अभिनंदन करताना म्हटले आहे की, बोर्ड पुन्हा एकदा या ऐतिहासिक कामगिरीबद्दल खेळाडू, सहायक कर्मचारी आणि निवडकर्त्यांचे अभिनंदन करतो आणि भविष्यात त्यांना सतत यश मिळावे अशी शुभेच्छा देतो.

भारतीय संघाने अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करून टी-२० विश्वचषक जिंकला. या विजयासह, भारतीय संघाने केवळ आपले विजेतेपद यशस्वीरीत्या राखले नाही तर सलग दोनदा टी-२० विश्वचषक जिंकणारा स्पर्धेच्या इतिहासातील पहिला संघ बनला. (वृत्तसंस्था)





### भारताने इतिहास रचला

या विजयासह, भारत पुरुषांचा टी-२० विश्वचषक तीन वेळा जिंकणारा पहिला संघ ठरला. या कामगिरीसह, भारतीय संघाने टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी संघांपैकी एक म्हणून स्वतःचा नावलौकिक केला. भारताने पहिल्यांदाच सलग तीन आयसीसी चषक जिंकले. २०२४ च्या टी-२० विश्वचषक आणि २०२५ च्या चॅम्पियन्स चषकानंतर, भारताने हा टी-२० विश्वचषक जिंकला आणि जगभरात भारताचे वर्चस्व प्रस्थापित केले.

# मॅथ्यू हेडन गुजरात टायटन्सचे फलंदाजी प्रशिक्षक

◆ **अहमदाबाद, १० मार्च**

गुजरात टायटन्सने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) च्या आगामी हंगामासाठी माजी ऑस्ट्रेलियन सलामीवीर मॅथ्यू हेडन यांची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा फ्रँचायझीने मंगळवारी केली.




दोन वेळा एकदिवसीय विश्वचषक विजेता आणि त्याच्या काळातील सर्वांत प्रभावशाली सलामीवीरांपैकी एक, हेडनची आंतरराष्ट्रीय कारकीर्द उल्लेखनीय आहे. त्यांना व्यापक अनुभव आहे.

हेडनने सर्व फॉरमॅटमध्ये २७३ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले आहे आणि १५,००० हून अधिक धावा केल्या आहेत. अनेक आयसीसी स्पर्धांमध्ये विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

गुजरात टायटन्सचे क्रिकेट संचालक विक्रम सोलंकी म्हणाले, मॅथ्यूची नियुक्ती आमच्या प्रवासातील एका महत्त्वाच्या टप्प्यावर आली आहे. उच्च स्तरावरील त्यांचा अनुभव आणि उदयोन्मुख प्रतिभेला मार्गदर्शन करण्याची त्याची क्षमता येत्या हंगामात आमच्यासाठी महत्त्वाची ठरेल.

याविषयी हेडन म्हणाले, चांगली फलंदाजी दबाव निर्माण करते. उत्तम फलंदाजी खेळावर वर्चस्व गाजवते. आम्हाला गुजरात टायटन्समध्येही हेच मानक स्थापित करायचे आहे. हेडनने आयपीएलमध्ये ३२ सामने खेळले आहेत. ते त्यांचे माजी ऑस्ट्रेलियन संघसहकारी मॅथ्यू वेडची जागा घेतील, जो गेल्या हंगामात गुजरात टायटन्सचा सहायक प्रशिक्षक होता. (वृत्तसंस्था)

# गोल्फपटू अक्षय भाटियावर सर्वांच्या नजरा

### इंडियन ओपन गोल्फमध्ये सहभाग

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

प्रतिष्ठित अर्नोल्ड पामर इन्व्हिटेशनल २०२६ जिंकून प्रसिद्धिझोतात आलेला भारतीय-अमेरिकन गोल्फर अक्षय भाटिया, हिरो इंडियन ओपनमध्ये भाग घेणाऱ्या जगातील अव्वल खेळाडूंमध्ये असेल.

आशियातील सर्वात प्रतिष्ठित गोल्फ स्पर्धांपैकी एक असलेली इंडियन ओपन २६ ते २९ मार्च दरम्यान गुरुग्राममधील डीएलएफ गोल्फ अँड कंट्री क्लब येथे आयोजित केली जाईल. मंगळवारी येथे एका कार्यक्रमात आयोजकांनी घोषणा केली की स्पर्धेची बक्षीस रक्कम विक्रमी २.५५ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे २३.४२ कोटी रुपये) पर्यंत वाढवण्यात आली आहे, विजेत्याला ४३३,५०० (अंदाजे ४ कोटी रुपये) बक्षीस रक्कम मिळेल.



भाटिया व्यतिरिक्त, स्पेनचा विद्यमान विजेता युजेनियो चाकारा, बेल्जियमचा थॉमस डेट्री (पीजीए टूरवर २०२५ फिनिक्स ओपन विजेता), दक्षिण आफ्रिकेचा सध्याचा डीपी वर्ल्ड टूर विजेता केसी जार्विस, स्पेनचा नाचो एल्विरा आणि जर्मनीचा फ्रेडी स्कॉट यांनी या स्पर्धेत आपला सहभाग निश्चित केला आहे.

२४ वर्षीय अक्षय भाटियाने लहान वयात आंतरराष्ट्रीय गोल्फमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्याने पीजीए टूरवर तीन आणि कॉर्न फेरी टूरवर एक जेतेपद जिंकले आहे. गेल्या दोन वर्षांत टूर चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरलेल्या सर्वांत तरुण खेळाडूंपैकी तो आहे. भाटियाचा हा पहिलाच भारत दौरा असेल, कारण तो फेडेक्स कप रँकिंगमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे.

माजी उपविजेता वीर अहलावत, पीजीटीआय ऑर्डर ऑफ मेरिट (२०२५) विजेता युवराज संधू, मनु गंडास आणि शौर्य भट्टाचार्य या स्पर्धेत भारतीय आव्हानाचे नेतृत्व करतील.

इंडियन गोल्फ असोसिएशनचे अध्यक्ष बृजिंदर सिंग म्हणाले, या वर्षी या स्पर्धेत प्रमुख आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होत आहेत आणि बक्षिसाची रक्कम २.५५ दशलक्ष डॉलर्सपर्यंत वाढवण्यात आली आहे. कोर्सची स्थिती देखील उत्कृष्ट आहे, ज्यामुळे स्पर्धेचा स्तर उंचावेल अशी अपेक्षा आहे. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या आव्हानांबद्दल विचारले असता ते म्हणाले, काही आव्हाने आहेत, परंतु आतापर्यंत कोणत्याही खेळाडूंनी प्रवासात अडचणी येत असल्याची तक्रार केलेली नाही. (वृत्तसंस्था)

# संजू सॅमसन टी-२० विश्वचषकात सर्वोत्तम खेळाडू

### ९ पैकी ५ सामन्यांत प्रतिनिधित्व

◆ **नवी दिल्ली, १० मार्च**

भारताच्या टी-२० विश्वचषक विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावणारा सलामीवीर संजू सॅमसनने नुकत्याच संपलेल्या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू बनून एक अनोखा विक्रम रचला आहे.

सॅमसन त्याच्या संघासाठी ९ पैकी ५ सामने खेळला. असे असूनही कोणत्याही आयसीसी (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) पुरुष किंवा महिला स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जिंकणारा पहिला खेळाडू ठरला. त्याच्या आधी, फक्त चार खेळाडूंनी त्यांच्या संघाचे सर्व सामने गमावले असूनही सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जिंकला होता. तथापि, या खेळाडूंनी त्यांच्या संघासाठी फक्त एक सामना गमावला होता.

स्पर्धेच्या सुरुवातीला, सॅमसनला धावा करण्यात संघर्ष करावा लागला आणि त्यामुळे सुरुवातीच्या सामन्यांमध्ये प्लेइंग इलेव्हनमध्ये त्याची निवड झाली नाही. अभिषेक शर्माच्या आजारपणामुळे त्याला एक सामना खेळण्याची संधी देण्यात आली होती, परंतु नंतर त्याला वगळण्यात आले.




सुपर एटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मोठ्या पराभवानंतर, भारताने त्यांच्या वरच्या फळीत डावखुऱ्या फलंदाजांचे वर्चस्व पाहता, उजव्या हाताचा फलंदाज सॅमसनला संधी दिली आणि केरळच्या या खेळाडूने कधीही मागे वळून पाहिले नाही.

सॅमसनने वेस्ट इंडीजविरुद्धच्या सामन्या मध्ये नाबाद ९७ धावा केल्या. त्यानंतर त्याने इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यात ८९ आणि न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात आणखी ८९ धावा केल्या, ज्यामुळे भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. यासाठी त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले.

भारत या स्पर्धेत एकूण नऊ सामने खेळला. त्यापैकी सॅमसन फक्त पाच सामने खेळला.

आयसीसी स्पर्धेत एकही सामना न खेळता प्लेअर ऑफ द टूर्नामेंट पुरस्कार जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये ऑस्ट्रेलियाची लिसा कीटली (महिला एकदिवसीय विश्वचषक २०००), ऑस्ट्रेलियाची करेन रोल्टन (महिला एकदिवसीय विश्वचषक २००५), इंग्लंडचा केविन पीटरसन (पुरुषांचा टी-२० विवचषक २०१०) आणि न्यूझीलंडचा रचिन रवींद्र (चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५) यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# ईशानचे पाटण्यात जोरदार स्वागत



ईशान किशन जयप्रकाश नारायण आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाला तो क्षण

◆ **पाटणा, १० मार्च**

भारताचा अव्वल क्रमांकाचा फलंदाज ईशान किशन मंगळवारी पाटण्यात पोहोचला. यावेळी त्याचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. टी-२० विश्वचषकात भारताच्या जेतेपदात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

काही महिन्यांपूर्वीपर्यंत तो राष्ट्रीय संघात नव्हता हे लक्षात घेता, ईशानचे पुनरागमन खूपच प्रेरणादायी होते. डावखुरा फलंदाज ईशानने रविवारी अहमदाबादमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात अर्धशतक झळकावले आणि यापूर्वी पाकिस्तानविरुद्ध कठीण खेळपट्टीवर सामना जिंकणारी खेळी खेळली होती. अंतिम सामन्याच्या तयारीदरम्यान, ईशानच्या चुलत भावाचा अपघातात मृत्यू झाला होता. पाटणा येथे पोहोचल्यानंतर ईशान म्हणाला की संघ भविष्यात अधिक जेतेपद जिंकण्यासाठी वचनबद्ध आहे. हे भारताचे विक्रमी तिसरे टी-२० विश्वचषक विजेतेपद आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये झारखंडकडून खेळणारा ईशान म्हणाला की, भारतीय संघाचा विजय हा संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे. (वृत्तसंस्था)

### अर्शदीप सिंगला मानधनाच्या १५ टक्के दंड

**दुबई** : अहमदाबाद येथे झालेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा फलंदाज डॅरिल मिशेलला चेंडू मारण्याबद्दल भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगला त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने मंगळवारी एका निवेदनात म्हटले आहे की अर्शदीप खेळाडू आणि खेळाडूंच्या सहायक कर्मचाऱ्यांसाठी आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.९ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला आहे. जे आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान खेळाडूवर किंवा त्याच्या जवळ अयोग्य आणि/किंवा धोकादायक पद्धतीने चेंडू (किंवा इतर कोणतीही क्रिकेटशी संबंधित वस्तू) फेकण्याशी संबंधित आहे. रविवारी न्यूझीलंडच्या डावाच्या ११ व्या षटकात ही घटना घडली होती. अर्शदीपने चेंडू टाकल्यानंतर तो थांबवला आणि नंतर आक्रमकपणे फलंदाजाकडे फेकला.

### वृंदा बोध्दूल हिला राज्य महिला पुरस्कार

**सोलापूर, दि. १० मार्च -**

क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा आणि सोलापूरचा तिरंगा फडकवणाऱ्या वृंदा. बोध्दूल हिची युनाय फाउंडेशनच्या राज्यस्तरीय 'MH-Women Excellence-२०२६' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. याचे वितरण २१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी पुणे येथे होईल. विविध मान्यवर व युनाय फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा मायाश्री गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गौरव प्रदान केला जाईल.




**वयाच्या १२ व्या वर्षापासून पदकांचा प्रवास**

वृंदाने वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षापासून योगा, प्राणायाम, सूर्यनमस्कार आणि एरोबिक्स यांसारख्या शारीरिक आणि मानसिक कौशल्याच्या क्रीडा प्रकारांमध्ये प्रभुत्व मिळवले. यात तिने जिल्हा आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक सुवर्ण आणि रौप्य पदके पटकावून आपली छाप पाडली आहे. २०२५ मध्ये दुबई येथे झालेल्या 'आंतरराष्ट्रीय एरोबिक्स स्पोर्ट्स' स्पर्धेत तिने सुवर्णपदक पटकाविले.

# ह.दे.च्या माजी विद्यार्थ्यांचा क्रिकेट रंगोत्सव



### प्रमोद नारकर विजेते, डॉ. मुकुंद रॉय उपविजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर १९७८ सालच्या माजी विद्यार्थ्यांचा रंगपंचमीनिमित्त क्रिकेट रंगोत्सव उत्साहात साजरा झाला.

अतिशय उत्कृष्टपणे चाललेल्या या स्पर्धेमध्ये सिंगल विकेट क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रमोद नारकर यांनी विजेतेपद पटकाविले. डॉ. मुकुंद रॉय यांनी उपविजेतेपदाचे पारितोषिक मिळविले. या स्पर्धेमध्ये त्या बॅचचे अनेक खेळाडू सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण ह.दे.प्रशालेचे शालेय समितीचे नूतन अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी यांच्या हस्ते झाले. त्यांचे स्वागत क्रीडा मार्गदर्शक प्रकाश कंपली यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रशांत बडवे यांनी केले. प्रा. मंकणी यांनी आपल्या मनोगतात ६४ वर्षाच्या माजी विद्यार्थ्यांचे आजही या वयात या स्पर्धा खेळत असल्याबाबत आश्चर्य व तसेच ४८ वर्षानंतरही १९७८ बॅचच्या विद्यार्थ्यांची शालेय क्रिकेटची नाळ टिकून असल्याचे कौतुक केले. या बॅचच्या वतीने शालेय क्रिकेटसाठी शाळेच्या मैदानावर क्रिकेट प्रॅक्टिस साठी स्वतंत्र खेळपट्टी व जाळीचे व्यवस्थापन करून देण्यात आले.

या स्पर्धा पार पाडण्याकरिता क्रीडाशिक्षक प्रमोद चुंगे, अक्षय गवळी व प्रकाश कंपली आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केले. राजू रंगम यांनी आभार मानले.

# सोलापूरचा सौरव साहू व रत्नागिरीची मयुरी तावडे विजेती

## बँक ऑफ इंडिया आंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धा; सांघिक गटात सोलापूर व रत्नागिरीस जेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

बँक ऑफ इंडिया विभागीय क्रीडा समिती, सोलापूर यांच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या आंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सोलापूर विभागाच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू सौरव साहू याने पाच पैकी पाच गुण मिळवत तर महिला गटात रत्नागिरीची मयुरी तावडे यांनी चार पैकी चार गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

अतिशय चुरशीने झालेल्या महिलांच्या सांघिक प्रकारात सोलापूर व रत्नागिरी दोन्ही संघाचे समान गुण झाल्यामुळे टाय- ब्रेक मध्ये झालेल्या निर्णायक लढतीत काळ्या सोंगट्या घेऊन खेळणाऱ्या रत्नागिरीच्या मयुरी तावडेने सोलापूरच्या मधुरा देशपांडेचा पराभव केल्याने रत्नागिरीने जेतेपद व सोलापुर संघाने उपविजेतेपद पटकावले. तर सांगलीच्या महिला संघाने तिसरा क्रमांक मिळविला. पुरुष गटात सोलापूरच्या संघाने स्पर्धेत वर्चस्व राखत आठ गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच रत्नागिरीने पाच गुणांसह, कोल्हापूर व नाशिकने चार गुणांसह अनुक्रमे दुसरा, तिसरा व चौथा क्रमांक प्राप्त केला.




स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक चंद्रशेखर मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विभागीय क्रीडा समितीचे सचिव सचिन संकद, बँक ऑफ इंडिया विभागीय क्रीडा समितीचे खजिनदार अमोल सांगळे, बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघटनेचे जनरल सेक्रेटरी ऑब्री अल्मेडा, बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघटना पुणे युनिटचे प्रफुल केंगळे, किशोर इधाते, स्वयंरोजगार ग्रामीण प्रशिक्षण संस्था सोलापूरचे संचालक दिपक वडेवाले, सांगलीचे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विश्वास वेताळ, आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, राष्ट्रीय वरिष्ठ पंच उदय वगरे, विजय पंगुडवाले तसेच बँकेचे अधिकारी, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व प्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

**अंतिम निकाल: (अनुक्रमे १ ते ४, गुण व बुचोल्स गुणांसह)**
**पुरुष** : सौरव साहू (सोलापूर) -५, आशिष गायकवाड (सोलापूर)- ४ (१५), मयूर कलाल (नाशिक)- ४ (१२), पेडणायुनी कृष्णा (रत्नागिरी)-४ (११.५)
**महिला:** मयुरी तावडे (रत्नागिरी) ४, टी मेरी स्टेला (रत्नागिरी)- ३ (१०), स्मिता पाटील (सांगली)- ३ (९.५), राजश्री कुलकर्णी (सांगली)- ३ (८)

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन संकद यांनी केले. दोन्ही गटातील प्रथम आलेल्या चार खेळाडूंना व संघांना आकर्चक चषक, मेडल्स व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वितेसाठी चेतन खाडे, निखिल कुलकर्णी, वीरेश, सागर वाघमोडे आणि राजू किरसावाळगी यांनी विशेष सहकार्य व परिश्रम घेतले.



# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास क्रीडा स्पर्धातून

### मनोहर सपाटे यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. १० मार्च-**

तरुणाच्या जीवनामध्ये खेळ असावा, खेळ नसल्यास त्याचे जीवन शून्य होऊ शकते. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास क्रीडा स्पर्धातुन होतो, असे मत मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागातर्फे पीएम उषा अंतर्गत क्रीडा परिसंवादाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने, विनायकराव पाटील, मॅनेजमेंट कौन्सिल प्रा.सचिन गायकवाड, डॉ. किरण चौगुले, डॉ. दत्तात्रय बिराजदार, प्रा. वैजनाथ कदम मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, प्राचार्य मंजुश्री पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. नितीन मोटे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. संतोष गवळी यांनी केले. डॉ. वाल्मीक किर्तीकर आणि बसवराज भोसे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राणी मोटे यांनी आभार मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



वागदरी गटातून निवडून आलेले नूतन जिल्हा परिषद सदस्य प्रवीण तानवडे यांचा सत्कार करताना अकलूज व कोंडी येथील माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण तोडकर व नीळ.



### ६३ मावळ्यांनी रक्तदान करून छत्रपती संभाजी महाराजांना दिली मानवंदना

**सोलापूर, दि. १० मार्च-**

११ मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त प्रतीवर्षाप्रमाणे संभाजी आरमारच्यावतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. महापौर विनायक कोंड्याल, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता केदार चोबे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नगरसेवक सात्विक बडवे, युवा उद्योजक मनिष सुरवसे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी संभाजीरामाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बापू डांगे उपाध्यक्ष शशिकांत शिंदे सरचिटणीस गजानन जमदाडे संघटक डांगे शहरज्ञ उपप्रमुख राज जगताप, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य पाटील, राजू आखाडे, दक्षिण तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे उपजिल्हाप्रमुख प्रमोद जगताप जिल्हा संघटक अमित कदम, बालाजी पवार, द्वारकेश बबलादी, सागर सांगवी, महिला जिल्हा संघटक ॲड. गीता पवार, शोभा घंटे, रेवन कोळी, शिवानंद कटके, प्रशांत पवार, प्रवीण मोरे, सागर दासी, राजू रच्चा, सुधाकर करनकोट उपस्थित होते..



### ट्रॉय पब्लिक स्कूलमध्ये महिला दिन

**दक्षिण सोलापूर, दि. १० मार्च-**

ट्रॉय पब्लिक स्कूल हत्तूर येथे महिला दिन साजरा करण्यात आला. समाजातील महिलांचे योगदान, त्यांचा सन्मान आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यासाठी हा दिवस विशेष मानला जातो. या निमित्ताने शाळेत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिला पालकांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजित करण्यात आले होते. स्पर्धांमधील विजेत्या महिलांना विविध बक्षिस देण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित महिलांचे गुलाबपुष्प देएन स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष श्रीकांत भरले यांनी आपले विचार मांडत महिलांचे समाजातील महत्त्व व सन्मान याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. जमादार यांनी केले. तर सूत्रसंचालन पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी महेश अवताडे यांनीही महिलांच्या योगदानाबद्दल मार्गदर्शन केले.

## निधन वृत्त...

### रमेश खुने



**सोलापूर, दि. १० मार्च-**

जुळे सोलापूर भागातील रहिवासी आयसीआयआय बँकेचे माजी अधिकारी रमेश खुने ( वय ७३ ) यांचे दि. ९ मार्च २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी, बहिण, भाऊ असा परिवार आहे.

### सरोजा कोणशिरसगी



**सोलापूर, दि. १० मार्च-**

लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रलचे ज्येष्ठ सदस्य व प्रांत ३२३४ डीवनचे माजी प्रांतपाल लायन अरविंद कोणशिरसगी यांच्या मातोश्री सरोजा सदाशिव कोणशिरसगी (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने दि. १० मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे.

# दक्षिण सोलापूर पंचायत समिती सभापती लॉटरी कुणाला?

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १० मार्च-**

पंचायत समिती निवडणूका होऊन एक महिना उलटून गेला तरी दक्षिण सोलापूर पंचायत समिती सभापती उपसभापती पदासाठी अद्याप कुठलेच स्पष्ट नाव पुढे येताना दिसत नाही.गुरुवारी १२ तारखेला पंचायत समिती दक्षिण सोलापूर सभापती,उपसभापती निवडी होणार असून एक दिवसावर निवड आलेली असताना अद्यापही भारतीय जनता पार्टी कडून कमालीची गुप्तता पाळण्यात येत आहे.

पार पडलेल्या पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने निर्विवाद वर्चस्व राखत १२ पैकी ११ जागावरती भाजपचे पंचायत समिती सदस्य निवडून आलेले आहेत.या मध्ये जवळजवळ सारेच नवखे सदस्य असून सभापती पद हे सर्वसाधारण असल्याने ११ पैकी कोणाला संधी मिळेल याची उत्सुकता लागलेली आहे.परंतु भारतीय जनता पार्टी कडून कमालीची गुप्तता पाळण्यात येत आहे. उत्सुकता शिगेला पोचली आहे,.

सध्या राज्यात देशातत भारतीय जनता पार्टी कडून अनेक धक्कातंत्राचा वापर निवड प्रक्रियेत होताना दिसून येत असून त्याचेच अनुसरण करीत शिवसेनेच्या वतीने प्राध्यापक भीमकन्या म्हणून परिचित असलेल्या ज्योती वाघमारे यांना राज्यसभेवरती निवड करीत शिवसेनेने एक सामान्य कुटुंबातील व्यक्तीला सर्वोच्च सभागृहात संधी दिल्याने दक्षिण सोलापूर पंचायत समिती च्या माध्यमातून देखील अशाच पद्धतीने सामाजिक गणित घालत धक्का तंत्र वापर केला जाण्याची दाट शक्यता दिसून येत आहे.



निवडून आलेल्या अकरा सदस्य पैकी भारतीय जनता पार्टी मध्ये पक्षीय कामकाजात तळमळीने निष्ठापूर्वक काम करणारे प्रमुख दावेदार म्हणून चर्चा असलेले बलवान गोतसुर्वे यांची भाजप पक्षनेता पदी निवड करून महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आल्याने त्यांचे नाव सध्या तरी मागे पडले आहे. निवडून आलेले सगळ्यांचे अनुभव पाहता मताधिक्याचा क्रम पाहता या पदासाठी धोत्री गणातील शिल्पाताई बिराजदार, मळसिद्ध मुगळे व बलवान गोतसुर्वे, शिल्पाताई बिराजदार यातूनच सभापती उपसभापती निवड होऊन अक्कलकोट विधानसभा अंतर्गत दक्षिण तालुका व दक्षिण विधानसभा या दोन भागात सभापती व उपसभापती दोन्ही मतदारसंघ आधारे दिले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.मताधिक्याच्या आधारे शिल्पाताई बिराजदार व मळसिद्ध मुगळे यांच्यातुन सभापती व उपसभापती अशी नेमणूक करून दोन्ही भागात एकेक पद दिले जाईल की बलवान गोतसुर्वे यांना पक्षनेता बरोबरच सभापती किंवा उपसभापती पदाची लॉटरी लागेल का? याचीही चर्चा पंचायत समिती आवारात रंगत असून सध्या शिल्पा ताई बिराजदार मळसिद्ध मुगळे बलवान गोतसुर्वे यांची नावे माध्यमाद्वारे आघाडीवर दिसून येत असले तरी आयत्यावेळी कुणाचेही नाव पुढे येण्याची शक्यता असून निवडून आलेल्या सदस्य मधून कोणत्याच नावावर विरोध होण्याची शक्यता नसल्याने पक्षशक्तीसमोर कसलीच अडचण नसले तरी सभापती उपसभापती दादा गटाचे होणार की बापू गटाचे यावर मात्र खमंग चर्चा पंचायत समिती आवारात ऐकण्यास मिळत आहे. त्यामुळे सर्वजण गुरुवारी १२ रोजी होणाऱ्या निवडणुकीकडे लक्ष ठेवून असून नवनिर्वाचित सदस्य पक्षश्रेष्ठींच्या आदेशाची वाट पाहत असून सदस्या मधूनही सर्व काही गुप्ताता पाळली जात आहे.

# संसाराच्या धुरेतून स्वत:साठी वेळ काढा



### जि.प. सदस्या शांभवी कल्याणशेट्टींचे महिलांना आवाहन

### चपळगावात होम मिनिस्टर सोहळ्याचा उत्साह

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

संसाराची धुरा सांभाळणाऱ्या महिलेला स्वत:साठी वेळ मिळत नाही. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो आणि त्यांना एक वेगळा आत्मविश्वास प्राप्त होतो. पाटील परिवाराने आयोजित केलेला हा सोहळा महिला सक्षमीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे, असे प्रतिपादन जि.प. सदस्या शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून चपळगाव आणि बावरकवाडी येथील महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला 'होम मिनिस्टर: सुंदर, परिपूर्ण घरासाठी हा सोहळा संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुमन पाटील होत्या. दीपोत्सव संतोषदादा पाटील मराठी विद्यालय प्रांगणात आयोजित या सोहळ्याचा प्रारंभ झाला. यावेळी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, माता रमाई, ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन आणि स्व. संतोषदादा पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

#### बक्षिसांची लयलूट आणि खेळांची रंगत

प्रसिद्ध सादरकर्ते प्रा. रोहित गुरव यांनी खेळांची मांडणी केली. उखाण्यांची जुगलबंदी आणि विविध कौशल्यावर आधारित खेळांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेत सरस्वती तिवारी यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाची पैठणी साडी व रेफ्रिजरेटर जिंकले. तसेच द्वितीय क्रमांकाचा एल.ई.डी. टी.व्ही.सौ.साक्षी जाधव तृतीय क्रमांकाचा कुलर, शीतल जाधव यांसह गॅस शेगडी आणि मिक्सर, रेश्मा बाणेगाव व सावित्री सागरे यांनी पटकावली अशी अनेक बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. 'लकी ड्रॉ' ने कार्यक्रमाची उत्कंठा शिगेला पोहोचवली होती. यावेळी सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेला भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजीत पाटील मित्रपरिवाराने परिश्रम घेतले.

# मुलाने केला जन्मदात्याचा खून; वाकीशिवणे येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१० मार्च -**

वडिलांनी शेतजमीन विकायला काढल्याचा व ते आपले लग्न करत नाहीत याचा राग मनात ठेवून मुलाने आपल्याच वडिलांचा खून केला असल्याची घटना सोमवार दि.९ मार्च रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास सांगोला तालुक्यातील वाकी शिवणे येथील पाटील वस्ती येथे घडली.



याबाबत अधिक माहिती अशी, पाटील वस्ती वाकी शिवणे ता.सांगोला येथे रमेश बटु कुंभार (वय-५५) यांचे कुटुंब असून ते शेती करून कुटुंबाची उपजिविका भागवित होते. दरम्यान दि.९ मार्च रोजी रा.१० वा.चे सुमारास श्री फिज लाईट आली असल्याने रोजच्या वापरासाठी पाण्याची आवश्यकता असल्याने शेतातील विहीरीवर मोटार चालु करण्यासाठी रमेश कुंभार गेले होते. त्यापूर्वी त्यांचा मुलगा अतुल कुंभार हा देखील शेतातील डाळिंबाच्या झाडांना लिक्वीड सोडण्यासाठी गेला होता. रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास पत्नी समाबाई कुंभार यांनी पती रमेश कुंभार आले नसल्याने आजुबाजुच्या लोकांकडे चौकशी केली असता त्यांना समजले की रमेश कुंभार यांच्या डोकीत, तोंडावर व पायावर कोणत्या तरी हत्याराने मारुन कोणीतरी खुन केला आहे. यावेळी पोलिसांनी तात्काळ या ठिकाणी भेट देत मुलगा अतुल कुंभार याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता वडील रमेश कुंभार यांना शेती विकण्याच्या, बँकेतुन काढलेल्या कर्जाच्या व लग्नाच्या कारणावरुन डोकीत, तोंडावर व पायावर लोखंडी पाईपने मारुन जिवे ठार मारले असल्याचे सांगितले. याबाबत समाबाई रमेश कुंभार (वय-५०) रा.पाटील वस्ती, वाकी शिवणे, ता.सांगोला यांनी मुलगा अतुल रमेश कुंभार (वय-३२) रा.पाटील वस्ती, वाकी शिवणे, ता.सांगोला याच्या विरुद्ध सांगोला पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे.

#### आई मला एवढा वेळ माफ कर

आई समाबाई कुंभार, गावातील काही लोक व नातेवाईक यांनी मुलगा अतुल कुंभार याला काय झाले असे विचारले असता, वडीलांनी ऐवढे कर्ज केले आहे. व त्यांच्या नावावरील ४ एकर शेतजमीन देखील विकायला काढली आहे. माझे लग्न करा म्हणाले तर करत नाहीत. त्यामुळे मी त्यांचा खुन केलेला आहे. आई मला एवढा वेळ माफ कर असे तो म्हणाला.

# शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये महिला दिनानिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. १० मार्च -**



सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विद्यार्थिनींसाठी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष समुपदेशन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख होते. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. रूपाली तरंगे यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत वाढत्या ताणतणावाचे नियोजन कसे करावे याबाबत समुपदेशन करत सुदृढ आरोग्यासाठी सात्विक, पौष्टिक आणि संतुलित आहारासोबतच नियमित व्यायाम व शिस्तबद्ध दिनचर्या पाळण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकातून डॉ. आर.ए.देशमुख यांनी महिला दिनाचे महत्त्व विशद केले. या समुपदेशन वर्गाला कॉलेजच्या वसतिगृहातील सुमारे १४० विद्यार्थिनीं व रेक्टर यांची उपस्थिती होती. या व्याख्यानामुळे विद्यार्थिनींना आपल्या आरोग्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळाला.

# लहान मुलांना पॅकेटबंद पदार्थ देणे टाळा

### डॉ. प्रफुल्ल आमले; बागलवस्ती वस्ती शाळेत स्टॉप कॅन्सर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १० मार्च-**



लहान मुलांना पॅकेटबंद पदार्थ देणं टाळा, कारण त्यात जास्त साखर, मीठ, चरबी आणि रासायनिक टिकवणारे घटक असतात, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह, हृदयाचे विकार, कमी रोगप्रतिकारक शक्ती, पचनाच्या समस्या आणि मुलांमध्ये अतिचंचलता यांसारखे गंभीर आरोग्य धोके निर्माण होऊ शकतात. त्याऐवजी ताजे, घरगुती अन्न आणि फळे देणे उत्तम आहे. मुलांच्या टिफीन बाबत आईने जागृत राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कॅन्सर मिशन मल्टिपर्पज सोसायटी नागपुरचे डॉ. प्रफुल्ल आमले यांनी केले.

महिला दिनाच्या निमित्ताने बारलोणी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बागलवस्ती शाळेत महिलांमध्ये कॅन्सर विषयी जागृती करण्याच्या उद्देशाने स्टॉप कॅन्सर कार्यशाळा संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. महिला दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धामधील विजेत्या महिलांचा बक्षीसे देऊन सन्मान करण्यात आला. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला सुनिता सुरेश बागल, लता सुनील बागल, शालिनी रमेश गोरे, अनुजा बापूसाहेब घोडके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभाकर बागल, शशिकांत गोरे, मुख्याध्यापक निलेश देशमुख, उपशिक्षिका वैशाली रोकडे, अंगणवाडी सेविका सुनीता बागल, उमा बागल, निता भोसले यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी आयोजित विविध स्पर्धेत पूजा गोरे, अर्चना गोरे, रेश्मा बागल, माधुरी गोरे, स्वप्नाली बागल यांनी क्रमांक मिळविले.

# आजपर्यंतच्या राजकीय इतिहासात आपलेच वर्चस्व : दीपकआबा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० मार्च-**



आजपर्यंतच्या राजकीय इतिहासात स्थानिक स्वराज्य संस्थेत नेहमीच आपले वर्चस्व राहिले होते. नगरपालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत आपण कमी पडलो. झालेल्या पराभवाचे शल्य बाजूला ठेऊन आणि झालेल्या चुका टाळून आगामी ग्रामपंचायत निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन माजी आ.दीपकआबा साळुंखे पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत केले.

आजपर्यंतच्या ३० ते ३५ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत पक्ष, पार्टी, जात, धर्म न पाहता कुणाच्याही शिफारशीची वाट न पाहता लोकांची कामे करत गेलो. कालच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही. याबाबत आत्मपरीक्षण करून आगामी काळात कामाची पध्दतीत बदल करु. यापुढे कार्यकर्त्यांच्या जोरावर त्यांना अपेक्षित असणारा निर्णय घेण्यात येईल.

**-दीपकआबा साळुंखे-पाटील**

यावेळी तानाजी पाटील, शिवाजी बनकर, मधुकर बनसोडे, विजय येलपले, चंद्रकांत चौगुले, तुकाराम जाधव, विजय पवार, अनिल खडतरे, सुनील पाटील, ॲड. यशराजे साळुंखे पाटील, डॉ.पियुष साळुंखे-पाटील, समीर पाटील उपस्थित होते. मनोज उकळे, लहू कांबळे, अमर लोखंडे, विजय शिंदे, संतोष पाटील, विलास घुले, संभाजी हरिहर, अजित देवकते, सखुबाई वाघमारे, नारायण माळी, अजिंक्य शिंदे, दिपक कांबळे यांनी दीपकआबा साळुंखे पाटील यांनी सत्ताधारी राजकीय पक्षात प्रवेश करून दीर्घकालीन राजकारण डोळ्यासमोर ठेवून कठोर निर्णय घ्यावा अशी भूमिका मांडली.

### जाहीर समन्स/नोटीस

एम.ए.सी.पी. नं. २६/२०२०
नि. १४

**बार्शी येथील मे. मोटार अपघात न्यायालय साहेब यांचे कोर्टात**

**केशव जाधव** - **अर्जदार**
विरूध्द
**परिमल सावंत**
**परिमल प्रकाश सावंत,**
रा. ८४३, देशमुख प्लॉट, उपळाई रोड,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
यांना,

ज्याअर्थी, तुमचे विरुध्द वरील न्यायालयात, अर्जदार यांनी एम.व्ही. ॲक्ट १६६ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हाला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. कोर्टामार्फत समन्स/नोटीस पाठविले असता सदर समन्स / नोटीसीची बजावणी झालेली नाही. त्यामुळे तुमचे विरुध्दची नोटीस / समन्स न बजावता परत आलेले आहे.

त्याअर्थी तुम्हांला या नोटीस / समन्सने जाहीररित्या कळविण्यात येते की, तुम्ही सदर कामी पुढील नेमली तारीख ३०/०३/२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी या सदर मे. कोर्टात हजर राहून स्वतः किंवा तुमचे वकील यांचे मार्फत अर्जदाराचे अर्जास म्हणणे दाखल करावे अन्यथा तुमचे काहीही म्हणणे नाही असे समजून मे. कोर्ट तुमचे विरुध्द योग्य ते कायदेशीर आदेश करतील. मागावून तुमची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही नोटीस / समन्स जाहीररित्या केले. ता. ०४/३/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**मे. मोटार अपघात न्यायाधिकरण सो.**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**

# आहेरवाडीत घराला शॉर्टसर्किटने आग; लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१० मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथील इरेश भागण्णा बोरुटे यांच्या घराला शॉर्ट सर्किट होऊन अचानक आग लागली. यात संपूर्ण घर जळून भस्मसात झाले . सोने, चांदीसह, रोख रक्कम व संसारोपयोगी साहित्य जळून दीड ते दोन लाखांचे नुकसान झाले आहे. मंगळवार सकाळी ६ वाजता शॉक सर्किट होऊन अचानक घराला आग लागली.आग मोठ्या प्रमाणात वाढल्याने घरावरील पत्रे सुद्धा जळून खाक झाली आहे. सुदैवाने घरातील व्यक्ती बाहेर पडल्याने मनुष्य हानी झाली नाही. सदर घटनेची माहिती मिळताच माजी तंटामुक्त अध्यक्ष नागनाथ बोरूटे, संजू माळी व त्यांचे मित्र मंडळीं व नागरिकांनी आग विजविण्याचे शर्तीचे प्रयत्न केले .परंतु आगीवर नियंत्रण मिळविणे शक्य झाले नाही. शेवटी अग्निशामक दलाला पाचारण करून आग विझवण्यात यश मिळविले.

वीज महावितरणच्या अनागोंदी कारभारामुळे या भागात नेहमीच विजेचा दाब कमी-जास्त होत असून त्यामुळेच शॉक सर्किट सारख्या अनेक घटना घडत आहे. अशा घटना होऊन टीव्ही, फ्रिज, कुलर, आदीसह अनेक विद्युत उपकरणे जळून खाक होताना पहावयास मिळत आहे. इरेश बोरुटे यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून संपूर्ण कुटुंब मोल मजुरी करून आपली उपजीविका भागवत आहे. तरी दानशूर व्यक्तीने या कुटुंबाला सढळ हाताने मदत करावी व संबंधित विभागाने बोरुटे कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पंचप्पा करजगीकर केली आहे.

पंचायत समिती सदस्य तथा पत्रकार पंचप्पा धनशेट्टी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन झालेल्या घटनेची माहिती घेतली व तात्काळ दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांना फोन करून घटनेची सविस्तर माहिती सांगितले. तहसीलदार जमदाडे यांनी जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

# बोगस लाभार्थ्यांवर कारवाईची टांगती तलवार

- ✔ बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी मोहीम
- ✔ खऱ्या दिव्यांगांचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च**

दिव्यांगांच्या हक्कांशी संबंधित लाभ योजनांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी राज्यभर दिव्यांग प्रमाणपत्रांच्या पडताळणीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. यापार्श्वभूमीवर जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाकडून सोलापूर जिल्ह्यातील विविध दिव्यांग संस्थांची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले.

दरम्यान, दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असलेल्या नागरी समाज संघटनांना (एनजीओ) देण्यात येणाऱ्या नोंदणी प्रमाणपत्रांची तपासणी नियुक्त पथकाकडून केली जाणार आहे. शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाने १७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार तसेच ७ नोव्हेंबर २०२५ च्या परिपत्रकानुसार ही कारवाई सुरू केली आहे. जिल्हा परिषद सोलापूरच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित संस्थांनी दिव्यांग पोर्टलवर भरलेली माहिती तपासण्यासाठी प्रत्यक्ष भेट देऊन छाननी केली जाणार आहे. या तपासणीसाठी नियुक्त पथकाला




संबंधित संस्थांची माहिती नमुना फॉर्ममध्ये भरून ११ मार्च २०२६ पर्यंत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या तपासणी मोहिमेसाठी चंद्रशेखर जगताप (प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद सोलापूर) यांची तपासणी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### संस्थांची प्रत्यक्ष छाननी

तपासणी पथकाकडून माढा तालुक्यातील काही संस्थांची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. यात मुकबधीर निवासी शाळा, टेंभुर्णी (ता. माढा) येथे कार्यरत असलेल्या संस्थांचा समावेश आहे. या संस्था सांगोला येथील जनजागृती प्रबोधन मंच या संस्थेमार्फत चालविल्या जात असल्याची माहिती देण्यात आली आहे. तपासणीदरम्यान संस्थांचे कार्य, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, नोंदणी प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे तसेच प्रत्यक्ष सुविधा यांची पडताळणी केली जाणार आहे.




# सोलापूरच्या आप्पा गणपती प्रतिष्ठानला
## शासनाचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

दाजी पेठ येथील आप्पा गणपती प्रतिष्ठान या मंडळास राज्य शासनाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक, सांस्कृतिक तसेच जनजागृतीपर उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल जिल्हा नियोजन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला.

निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी प्रीतम कुंटला यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक मेघनाथ येमूल, विवेकानंद महिंद्रकर, महेश कोडम, हरीनिवास सोमा, अनिल व्हनमाने, लक्ष्मीकांत महिंद्रकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

आप्पा गणपती प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांची दखल घेत राज्य शासनाकडून मिळालेला हा सन्मान दाजी पेठ परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. मंडळाच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.



सोलापूर : रमजान ईदनिमित्त सोलापुरातील विजापूरवेस परिसरात उभारण्यात आलेल्या ड्रायफ्रूट्स मार्केटमध्ये सुकामेवा दाखल झाला.

# विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्राध्यापकांची रिक्त पदे भरा

### आ.रणजितसिंह मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१० मार्च-**

विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांमुळे उच्च शिक्षण व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याचा मुद्दा विधानपरिषदेत उपस्थित करत आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी ही पदे तातडीने भरण्याची मागणी केली.



राज्यात सुमारे १३ हजार सहाय्यक प्राध्यापक पदे रिक्त असल्यामुळे अनेक महाविद्यालयांना तासिका तत्त्वावर किंवा कंत्राटी प्राध्यापकांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे अध्यापनाची सातत्यता, संशोधनाची गुणवत्ता तसेच संस्थांच्या मानांकन प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत उत्तर देताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, ११ फेब्रुवारी २०२६च्या शासन निर्णयानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक पदभरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्यातील ११ हजार ९१८ रिक्त पदांपैकी ५ हजार १२ पदांच्या भरतीस शासनाने मान्यता दिली आहे.

# व्यावसायिक गॅस बंदमुळे हॉटेलधारक अडचणीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये ११ दिवसांपासून भयंकर युध्द सुरु आहे. भारतासह अन्य देशात गॅस, पेट्रोल, डिझेलच्या तुटवड्यावर परिणाम होत आहे. व्यावसायिक गॅस बंदच्या धोरणामुळे देशभरातील हॉटेलधारक अडचणीत आल्याचे दिसून येत आहे.

व्यावसायिक गॅसच्या तुटवड्यामुळे मुंबईतील जवळपास २० टक्के हॉटेल बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, पुढील तीन दिवस ही परिस्थिती अशीच राहिली तर ५० टक्के हॉटेल्स बंद पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. इंधन पुरवठ्यातील व्यत्यय आणि एलपीजी पुरवठ्यातील निर्बंध



लक्षात घेता, मंत्रालयाने तेल रिफायनरीजना अधिक एलपीजी उत्पादन करण्याचे आणि त्या अतिरिक्त उत्पादनाचा वापर घरगुती एलपीजी साठी करण्याचे आदेश जारी केले आहेत. मंत्रालयाने घरगुती एलपीजी पुरवठ्याला घरगुती ग्राहकांना प्राधान्य दिले असून, साठेबाजी/काळ्या बाजाराला रोखण्यासाठी २५ दिवसांचा इंटर-बुकिंग कालावधी सुरू केला आहे. नॉन-डोमेस्टिक पुरवठ्याला रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांसारख्या आवश्यक नॉन-डोमेस्टिक क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येत आहे.



# पिंपळ्याच्या डॉ. शिवाजी मस्के यांना युनायटेड किंगडमकडून पेटंट मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

पिंपळा (बु.), ता. तुळजापूर येथील भूगोल अभ्यासक डॉ. शिवाजी मस्के यांनी विकसित केलेल्या टॅबलेट आधारित पोर्टेबल भौगोलिक सर्वेक्षण उपकरणाला युनायटेड किंगडमकडून पेटंट मंजूर होणे ही तुळजापूरसह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यासाठी अत्यंत गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे.

ग्रामीण भागातून संशोधनाची उंच भरारी घेत आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव उज्ज्वल करणे हे खरोखरच प्रेरणादायी आहे. भारतातील भौगोलिक नकाशे तयार करणे, भू-सर्वेक्षण कार्य तसेच भूवैज्ञानिक अभ्यासासाठी हे उपकरण अचूक आणि विश्वसनीय माहिती उपलब्ध करून देणारे ठरणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर डिजिटल सर्वेक्षण अधिक सक्षम आणि प्रभावी होण्यास मदत होणार आहे. डॉ.मस्के यांचे हे उल्लेखनीय यश तुळजापूरसह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. याबाबत पिंपळा पंचक्रोशीतील जाणकार नागरिकांसह आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही त्यांचे कौतुक केले.

# चार हजार अंगणवाडी सेविकांकडून एकल महिलांचे सर्वेक्षण

▸ शासनाच्या योजनांचा पोहोचविण्याचा उद्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च**

सोलापूर जिल्ह्यातील एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष सर्वेक्षण मोहीम सुरू केली आहे. या सर्वेक्षणाची जबाबदारी सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ४ हजारहून अधिक अंगणवाडी सेविकांवर सोपविण्यात आली असून १५ मार्चपर्यंत ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि महिला व बालकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्वेक्षण सुरू आहे. यामाध्यमातून योजनांपासून वंचित राहिलेल्या एकल महिलांची अचूक माहिती गोळा करून त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याचा उद्देश आहे.

सर्वेक्षणादरम्यान महिलांना आवश्यक असलेल्या विविध कागदपत्रांबाबत माहिती घेतली जाणार आहे. यामध्ये रेशन कार्ड, वारस प्रमाणपत्र, बँक खाते उघडण्यासाठी मदत, एलआयसी किंवा इन्शुरन्स पॉलिसीची गरज, आधार कार्ड, आयुष्मान कार्ड, जन्म-मृत्यू दाखले, जातीचे प्रमाणपत्र तसेच मालमत्ता हक्क नोंदणीची आवश्यकता यांचा समावेश आहे.

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना, अंत्योदय योजना तसेच शुभ मंगल सामूहिक विवाह योजना यांसारख्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक मदतीबाबतही माहिती घेतली जाणार आहे.

आदिवासी विकास विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना, कृषी विभागाच्या योजना, लाडकी बहिण योजना, पीएम किसान योजना यांचा लाभ न मिळालेल्या महिलांची संख्या, तसेच बचत गटाच्या सदस्य असलेल्या महिलांची माहितीही या सर्वेक्षणातून नोंदवली जाणार आहे.

**या सर्वेक्षणापासून एकल महिला वंचित राहणार नाहीत**

सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ४ हजारहून अधिक अंगणवाडी सेविकांच्या वतीने एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असून १५ मार्चपर्यंत ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे एकही एकल महिला शासनाच्या योजनांपासून वंचित राहणार नाही अशी प्रतिक्रियामहिला व बालकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली.

# महापालिका महिला महोत्सव; अंदाजे ३.५० लाखांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

सोलापूर महापालिकेकडील महिला व बालकल्याण विभाग, DY-NULM², युसीडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या महिला महोत्सवात गेल्या दोन दिवसात अंदाजे ३.५० लाख रुपयांची उलाढाल झाल्याचे सांगण्यात आले.

या महोत्सवांतर्गत रस्सीखेच, संगीत खुर्ची, फॅशन शो, गीतगायन स्पर्धा उत्साहात पार पाडण्यात आल्या. दरम्यान, बक्षीस वितरणाने आज या महोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे. सोलापूर महापालिका आवारात इंद्रभवन इमारतीच्या बाजूला विविध ४० स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यातील दोन स्टॉलवर आरोग्य विषयक जनजागृती करण्यात येत आहे.

नागरिकांनी प्रदर्शनास भेट देऊन खरेदीद्वारे महिला उद्योजिकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन महापौर विनायक कोंड्याल व आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, युसीडीच्या उज्वला गणेश, समीर मुलानी यांच्यासह समूह संघटक प्रयत्नशील आहेत. वरिष्ठ लिपिक अशोक बिराजदार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

# बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत ४.२५ कोटींची तरतूद

- ७० लाखांचे वितरण, सोलापुरात कृषी योजनांना वेग
- विहिरी, ठिबक-तुषार सिंचनाचा शेतकऱ्यांना फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्या अंतर्गत ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांच्या सिंचन सुविधांना बळकटी देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत विहीर दुरुस्ती व नवीन विहीर निर्मितीसाठी निधी वितरित करण्यात येत आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद शंभर टक्के वितरित करण्यात आली आहे. तर सन २०२५-२६




या आर्थिक वर्षासाठी ४ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून ५० नवीन विहिरींच्या बांधकामासाठी तसेच १३ विहिरींच्या दुरुस्तीसाठी सुमारे ७० लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. या कामांमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सिंचन सुविधांमध्ये वाढ होऊन शेतीला मोठा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना आधुनिक सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पंपसंच, वीज जोडणी आकार, ठिबक सिंचन, तुषार सिंचन तसेच परसबाग यांसाठीही निधीचे वितरण करण्यात आले आहे. या योजनांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन शेती उत्पादन वाढीस मदत होणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

**शेतकऱ्यांसाठी हे बंधनकारक**

सदर योजनेअंतर्गत नवीन विहीरसह सर्व बाबींची एकत्रितपणे अंमलबजावणी करणाऱ्या लाभार्थ्यांना किमान दोन वर्षांचा कालावधी बंधनकारक आहे. यासह या योजनेअंतर्गत नवीन विहीर याशिवाय सर्व बाबी करिता लाभार्थ्यांना चालू आर्थिक वर्षातच संबंधित बाबींची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नवीन विहीर खोदाई केल्यानंतर विहीर पुनर्भरण करणे बंधनकारक असणार आहे.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी**

- ▸▸ लाभार्थी हा अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी असला पाहिजे.
- ▸▸ शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.
- ▸▸ ज्या शेतकऱ्यांना नवीन विहीर घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांसाठी किमान ०.४० जमीन असणे आवश्यक आहे.
- ▸▸ सामूहिक शेत जमीन किमान ०.४० धारण करणारे एकत्रित कुटुंब नवीन विहिरी या घटकाचा लाभ असणे आवश्यक आहे.
- ▸▸ शेतकऱ्याच्या नावे जमीन धारणेचा सातबारा दाखला व आठ अ उतारा असणे आवश्यक आहे.
- ▸▸ सदर योजनेअंतर्गत कमाल शेत जमिनीची अट ६.०० एकर आहे



# अर्थ विभागालाच तदर्थ पदोन्नतीचा लाभ?
## इतर विभागांतील कर्मचाऱ्यांना न्याय द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेत अर्थ विभागातील कर्मचाऱ्यांना तदर्थ पदोन्नती दिल्या जात असताना इतर विभागांतील पात्र कर्मचाऱ्यांनाही त्याच धर्तीवर पदोन्नतीची संधी देण्यात यावी, अशी मागणी जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने केली आहे. यासंदर्भात महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, अर्थ विभागात लिपिक संवर्गातील कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक तसेच प्रशासकीय अधिकारी या पदांवर तदर्थ नियुक्त्या केल्या जात आहेत. मात्र इतर विभागांतील कर्मचाऱ्यांना अशा प्रकारची संधी मिळत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे ग्रामसेवक, आरोग्यसेवक, पर्यवेक्षक, पशुधन पर्यवेक्षक, प्रसार पर्यवेक्षक आदी पदांवरील पात्र कर्मचाऱ्यांनाही तात्पुरत्या स्वरूपात तदर्थ पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी महासंघाने केली आहे.

यावेळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र देशपांडे, विभागीय सचिव दिनेश बनसोडे, कार्याध्यक्ष सचिन मायनाळ, सहसचिव सुरेश राठोड, लक्ष्मण वंजारी, प्रमोद धनवडे आदी उपस्थित होते.



**पाठीवर 'भारत गॅस'चा शिक्का, पण सायकलवर मात्र सरपणाची लाकडे...**

'युद्ध परदेशात, चूल घरात... गॅसच्या तुटवड्यामुळे पुन्हा लाकडाच्या मोळीची साठवणूक करत आहे. सध्य परिस्थितीला साजेसे छायाचित्र.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी धम्मानंद घोडके, कोषाध्यक्षपदी शरद चक्रे

**रेणापूर :** भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीची बैठक शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली .या बैठकीच्या अध्यक्षस्थानी दादाराव कांबळे माजी ग्रामपंचायत सदस्य रेणापूर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. किसन कुडके, प्रकाश घोडके, शंकरराव चक्रे, नंदू राऊत, अजय चक्रे, नाना चक्रे आदी उपस्थित होते.



या बैठकीमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्याचे बैठकीत ठरले. जयंती निमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंगळवार दि.१४ एप्रिल या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्राची भव्य अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. कार्यकारणी पुढील प्रमाणे. अध्यक्ष धम्मानंद घोडके. उपाध्यक्ष. विनोद कांबळे, सचिव. उमाकांत कांबळे, कोषाध्यक्ष. शरद चक्रे, मिरणुक प्रमुख. अमर चक्रे,सदस्य अतुल चक्रे, पप्पू घोडके,भगवान चक्रे, तर सल्लागारपदी प्राध्यापक किसन कुडके, दादराव कांबळे, प्रकाश घोडके,शंकर चक्रे, नंदू राऊत,अजय चक्रे,नानाभाऊ चक्रे. लक्ष्मण कांबळे, विश्र्वंभर घोडके, देविदास गायकवाड,महेंद्र हानवते यांचा समावेश आहे.

### भोगेश्वर मंदिर ट्रस्टच्या वतीने मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत



**वलांडी :** तळेगाव ता. देवणी येथे श्री भोगेश्र्वर महादेव मंदिर ट्रस्ट समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष मालबा रामराव घोणसे यांनी मंदिर समितीच्या वतीने तळेगावातील मुलीच्या लग्नासाठी ११००० रू. ची आर्थिक मदत करणार असल्याचे जाहीर केले होते. काल महिला दिनाचे औचित्य साधून या कन्यादान योजनेचा पहिला मान शिवाजी नवाडे यांची कन्या अश्र्विनी आणि दत्ता बिरादार या नवदंप्त्यास देण्यात आला. अकरा हजार रुपयाचा धनादेश या जोडप्यास देण्यात आला. या वेळी अध्यक्ष मालबा घोणसे, रामभाऊ धनेगावे, जयतीर्थ जोशी,राम बिरादार, नागनाथ जोगी, विजय देशमुख, गोविंद इंगोले, तुळशीदास बिरादार, शिवाजी नवाडे, आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### पं.स.भाजपच्या गटनेतेपदी सौ. सुरेखा संतोष केंद्रे



**अहमदपूर :** अहमदपूर पंचायत समितीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी सौ. सुरेखा संतोष केंद्रे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीमुळे कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. पंचायत समितीमधील भाजप सदस्यांच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. सर्व सदस्यांनी एकमताने त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत गटनेतेपदाची जबाबदारी सोपवली. सौ. सुरेखा केंद्रे या कार्यक्षम कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या निवडीमुळे पंचायत समितीमध्ये विकासात्मक कामगिरी व धोरणे बळकट केली जातील असा विश्र्वास पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.यावेळी भारतीय जनता पक्षाचे ता. अध्यक्ष चंद्रप्रकाश हांगे, भाजपाचे उपअध्यक्ष गोविंद गिरी, अशोकराव मुंडे, पं स माजी सभापती तथा विद्यमान सदस्या सौ अयोध्याताई केंद्रे, पंचायत समितीच्या सदस्यां सौ सुरेखा अशोक मुंडे, पंचायत समिती सदस्य कृष्णराज भोसले इत्यादी सदस्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. गटनेतेपदाची जबाबदारी मिळाल्याबद्दल सौ. सुरेखा केंद्रे यांनी जिल्हातील सर्व भाजपाचे वरिष्ठ नेत्याचे, कार्यकत्याचे आभार मानत पंचायत समिती क्षेत्राच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### दुग्धजन्य पदार्थ निर्मिती तंत्रज्ञान कार्यशाळेस प्रतिसाद

**उदगीर :** येथील दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयात दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'कुटीर स्तरावर दुग्धजन्य पदार्थ निर्मिती तंत्रज्ञान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन माफसूचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. माधव पाटील होते. यावेळी डॉ. श्रीकांत कल्याणकर, डॉ. हेमंत गावंडे, डॉ. बुलबुल नगराळे, डॉ. वैभव लुले, डॉ. नितीन खोडवे, डॉ. नितीन शिंदे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाने तयार केलेल्या 'कुटीर स्तरावर दुग्धजन्य पदार्थ निर्मिती तंत्रज्ञान' या मार्गदर्शक पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या कार्यशाळेत ग्रामीण भागातील सुमारे ६० महिला, पुरुष सहभागी झाले होते. या कार्यशाळेत दुग्धजन्य पदार्थ निर्मितीविषयी तांत्रिक ज्ञान, मूल्यवर्धन आणि उद्योजकतेच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. अनिल भिकाने यांनी दुधाचे आहारातील महत्त्व अधोरेखित करत रोजच्या आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करण्याचे आवाहन केले.

# पंचायत समितीवर काँग्रेसचे वर्चस्व

### सभापती सुनीता कोसंबे उपसभापती माधव वाघमारे यांची बिनविरोध निवड

तभा वृत्तसेवा

**जळकोट, दि. १० मार्च :** जळकोट पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती निवड दिनांक नऊ मार्च रोजी पार पडली या निवडीमध्ये सभापतीपदी काँग्रेसच्या सुनीता संभाजी कोसंबे यांची तसेच उपसभापती पदी काँग्रेसचे माधव वाघमारे यांची बिनविरोध निवड झाली.

जळकोट येथील पंचायत समितीच्या सभागृहामध्ये सभापती व उपसभापती निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सभापती व उपसभापती पदासाठी एकमेव अर्ज आल्यामुळे सभापती पदी सुनीता संभाजी कोसंबे व उपसभापती पदी माधव वाघमारे यांची बिनविरोध निवड झाल्याचे पीठासन अधिकारी तथा तहसीलदार राजेश लांडगे यांनी जाहीर केले यावेळी गटविकास अधिकारी नरेंद्र मेढेवार, यांची देखील उपस्थिती होती

या सभेप्रसंगी पंचायत समिती सदस्य शिवकांता ताकबीडे राहूल झोले मिरा सूर्यवंशी, राजेश केंद्रे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या काँग्रेस पक्षाच्या सदस्या नागेश्वरी सचिन केंद्रे, श्रीमती शांताबाई अदावळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष मारुती पांडे, शहराध्यक्ष महेश धुळशेट्टे, सचिन केंद्रे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रदेश सचिव कल्याण पाटील, एडवोकेट पद्माकर उगिले, संतोष बिरादार, सचिन केंद्रे, बाबुराव जाधव, दत्ता पवार, आशिष पाटील, राजूरकर शीला पाटील महिला तालुका काँग्रेस अध्यक्ष मंजुषा पांचाळ, नूर पठाण काँग्रेस पक्षाचे युवक अध्यक्ष तथा निरीक्षक निलेश देशमुख, विश्र्वनाथ पाटील, गोविंद केंद्रे, धनराज दळवे, सरपंच सुनील नामवाड, अक्षय बडगिरे, प्रमोद दाडगे, सरपंच श्री शिरीष चव्हाण रपनवाड, नूर पठार, सरपंच बालाजी गुडसुरे नारायण मालुसरे रमण अदावळे अंबादास बिरादार यावेळी उपस्थित होते. यावेळी प्रशासनाच्या वतीने नूतन सभापती व उपसभापती तसेच पंचायत समिती सदस्य तसेच जिल्हा परिषद सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला याप्रसंगी पंचायत समिती मधील अनेक अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते निवड झाल्यानंतर काँग्रेसच्या कार्यकत्यांनी नुतन सभापती, उपसभापती यांचा सत्कार केला. या निवडी प्रसंगी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते यावेळी सभापती व उपसभापती पदी निवड झाल्याबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.



### काँग्रेसच्या पंचायत समिती सदस्या मीरा सूर्यवंशी नाराज

जळकोट तालुक्यातील गुत्ती पंचायत समिती गणामधून निवडून आलेल्या काँग्रेस पक्षाच्या सदस्या मीरा सूर्यवंशी यांना उपसभापती पदाचे आश्वासन दिले गेले होते असे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे आपणास उपसभापतीपद मिळणार यामुळे त्यांचे समर्थक देखील मोठ्या प्रमाणामध्ये जळकोट मध्ये उपस्थित झाले होते परंतु ऐनवेळी नाव डावलल्याचे कळताच मीरा सूर्यवंशी या नाराज झाल्या तसेच बैठकीम मधून त्या निघून गेल्या यामुळे या नाराजीची चर्चा तालुक्यात मोठ्या प्रमाणात सुरू होती.

## चिमुकल्यासह तरुणाईच्या उत्साहाने रंगले स्नेहसंमेलन

( प्रतिनिधी )

तभा वृत्तसेवा

**किनगाव , दि. १० मार्च :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था ही बालवाडी ते पदवीपर्यंतचे शिक्षण देणारी मोठी संस्था असून या संस्थेतील गुरुजींनी राष्ट्राचे भविष्य विद्यार्थी आहेत हे लक्षात घेऊन त्यांना घडविण्याचे पवित्र काम करावे असे प्रतिपादन शिक्षण उपसंचालक तथा लातूर माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी शनिवार दि ७ मार्च रोजी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव आयोजित वार्षिक स्नेह संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केले या वार्षिक स्नेहसंमेलनाच्याअध्यक्षस्थानी अध्यक्षस्थानी किनगाव चे प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके होते तर प्रमुख अतिथी श्री छत्रपती शिवाजी सस्थेचे अध्यक्ष राम बोडके ,सचिव तथा प्राचार्य डॉ बी आर बोडके सहसचिव लताताई मोरे,सत्कारमूर्ती लातूर जि प च्या नवनिर्वाचित सदस्या प्रतीक्षा भागवत गुट्टे, जि प सदस्य अश्वीन नागराळे,प स सदस्या सुरेखा अशोक मुंडे सह माजी जि प सदस्य तथा भाजपा सरचिटणीस त्र्यंबक (आबा ) गुट्टे, भाजपा चे अशोक मुंढे, युवा उद्योजक इंजि भागवत गुट्टे ,सरपंच विश्र्वनाथ मुंढे, सरपंच तुळशिराम परांडे, ग्रा प सदस्य धनराज बोडके , उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण, मुख्याध्यापक डॉ संतोष पवार, पर्यवेक्षक विष्णू पवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ विरनाथ हुमनाबादे, प्रा अभय गोरटे, सहशिक्षिका ज्योती साने आदि मान्यवर उपस्थित होते या मान्यवरांच्या शुभहस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलनाने स्नेह संम्मेलनाचे उद्धाटन संपन्न झाले यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ बबनराव बोडके यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रगतीचा इतिहास मांडला आणि नवनिर्वाचित जि प, प स सदस्याचा, पत्रकारांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करून सम्यक कार्यास शुभेच्छा दिल्या यानंतर पुढे बोलताना तेलंग यांनी या स्नेह संमेलनातून तरुणाईच्या स्नेह वृद्धिंगत व्हावा आणि चांगले कलाकार घडावेत असे हि आवाहन केले यानंतर त्र्यंबक गुट्टे यांनी सम्यक शुभेच्छा दिल्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमाला श्री गणेशाच्या हे गणेशा हे गणेशा या नृत्य अविष्काराने सुरुवात झाली, शिवबा जन्मोत्सव पाळणा गात शिवदर्शन प्रत्यक्ष तरुणाईने घडविले, देशभक्ती गीते, नाटक कथा कथन,लोकगीतातून व्यसनमुक्ती, संस्कृतींच्या लोक जागृतीत गाव जागवीत आला रे वासुदेव आला. शेतकरी गीत कुऱ्या चालल्या रानात सुरू झाली या पेरण ,१९७२ च्या दुष्काळाची तीव्रता आणि सद्य परिस्थितीत बळीराजा आणि लोकनाट्य, जागर गोंधळ विड्बन आदि सह लावणी नृत्य कु धनश्री जोंधळे हिने फुलवंती, शुक्राची चांदणी आदि गाण्यावर नृत्य आविष्कार सादर करून तरुणाई ला ठेवा धरण्यास भाग पाडलं पिचली माझी बागडी यावर तरूण -तरूणी धुंद होऊन नाचली , विठ्ठल नामाचा गजर आदिचे बहारदार सादरणीकरण झाले या स्नेह संमेलनाचे सुत्रसंचालन प्रा डॉ भारत भदाडे, डॉ दर्शना कानवटे, डॉ संजय जगताप यांनी केले या स्नेह संमेलनासाठी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ बी आर बोडके, लताताई मोरे, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आदिनी परिश्रम घेतले

राष्ट्रगीतानी स्नेह संमेलनाची सांगता झाली

## लिनेस क्लब अध्यक्ष प्राचार्या शोभा टोम्पे व सचिवपदी शुभांगी पाटील



तभा वृत्तसेवा

**अहमदपूर, दि. १० मार्च :** अहमदपूर लिनेस क्लब पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लिनेस क्लबच्या प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख (अकोला) यांची प्रमुख उपस्थिती होती.

क्षेत्रिय संयोजिका सुनंदा कुलकर्णी, माजी नगराध्यक्षा अश्र्विनी कासनाळे, माजी अध्यक्षा प्राचार्या रेखाताई हाके-तरडे, सचिव अँड.सुवर्णा महाजन, कोषाध्यक्षा शिल्पा हंगरगे उपस्थित होत्या.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. उषा सुडे यांनी स्वागत गीत सादर केले. नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त प्राचार्या शोभाताई टोम्पे तर सचिव शुभांगी पाटील, कोषाध्यक्षा छाया विळगावे, उपाध्यक्षा वनिता बुजरूक, सहसचिव अर्चना घाटोळ,टेमर म्हणून सुमन भोसले व सविता पाटील,पी.आर.ओ म्हणून लिला डबीर व वर्षा माळी, टेल ट्वीस्टर म्हणून शितल महाजन व फुलाबाई साके यांनी पदभार स्वीकारला. कल्पना देशमुख यांनी नूतन कार्यकारिणीला व नवीन सदस्यांना रितसर शपथ दिली.


यावेळी समाजातील एकलमातांचा सत्कार व प्राथमिक आश्रमशाळा सांगवी तांडा या शाळेला जलशुद्धीकरण यंत्र वाटप हे दोन प्रोजेक्ट प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख यांच्या उपस्थितीत घेण्यात आले.एकलमाता स्वप्ना कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून सत्कारास उत्तर दिले.


नुतन अध्यक्षा माजी प्राचार्या शोभाताई टोम्पे व क्षेत्रीय अधिकारी सुनंदा कुलकर्णी यांचे मनोगतपर भाषण झाली. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख यांनी लिनेस क्लबच्या कार्याची सविस्तर माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी अध्यक्षा प्राचार्या रेखाताई हाके पाटील यांनी केले.सूत्रसंचालन फुलाताई साके व आशा रोडगे-तत्तापुरे यांनी केले तर आभार शुभांगी पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिनेस क्लबच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# येरोळ शिवारात चोरट्यांचा धुमाकूळ

### आठ दिवसात पाच म्हशी पळविल्या, परिसरात भीतीचे वातावरण





तभा वृत्तसेवा

**शिरूर अनंतपाळ, दि. १० मार्च :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ सह परिसरात गेली पंधरा दिवसांपासून अज्ञात चोराकडून शेत शिवारातील आखाड्यावर बांधलेल्या दुभत्या म्हशी पळवून नेण्याच्या घटनेत वाढ झाली असून परिसरातील शेतकरी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

येरोळ येथे गेल्या पंधरा दिवसाखाली शिवाजी पांडूरंग नाळापुरे यांच्या सुमठाणा रोडलगत असलेल्या शेतातील शेडमधून एक नागपुरी व मुरा जातीच्या दोन म्हशी अंदाजे दीड लाख रुपये किंमतीच्या दोन दुभत्या म्हशी अज्ञात चोरट्यांनी शेडचा दरवाजा तोडून वाहाणातून पळवून नेले, त्याच पाठोपाठ दोन दिवसाखाली येरोळमोड मुख्य रस्ता लगत शेती असलेल्या शेतकरी वामण मुंजाळे यांच्या शेतातून दोन दुभत्या म्हशी चोरानी चोरुन नेले,त्याच रात्री सुभाष गरिबे यांची एक म्हैस चोराणी पळवली, शुक्रवारी रात्री काही अज्ञात चोरटे टेम्पो वाहाण दूर आडबाजूला रोडच्या कडेला उभा करून मच्छिंद्र भालेकर यांच्या शेतातील म्हशी चोरण्यासाठी आले होते पण तेथील रात्री आकाड्यावर शेतकरी जागे असल्याचे पाहून चोरटे पळून पसार झाले याच रात्री शिवारात चोरटे आल्याची माहिती सर्वत्र पसरल्याने घरी झोपलेले शेतकरी भितीने शेत गाठून शेतावर मुक्काम ठोकले या अज्ञात चोरट्यांच्या म्हशी चोरीच्या घटना घडण्याचे प्रमाणात वाढत असल्याने शेतकरी व मजूर वर्गात मोठे भितीचे वातावरण पसरले आहे.

या भागात अनेक शेतमजूरांनी जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करणं पसंत केले तर अनेक तरुण शेतकरी शेती उत्पादनातून अपेक्षित उत्पन्न हाती लागत नाही त्यामुळे शेतीला जोड धंदा म्हणून एक लाखापेक्षा अधिक महागड्या किंमतीच्या म्हशी सांभाळून कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत.परंतु अज्ञात चोरांनी दहशत माजवत शेत शिवारातील म्हशी चोरीचे सत्रच सुरू केले आहे त्यामुळे शेतकऱ्यां मध्ये भिती निर्माण झाली असून पोलिस प्रशासनाने या भागात रात्रीची गस्त वाढवून चोरी गेलेल्या म्हशीचा तात्काळ शोध लावून अज्ञात चोरट्याना पकडून अटक करावे शेतकऱ्यांच्या चोरीला गेलेल्या म्हशी मिळवून द्यावे अन्यथा त्या शेतकऱ्यांचे कुटुंब आर्थिक अडचणीत सापडून कर्जबाजारी होईल शिवारात अज्ञात चोरट्याचा तपास स्वतंत्र पथके नेमवून करावा शेतकऱ्यांची भिती दूर करावी अशी येरोळसह परिसरातील शेतकरी वर्गातून मागणी केली जात आहे.

परिसरात नाका बंदी केली असून शेतकऱ्यांनी रात्री म्हशी घरी घेऊन यावे शक्य नसल्यास शेतावरच रात्रीचा मुक्काम करावा अज्ञात चोरांचा शोध घेत आहोत लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल तसेच प्रत्येक गावात तरुणांचे ग्राम सुरक्षा पथक तयार करणार असून यासाठी तरुणांनी पुढे यावे व आपल्या गाव शिवारात रात्रीची गस्त सुरू करावी असे आवाहन केले.

**-अनंत भंडे, पोलीस निरीक्षक**
**शिरूर अनंतपाळ**

### सुप्रसिध्द ज्येष्ठ कवी संजय घाडगे यांच्या 'अस्वस्थ वर्तमानाचा बर्मुडा ट्रँगल' काव्यसंग्रहाचे थाटात प्रकाशन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १० मार्च :** येथील ज्येष्ठ सुप्रसिद्ध कवी व गझलकार संजय घाडगे यांच्या बहुचर्चित अस्वस्थ वर्तमानाचा बर्मुडा ट्रँगल या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नांदेड येथे आयोजित विद्रोही साहित्य संमेलनामध्ये थाटात संपन्न झाले. संमेलनाध्यक्ष माननीय लोकनाथ यशवंत यांच्या अध्यक्षतेखाली माननीय प्रा. प्रतिमा परदेशी आणि किशोर ढमाले सर यांच्या शुभहस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. कवी संजय घाडगे हे मागील सुमारे ३० ते ३५ वर्षांपासून सातत्याने काव्यलेखन करत आहेत. त्यांच्या लेखनातून सामाजिक वास्तव, मानवी भावना आणि बदलत्या काळातील अस्वस्थता प्रभावीपणे व्यक्त होत असल्याने साहित्यिक वर्तुळात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे अहमदपूर विधानसभा मतदारसंघाला २५ कोटींचा निधी मंजूर

### लवकरच अनेक रस्त्यांची कामे मार्गी लागणार

तभा वृत्तसेवा

**चाकूर, दि. १० मार्च :** महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे अर्थसंकल्पात अहमदपूर आणि चाकूर विधानसभा मतदारसंघातील विविध रस्त्यांना २५ कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्र सरकारने मंजूर केला असून लवकरच या निधीची सर्व प्रशासकीय मान्यता पूर्ण होऊन रस्त्याची कामे मार्गी लागणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या कार्यालयातून देण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे की,चाकूर तालुक्यातील उजळंब, येरोळ, साकोळ आनंदवाडी या रस्त्यासाठी तब्बल ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच मुरंबी - सुगाव ते देवांग्रा ,नळेगाव ते राज्य क्रमांक २४० या रस्त्यासाठी ८ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

धानोरा, सताळा, महाळगी, जानवळ, शिवणखेड, ममदापूर बोरी, बिंदगहाळ, बोकनगाव, मुगाव या रस्त्यासाठी ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

अहमदपूर शहरातील थोडगा रोड या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तब्बल ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.असे एकत्रित मिळून २५ कोटी रुपयाचा निधी अहमदपूर व चाकूर विधानसभा मतदारसंघातील महाराष्ट्र सरकारच्या वतीने मंजूर करण्यात आला आहे. हा निधी सरकारने मंजूर केल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी आभार मानले आहेत.

मतदारसंघातील जनतेच्या मागणीनुसार अर्थसंकल्पात मतदारसंघातील विविध रस्त्यासाठी २५ कोटी रुपये शासनाच्या वतीने मंजूर करण्यात आले असून लवकरच ही कामे मार्गी लागणार आहेत यामुळे दळणवळणाची सुविधा अधिक सुलभ होणार आहे.

**- ना.बाबासाहेब पाटील**
**सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कानेगाव जि.प. शाळेत महिला दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१० मार्च -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा विद्या वाल्मिक पतंगे यांनी मुलींच्या भौतिक सुविधांसाठी १० हजार रुपयांची देणगी दिली.



कार्यक्रमाची सुरुवात विद्या पतंगे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व माता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या पतंगे होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून माधुरी कांबळे, नसरीन तांबोळी, मंगल बन, पूजा पाटील तसेच स्थानिक महिला पालक उपस्थित होत्या.

या प्रसंगी मुख्याध्यापक बालाजी साळुंके, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब कदम, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापूरमध्ये गड-किल्ल्यांच्या जतनासाठी आमरण उपोषण

**तुळजापूर, दि.१० मार्च -**

तुळजापूर - छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या जतन व संवर्धनासाठी राज्यात स्वतंत्र गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी तुळजापूर येथे सामाजिक कार्यकर्ते किसन चव्हाण पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला विविध शिवप्रेमी संघटनांसह नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून दररोज शेकडो गडप्रेमी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवत आहेत. तुळजापूर शहरात सुरू असलेल्या या उपोषणाची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यावेळी पक्षाच्या वतीने पाठिंब्याचे पत्रही देण्यात आले. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील, तुळजापूर तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



### न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**लोहारा, दि.१० मार्च -**

लोहारा येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये ८ मार्चचे औचित्य साधून जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका सविता जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून जयअंबिका प्राथमिक आश्रमशाळा, एकंबी तांडा (ता. औसा) येथील शिक्षक दिलीप पटणे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य शहाजी जाधव यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते भारतमाता, सरस्वती माता, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्राचार्य जाधव यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले, तर दिलीप पटणे यांनी महिलांच्या विविध क्षेत्रातील कर्तृत्वावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीरा माने यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना सोनके यांनी केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



### उमरा जि.प. शाळेत महिला दिन साजरा

**येरमाळा, दि.१० मार्च -**

कळंब तालुक्यातील उमरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे डॉ. संदीप तांबारे व शालेय व्यवस्थापन समितीच्या स्वाती जाधव यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. संदीप तांबारे यांनी महिला सन्मान, स्त्रीशक्ती व शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. शिक्षिका आरती कवडे यांनी महिलांचे समाजातील योगदान व स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास मुख्याध्यापक रणजीत चौधरी, महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

### वैजिनाथ माशाळकर यांचे निधन

**उमरगा, दि.१० मार्च -**



शहरातील वैजिनाथ माशाळकर (वय ८७) यांचे सोमवारी (दि.९) रात्री ११.५० वाजता उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि.१०) दुपारी लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. माजी नगरसेवक महेश माशाळकर यांचे ते वडील होत.

# भरधाव कार चहाच्या स्टॉलमध्ये घुसली; उमरग्यात भीषण अपघातात दोघांचा मृत्यु

### एक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० मार्च -**

शहराजवळील सोलापूर-हैदराबाद महामार्गावर मंगळवारी (दि. १०) दुपारी भीषण अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या एस-क्रॉस (ड-ॐ) कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कार रस्त्यालगत असलेल्या चहाच्या स्टॉलमध्ये घुसली. या दुर्घटनेत उमरगा येथील माजी नगरसेवक बळीराम पवार आणि जनता अर्थमूव्हर्सचे मालक लाडनशहा मुर्शद यांचा जागीच मृत्यू झाला, तर मॅकेनिक सचिन कुठार हे गंभीर जखमी झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा राज्यातील एक कुटुंब तुळजापूर येथे तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन हैदराबादकडे परत जात होते. उमरगा चौकाजवळ भारत टायर परिसरात कार (क्रमांक टीएस ३४ एफ ४७०६) भरधाव वेगात जात असताना अचानक टायर फुटल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. नियंत्रण सुटलेली कार थेट महामार्गाच्या कडेला असलेल्या पत्र्याच्या चहाच्या हॉटेलमध्ये घुसली. अपघात इतका भीषण होता की हॉटेलमध्ये चहा घेत बसलेल्या बळीराम पवार आणि लाडनशहा मुर्शद यांना जोराची धडक बसली आणि दोघांचाही जागीच मृत्यू झाला. तर सचिन कुठार हे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून मोठ्या प्रमाणात नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना रुग्णालयात हलवले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

भीषण अपघातात दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## तुळजापूरमध्ये १७ वर्षीय तरुणाचे अपहरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**



तुळजापूर शहरातील एस.टी. कॉलनी परिसरातील १७ वर्षीय तरुणाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी संतोष दत्तात्रय जोशी (वय ५५, रा. एस.टी. कॉलनी तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांचा मुलगा समर्थ संतोष जोशी (वय १७) यास दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवून नेले.

या घटनेबाबत संतोष जोशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. यामुळे शहरात एकच खळबळ उडली आहे.

## न.पा. सभागृहात इनकॅमेरा रेकॉर्डिंग करा; पत्रकारांसाठी बसण्याची व्यवस्था करा

### काँग्रेस आयची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० मार्च -**

नळदुर्ग नगरपालिका सभागृहात होणाऱ्या मासिक सर्वसाधारण सभेचे इनकॅमेरा रेकॉर्डिंग करण्यात यावे तसेच नियमानुसार पत्रकारांना सभागृहात बसण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी काँग्रेसच्या नगरसेवकांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, नगरपालिका मासिक सर्वसाधारण सभेचे सभागृहात इनकॅमेरा रेकॉर्डिंग करण्यात यावे. सभागृहात नगरपरिषद सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांचा काहीवेळा विपर्यास होत असल्याने त्यातून सदस्यांची बदनामी होण्याची शक्यता निर्माण होते. ही बाब टाळण्यासाठी सभागृहात कॅमेरे बसवून रेकॉर्ड नोंद ठेवण्यात यावी.

तसेच नळदुर्ग शहरातील पत्रकारांना सभेच्या वेळी शक्य असल्यास नियमानुसार सभागृहात बसण्याची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या पत्रानुसार मागील झालेल्या नगरपालिका सर्वसाधारण सभेच्या प्रोसेडींग नोंद रजिस्टरची सत्यप्रत देण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मासिक सर्वसाधारण सभा सुरू झाल्यानंतर सभेचे इतिवृत्त कच्चे किंवा पक्के लिहिले जात असताना दोन्ही गटनेत्यांच्या स्वाक्षऱ्या तात्काळ घेण्यात याव्यात, जेणेकरून सभागृहात सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांमध्ये कोणताही बदल होणार नाही. सदस्यांनी व्यक्त केलेले मत जसेच्या तसे नोंदविण्यात यावे. तसेच सभागृहात सदस्यांना बोलण्यासाठी माईकची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या निवेदनावर काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, नगरसेवक आकाश कुलकर्णी, इमाम शेख, सुधीर पोतदार तसेच नगरसेविका कमलबाई गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित जमिनींना योग्य मोबदला द्या : मोटे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील परंडा मतदारसंघातून जाणाऱ्या सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनींना योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी माजी आमदार राहुल मोटे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दि.१० मार्च रोजी धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.



सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा परंडा मतदारसंघातील कुंभेफळ, कांदलगाव, पिस्तमववाडी, राजुरी, घारगाव, सिरसाव, रोहकल, अनाळा तसेच इतर अनेक गावांमधून जाणार आहे. या महामार्गासाठी प्रशासनाकडून संबंधित गावांतील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी संपादित करण्यात आल्या आहेत.

मात्र या जमिनींसाठी जाहीर करण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जमीन ही शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार असल्याने जमीन संपादित झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबांवर मोठा आर्थिक व सामाजिक परिणाम झाला आहे.

त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना समृद्धी महामार्गासाठी देण्यात आलेल्या मोबदल्याप्रमाणेच योग्य व समाधानकारक मोबदला देण्यात यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि त्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही राहुल मोटे यांनी केली आहे.

## स्वआधार बालगृहात महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० मार्च -**

तुळजाई प्रतिष्ठान संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह (विमानतळ रोड, आळणी) येथे दि.९ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुनीता गुंजाळ-कवडे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून लता हंगे, कृषी अधिकारी सोनाली मुंडे, उपविभागीय वन अधिकारी सुदाम मुंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी वैजिनाथ कुटे, मनोज सुरवसे व रूपाली सुरवसे उपस्थित होते.

बालगृहातील मुलींनी मान्यवरांचे शाल व बुके देऊन स्वागत केले.

सचिव शहाजी चव्हाण यांनी बालगृहातील महिला कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला. यावेळी स्पेशल ऑलिंपिक भारत क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवलेल्या मुलींचा सत्कार करण्यात आला.

तसेच दिव्यांग असूनही जिद्दीच्या जोरावर महसूल सहाय्यक पद मिळवलेल्या अनुजा नितळीकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. जागृती फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने मुलींना सॅनेटरी पॅडचे वाटप करण्यात आले, तर शौर्य सुदाम मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुलींना कपड्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी महिला सक्षमीकरण व समाजातील महिलांची भूमिका यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे यांनी केले.

## वाहतूक नियमभंगावर कारवाई; दंड वसूल

**धाराशिव, दि.१० मार्च -**

शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून कारवाई करण्यात आली.

दि.९ मार्च रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायद्याचे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर एकूण ८५ कारवाया करण्यात आल्या.

## आरळी येथे महाराष्ट्र केसरी २०२६ साठी धाराशिव जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० मार्च -**

भारतीय माती शैली कुस्ती विभाग आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२६ साठी धाराशिव जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा रविवार, दि.८ रोजी तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील श्रीमंत कुस्ती आखाडा येथे उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेत विविध वजन गटांमध्ये पैलवानांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. त्यामध्ये ५५ किलो गटात पैलवान ओंकार नरवटे (उमरगा), ६० किलो गटात पैलवान वैभव भोसले (तुळजापूर), ६५ किलो गटात पैलवान रोहित जाधव (परांडा), ७० किलो गटात पैलवान तुषार खामकर (भूम), ७५ किलो गटात पैलवान सुरज गवळी (धाराशिव), ८० किलो गटात पैलवान पृथ्वीराज तुगावे (तुळजापूर), ८५ किलो गटात पैलवान ज्ञानेश्वर हारवले (धाराशिव) आणि ९० किलो गटात पैलवान किरण काळदाते (परांडा) यांनी आपापल्या गटात विजय मिळवला. महाराष्ट्र केसरीसाठी खुल्या गटातून राहुल मुळे (तुळजापूर) आणि गणेश कारंडे (परांडा) या दोन पैलवानांची निवड करण्यात आली. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जिल्हा तालीम संघ सचिव वामन गाते, राष्ट्रीय कुस्ती पंच धनराज भुजबळ, उपमहाराष्ट्र केसरी मारुती आप्पा विठ्ठलकर, लोहारा तालीम संघ अध्यक्ष दयानंद साळुंखे, अक्कलकोट तालीम संघ अध्यक्ष महेश कुलकर्णी, कुस्ती कोच गोविंद घारगे तसेच एनआयएस कुस्ती कोच आरिफ देशमुख यांनी सहकार्य केले.

या स्पर्धेला दर्याप्पा मुळे, वस्ताद अरुण हावळे, अमोल पाटोळे, बाबुराव मुळजे, विजय धोंगडे, माहेश्वर भोसले, नारायण पौळ, शिवानंद गवळी, पापालाल शेख, कालीदास माने, कालीदास पारवे, अजीत भोसले, सचिन पारवे, किरण गायकवाड आणि सिद्धराम तानवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## श्री राजगुरु गुरुकुल विद्यालयाच्या इमारतीचा कोनशीला समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० मार्च -**

नळदुर्ग येथील राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाचे मठाधीपती व श्री राजगुरू शिवलिंगेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांच्या संकल्पनेतून नळदुर्ग येथे सीबीएसई पॅटर्नवरील श्री राजगुरू गुरुकुल विद्यालय सुरू करण्यात येत असून या विद्यालयाच्या भव्य इमारतीचा कोनशीला समारंभ ७ मार्च रोजी पार पडला.

तुळजापूर तालुक्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते हा समारंभ पार पडला. कार्यक्रमास नंदगाव येथील विरक्त मठाचे राजशेखर महास्वामीजी, अमीनगडचे शंकर राजेंद्र महास्वामीजी, मुन्नावळी येथील मुरगेंद्र महास्वामीजी तसेच अणदूर मठाचे शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवराज शिवाचार्य महास्वामीजी होते. यावेळी भाजपचे सुनील चव्हाण, नितीन काळे, नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार, नगरपालिकेतील भाजप गटनेते दत्तात्रय दासकर, काँग्रेस गटनेते मारुती खारवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले तर सूत्रसंचालन दत्तात्रय कोरे यांनी केले. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांची चव्हाण यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० मार्च -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा जि.प. गटाचे नवनिर्वाचित सदस्य विकी चव्हाण यांनी दि.९ मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी चव्हाण यांचे जिल्हा परिषद सदस्यपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच तेरखेडा जिल्हा परिषद गटाच्या विकासासंदर्भात रस्ते, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सुविधांबाबत दोघांमध्ये चर्चा झाली.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद विज्ञानमध्ये विशाल परिहारचा विद्यार्थ्याचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विशाल परिहार याने नॅशनल एन्व्हायर्नमेंटल युथ पार्लमेंटच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले.त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरावरून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली.

ही राष्ट्रीय स्पर्धा दि.१४ ते १५ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडली.देशभरातील विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता.त्यात विशाल परिहार यांनी पर्यावरण विषयक भूमिका मांडली.याचबरोबर त्याची राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद नागपूरमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व आणि युवा संसद (विकासित भारत) साथीसाठी राज्यस्तरावर निवड झालेली आहे.

त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, प्रा.मेघा पंडित, डॉ.गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### क्रिएटिव्ह फाउंडेशनच्यावतीने विशाल महाराज यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन

**औसा :** क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या वतीने बुधवार दि.११ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता औसा येथील उटगे मैदानावर प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. श्री विशाल महाराज खोले यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष ड. परीक्षित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त या विशेष आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कीर्तनाच्या माध्यमातून समाजात सद्भावना, संस्कार आणि अध्यात्मिक मूल्ये रुजवण्याचा संदेश देण्याचा या कार्यक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.ह. भ. प. विशाल महाराज खोले यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वशैली आणि भावस्पर्शी कीर्तनासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कीर्तनातून अध्यात्म, समाजप्रबोधन आणि संत साहित्याचा गोड संगम अनुभवायला मिळतो.

परिसरातील नागरिक, वारकरी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच हा कार्यक्रम शांतता व शिस्तीने पार पाडण्यासाठी आयोजकांकडून आवश्यक व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### आनंदवाडी ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**शिरूर अनंतपाळ :** आनंदवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महान समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीच्या प्रगतीचा गौरव करण्यात आला. स्त्री म्हणजे वास्तव, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे पावित्र्य आणि स्त्री म्हणजे कर्तृत्व. नारीचे कर्तृत्व विशाल असून ती प्रत्येकाच्या उर्जेची मशाल आहे, अशा शब्दांत उपस्थित महिलांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे, हुंडाबंदी करणे तसेच महिला सक्षमीकरण यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच महिलांच्या सूचनांनुसार दोन दिवसांत डोळ्यांचे व सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या कार्यक्रमास उबाटा शिवसेना तालुकाध्यक्ष आणि आनंदवाडी गावचे सरपंच भागवत वंगे, उपसरपंच व्यंकट कल्ले, ग्रामविकास अधिकारी संजय रोडेवाड, रंजित मरे, सदस्य सारिका शिरूरे, बालिका कल्ले, रूक्मिणबाई वंगे, बचत गटाच्या अनुसया शिरूरे, मंडोदरी चलमले, अनुसया डोंगरे, सुवर्णा आर्धे, सुजाता दिवेकर, सुधामती दिवेकर, मिना चलमले, उर्मिला कोल्हे, अंजली सोनवणे, गयाबाई भूसागरे, कांताबाई बनसोडे आदी महिला उपस्थित होत्या.

### दयानंद कलात विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

**लातूर:** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, रोटरी क्लब व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर सोमवार दि. ०९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. तर रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी आणि दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे यांनी केले होते.

आजच्या आधुनिक युगात विद्यार्थिनींमध्ये फास्ट फूड चे सेवन मोठ्या प्रमाणात सुरू झालेले आहे त्यामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होत चाललेले आहे. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे त्यांना त्याची जाणीव निर्माण करून या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांनी केले. या कार्यक्रमात १७७ विद्यार्थ्यीनींची तपासणी करण्यात आली. रो.जकी खान कायमखनी अध्यक्ष रोटरी क्लब लातूर च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिन वृध्दीसाठी राजगिरा लाडू वितरित करण्यात आले.

# निकोप स्पर्धेच्या माध्यमातूनच विश्वशांती

## विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांचे विचार

### राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा- २०२६चे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० मार्च :** जगामध्ये संपूर्ण जीव सृष्टीला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवेल अशी भयंकर युद्ध स्थिती निर्माण झाली आहे. आज गरज आहे ती परस्परांबद्दल जिव्हाळा, आत्मियता, प्रेम, संघ भावनेची आणि हे केवळ खेळाच्या भावनेतूच शक्य होऊ शकते. युद्धाच्या जागी खेळ आणि विनाशाच्या जागी विकास हा संदेशच कुस्तीच्या माध्यामातून दिला जाईल. हे मैदान जागतिक शांततेचा एक आखाडा आहे. येथे स्वराज्य आणि स्वराष्ट्राच्या मातीतील कुस्तीचा विजयी नाद घुमणार आहे. असे विचार विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) च्या पवित्र यज्ञ भूमीवर विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात अभूतपूर्व राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलते होते.

यावेळी हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, आपसाहेब कदम, बंडातात्या पाटिल, बापूसाहेब मोरे, विष्णू जोशीलकर, रामेश्वर (रुई)चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, काशीराम दा. कराड, आमदार रमेशअप्पा कराड, डॉ. हनुमंत कराड, श्री. राजेश कराड, श्री. ऋषिकेश कराड, प्रा.तेजस कराड, श्री. बाळासाहेब बडवे, श्री. सरकार निंबाळकर, डॉ. एस.एन. पठाण, डॉ. रत्नदीप जोशी, डॉ. महेश थोरवे व प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास कठीण वज्रास भेदू ऐसे अशी परंपरा असलेल्या या गावात जागतिक स्तरावरील पैलवान येत आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. खेळ परंपरेचा असून लोकांना जोडणारा असून भावी जीवनाला दिशा देणारा आहे. ही स्पर्धा १९ वर्षापासून सुरू आहे.

दिनानाथ सिंग म्हणाले, आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड हे खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. डॉ. कराड हे पुनम का चाँद आहे. त्यांनी पैलवानांना जो आधार दिला त्यातून त्यांचे खेळाप्रती प्रेम दिसून येते. ही स्पर्धा सतत अशीच चालत राहावी यासाठी पुढची पिढी तयार आहे.

हभप बापूसाहेब मोरे म्हणाले, जीवनातील प्रत्येक गोष्टीतून आनंद घ्यावा हे डॉ. कराड यांच्याकडून शिकले पाहिजे. प्रत्येकाच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ उभे केले आहे.

बाळासाहेब बडवे म्हणाले, महाराष्ट्राच्या कुस्तीचे हे वैभव अजरामर रहाण्यासाठी डॉ. विश्वनाथ कराड यांनी अद्वितीय कार्य केले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले २५० पैलवान लाल मातीत उतरणार आहेत. उद्घाटनाची कुस्ती रामेश्वर येथील प्रसाद शिंदे व कोल्हापूर येथील प्रणव राख यांच्यात झाली. कुस्ती स्पर्धेचे धावते वर्णन समालोचन बाबा निम्हण यांनी केले. प्रा. विलास कथुरे यांनी प्रास्ताविकेत कुस्ती संदर्भातील माहिती दिली व आभार मानले.

### महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा येथे ‘फार्मा अन्वेषण २०२६’ अंतर्गत दोन उद्योग संस्थांसोबत सामंजस्य करार



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १० मार्च :** महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा येथे राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिनानिमित्त ‘फार्मा अन्वेषण २०२६’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास व उद्योग क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने दिनांक ६ मार्च २०२६ रोजी मॅट्रिक्स कोडिंग सोल्युशन तसेच इंस्टा व्हिजन लॅबोरेटरी, सातारा यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला.महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री.विजय पाटील निलंगेकर साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, व नॅक कॉर्डिनेटर डॉ. चंद्रावधन पांचाळ, आय. क्यू. ए.सी. कॉर्डिनेटर डॉ. शरद उसनाळे तसेच ट्रैनिंग व प्लेसमेंट ऑफिसर डॉ. सुनील गरड यांची प्रमुख उपस्तीथी होती.

या कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना वैद्यकीय कोडिंग व आरोग्य सेवा उद्योग संदर्भात प्रशिक्षण, करिअर मार्गदर्शन व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सेमिनारमध्ये वैद्यकीय कोडिंगचे महत्त्व, आरोग्य क्षेत्रातील विविध करिअर संधी तसेच या क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच या सहकार्याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी करिअर जनजागृती सेमिनार, वैद्यकीय कोडिंग कार्यशाळा, कौशल्य विकास कार्यक्रम, इंटर्नशिप मार्गदर्शन व नोकरीसाठी सहाय्य यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. सुनील गरड यांनी केले व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रागीताने प्रा. सानुली पौळकर यांनी केली.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी विदयार्थीनी उपस्थित होते.

# अहमदपूर पंचायत समिती बिनविरोध

### – सभापतीपदी सूरज पाटील तर उपसभापतीपदी अयोध्या केंद्रे
### – पं.स. वर भाजप-राष्ट्रवादी युतीचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १० मार्च :** नुकतीच अहमदपूर पंचायत समितीच्या १२ गणांसाठी निवडणुक झाली. या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांनी महायुती केली होती. लागलेल्या निकालात राष्ट्रवादी (अजित पवार) पाच व भाजपचे ४ उमेदवार विजयी झाले तर राष्ट्रवादी (शरद पवार) चे उमेदवार दोन जागांवर आणि एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला.अपक्ष उमेदवार सुलोचना कासले यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) मध्ये प्रवेश केल्याने राष्ट्रवादीचे सदस्य संख्या ६झाली.पंचायत समितीचे सभापतीपद हे खुल्या प्रवर्गासाठी असल्याने सभापती पदाची माळ.सुरज बाबासाहेब पाटील यांच्या गळ्यात पडली. सभापती व उपसभापती निवड प्रक्रियेत राष्ट्रवादी व भाजप महायुती चे १० सदस्य उपस्थित होते.

अहमदपूर पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवड सोमवारी (दि. ९ मार्च) झालेल्या विशेष बैठकीत करण्यात आली.

सभापती पदी सूरज बाबासाहेब पाटील तर उपसभापती पदी अयोध्या अशोक केंद्रे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.



लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात ही निवड प्रक्रिया पार पडली.

या विशेष सभेसाठी पंचायत समितीच्या एकूण १२ सदस्यांपैकी १० निर्वाचित सदस्य उपस्थित होते. निवडीच्या प्रक्रियेत सभापती पदासाठी सूरज पाटील आणि उपसभापती पदासाठी अयोध्या केंद्रे यांचा प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. निर्धारित वेळेत अन्य कोणाचेही अर्ज न आल्यामुळे पीठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी या दोन्ही निवडी बिनविरोध झाल्याचे अधिकृतपणे घोषित केले.

या महत्त्वपूर्ण सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी जबाबदारी सांभाळली, तर सचिव म्हणून गटविकास अधिकारी पंकज शेळके यांनी कामकाज पाहिले. ही निवड प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सहायक प्रशासन अधिकारी शैलेश जोशी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी राजेश सोनकांबळे, विस्तार अधिकारी रमाकांत पट्टेवाड, धनाजी सुळे, राजू तीर्थकर, आनंद पपशेटवार आणि प्रकाश कांबळे यांच्यासह पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. नूतन सभापती व उपसभापतींच्या निवडीनंतर समर्थकांनी पंचायत समिती परिसरात गुलालाची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला.

# रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण हित लक्षात घेऊन भाजपा-मनसेची युती

## रेणापूरचे नूतन सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर यांचे आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. १० मार्च :** रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण विकासाचे हित लक्षात घेऊन पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती निवडीच्या अनुषंगाने भाजपा आणि मनसेची युती करण्यात आली असून नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत रेणापूर पंचायत समितीच्या एकूण आठ जागेपैकी भाजपाला तीन, मनसे दोन आणि काँग्रेसला तीन याप्रमाणे विजय प्राप्त झाला आहे. पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि मनसेचे नेते संतोष नागरगोजे यांच्यात चर्चा होवून रेणापूर तालुक्याच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांगीण हित लक्षात घेऊन युती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.




भाजपा मनसेच्या युतीनुसार रेणापूर पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता मनसेच्या सौ मोनिका रवींद्र सूर्यवंशी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली तर उपसभापती पदाकरिता भाजपाचे शरद दरेकर यांना पाच मते आणि काँग्रेसचे बालाजी घोडके यांना तीन मते मिळाल्याने भाजपाचे शरद दरेकर उपसभापती पदासाठी विजयी घोषित करण्यात आले.

सदरील निवड जाहीर होताच आ. कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मनसेचे नेते संतोष नागरगोजे, डॉ नरसिंह भिकाने, शिवकुमार नागराळे, भागवत शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

शासनाच्या विविध योजना निश्चितपणे खेचून आणू मात्र कोणाचीही आडवणूक होणार नाही याची काळजी घेऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की,लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे वैभव जपण्याचे काम पंचायत समितीच्या माध्यमातून व्हावे आपल्या कामाचा विभागातच नव्हे तर राज्यात वेगळा ठसा निर्माण करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. भ्रष्टाचार मुक्त आणि स्वच्छ प्रशासन देऊन लोकांच्या अडीअडचणी निश्चितपणे सोडवणूक करून रेणापूरची पंचायत समिती आदर्श निर्माण करू अशी ग्वाही मनसेचे संतोष नागरगोजे यांनी दिली. नेत्यांच्या विश्वासाला पात्र राहून काम करू कुठेही तडा जाणार नाही असे नवनिर्वाचित सभापती सौ मोनिका सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांनी बोलून दाखविले. प्रारंभी आ. कराड आणि नागरगोजे यांचे नूतन पदाधिकाऱ्यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

यावेळी मनोज कराड, सुकेश, विजय गंभीरे, बाळासाहेब मुंडे, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, वाहेद शेख, श्रीपाद बस्तापुरे, संतोष चव्हाण, राज जाधव, निवृत्ती लहाने, ओम चव्हाण, गोपाळ पडिले, धनंजय पवार, नवनाथ माने, महेश गाडे, लक्ष्मण खलंग्रे, अच्युत कातळे, लक्ष्मण यादव, विजय चव्हाण, साजिद पटेल, उत्तम चव्हाण, सुरेश बुड्डे, नंदकुमार वल्लमपल्ले, श्रीमंत नागरगोजे, अजित पाटील, जयप्रकाश जटाळ, प्रमोद आंबेकर, रवी सूर्यवंशी, माणिक शिरसाट, प्रकाश गालफाडे, नरसिंग भताने शिवराज शिरसाट, बलभीम जाधव, भैय्या गाडे, प्रकाश जाधव यांच्यासह दोन्ही पक्षाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.